IRBK-0107623
IRBK-0107623

अक्षर साहित्य : २६

# तें जग वेगळेंच आहे !

( कोर्टकथा )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ग्रंथ
वा. क. ७६23 नों. दि.
वि. कथा क.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 30,0८3
विभाग क.था.
क्रमांक 2223
नों. दि. ४-४-६७
IRBK-0107623
IRBK-0107623

लेखक
पां. गो. लोहोकरे

महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई ४.

किंमत तीन रुपये

-प्रकाशक-
शं. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

★★

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

★★

प्रथमावृत्ति
ऑगस्ट १९५९

★★

-मुद्रक-
वि. श्री. जोगळेकर
चालक, संजीवन मुद्रणालय,
६९३।३ बुधवार, पुणें २.

ज्यांनीं मोठमोठ्या अधिकार पदांवर असतांना अनेकांचं कल्याण केलं ते दयाळू, विद्वान आणि अभ्यासू साहित्तिक कै० पुरुषोत्तम मंगेश लाड

आय. सी. एस्.

यांस—

अत्यादरपूर्वक

—कथानकांतील पात्रें आणि प्रसंग संपूर्णतया काल्पनिक आहेत सत्यसृष्टींतल्या जिवंत वा मृत व्यक्तीशीं अथवा घडलेल्या प्रसंगांशीं त्यांचा यत्किंचितही संबंध नाहीं.

वाचनालय शाखा
अनुक्रम 30053
विभाग कां॰वां॰
क्रमांक 2223
नों. दि. ११-११-५९

: १ :

ज्या दिवशी मी त्या जगांत पाऊल टाकलं त्या दिवशीं फार मोठा कुयोग असला पाहिजे असं वाटतं ! माझ्या पूर्वजन्मींच कोणचं पाप या जन्मीं उभं राहिलं (कल्पना करवत नाहीं) नि उमेदवार म्हणून तिथं माझा प्रवेश झाला ! आणि डोळ्यांना ढापणं बांधलेल्या बैलानं घाण्या-भोंवती फिरावं त्याप्रमाणें 'अव्वल मुकदम्यांत हुकुमनामा. वादी अमूक प्रतिवादी अमूक, वादीचा दावा असा आहे कीं नि प्रतिवादीची कैफियत येणें प्रमाणें' वगैरे वगैरे तोंच तो मजकूर खरडीत आणखी विषम स्वभा-वाच्या मंडळींत छत्तीस वर्षं मी काढलीं ! माझ्यासारख्या बुद्धिजीवी माण-साला इतक्या कालावधींत वेड कसं लागलं नाहीं याचंच नवल वाटतं !

हं: ! तीन तपांचा काल म्हणजे कांहीं थोडा नव्हे ! मी जर एखाद्या कलेला वाहून घेतलं असतं तर इतक्या कालावधींत अद्वितीय कलावंत झालों असतों मी ! याच अवधींत मी विज्ञानाचा अभ्यास केला असता तर रामन, बोससारखा जगद्विख्यात वैज्ञानिक झालों असतों ! अथवा इतका दीर्घकाल ईश्वराची आराधना केली असती तर मोठ्या सत्पुरुषांत गणना झाली असती माझी ! पण अलौकिक कर्तृत्व, लोकविलक्षण बुद्धिमत्ता, अपूर्व पुण्याई गांठीं नसल्यामुळें हें जरी मला साधलं नसतं तरी सर्वसा-मान्य माणसाचं जिणं तरी कंठता यायला कांहीं प्रत्यवाय नव्हता ? त्या प्रमाणें मी एखाद्या धंद्यांत शिरलों असतों, तर आहे इतक्या बुद्धीच्या आणि सचोटीच्या भांडवलावर मालकानं मला भागिदारी दिली असती. किंवा एवढ्या कष्टाळुपणाच्या आणि नेकीच्या बळावर एखाद्या खाजगी फर्म-मध्यें मॅनेजरच्या हुद्यापर्यंत चढलों असतों मी ! दुसरीकडे कशाला? याच

ठिकाणीं कारकुनींत प्रवेश झाला असता माझा, तर मी कितीहि रेमाडोका असतों तरी पंढरीला वारींत बमलेल्या अशक्त माणसाप्रमाणं केव्हां तरीं देवापुढं जाऊन उभा राहिलोंच असतों ! वेळ येतांच नाझर किंवा क्लार्क ऑफ दी कोर्ट खास झालों असतों ! पण सोंगटयाच्या डावांत योग्य दान न पडल्यामुळं नरद भूत व्हावी ना? तसं योग्य वेळीं वशोला न मिळाल्यानं मी उमेदवारींतून कारकुनींत जाऊं शकलों नाहीं; आणि अशा स्थितींत सरकारी नोकरींत कायम व्हायचं माझं वय निघून गेल्यामुळं मी तिला बाद होऊन माझ्या आधींच उमेदवारींत जिणं कंठणारीं जीं भुतं झालीं होतीं त्यांत मी आयुष्यभर आडकून पडलों ! अशाप्रकारें अकल्पित रीतीनं त्या जगांत माझा प्रवेश झाला; अमानुष परिस्थितींत मी जीवन कंठल नि अकिंचन स्थितींत तिथून बाहेर पडलों ! अशा रीतीनं इतका दीर्घकाल तिथं घालवून कांहींच लाभ झाला नाहीं मला. नाहीं म्हणायला त्या जगाच्या सहवासानं माणसाजवळ काय नको एवढं बरीक कळलं मला ! पण माणूस मोठा म्हणवून घ्यायला आपल्या जवळ काय हवं याचं ज्ञान व्हायचं राहूनच गेलं ! त्यासाठीं मला दुसरा जन्मच घ्यायला हवा आतां !

हं ! तें जग ! खरंच तें जग वेगळंच आहें ! आणि या जगापेक्षां तें छोटं असलं तरी मोठं स्फोटक आहे ! त्या जगांत तुम्ही एकदा नुसते हिंडून या; अंतःकरणांतल्या मृदू भावनांचा नायनाट होऊन जाईल तुमचा नि पुरेपुरे कायदेबाज नि रोकडे व्यवहारी व्हाल तुम्ही ! आणि मग पुराव्याशिवाय भाषा बोलणार नाहींत तुम्ही ! अनुभव म्हणून सांगतों, या जगांत टिळेमाळा केलेला माणुससुद्धां त्या जगांत गेल्यानंतर तुमचा गळा कापल्याशिवाय राहत नाहीं ! ' ओळखीचा चोर जिवें न सोडी ' म्हणतात; तसं तुमचा इकडचा ओळखीचा चोर थोडी माणुसकी शिल्लक असल्यास परहस्ते तुम्हांला तिकडं लुबाडील; पण तुमची लुटमार करील हें निश्चित ! त्यामुळं लांडीलबाडी करून पैसे खाणार नाहीं तो मूर्ख ! नि सौजन्यानं वागेल तो शेळपट अशी धारणा आहे त्या जगांतल्या माणसांची ! यावरून तें जग कोणचं तें तुम्ही ओळखलंच असेल. कोर्टदरबार या भारदस्त नांवानं ज्याचा उल्लेख केला जातो तेंच तें जग बरं !

त्या कोर्ट दरबारला एकदा जरी तुम्हीं भेट दिलीत तरी विविध दृश्यें दिसून येतील तिथं तुम्हांला. एकीकडं कैद्यांच्या गाडींतून पोलीस पाहाऱ्यांत कैदी चढउतार करतांना दिसतील; तर दुसरीकडं प्रतिष्ठित पोशाख केलेला एकादा तरूण मुलगा 'मेहेरबानी करून जरा थांबा. वकीलांना येऊ द्या माझ्या' असं पोलिस अधिकाऱ्याला विनवीत असता 'मुकाटयानं चल पुढं; नाहींतर धक्के खावे लागतील ! अरे, पाहाता काय त्याच्या तोंडाकडं ? घाला बेडया नि चला घेऊन याला फरासखान्यांत ! त्याच्या वकीलाला जरूर असली तर येईल तिथं' असं निष्ठुरपणानं तो बोलत असतांना दिसेल. आणि तिसरीकडं त्या तरूणाचे वृद्ध वडील डोळयांत पाणी आणून त्या वकीलांना'अहो, पोलीस घेऊन चालले मुलाला. तिकडं ते मारतील हो त्याला! जामीनाचं बघा नां' असं विनवीत असता 'नेऊ द्या कुठं नेतात ते ! मी काय करू अशा वेळीं ? मारतील तर खावा मार थोडा' असं बेदरकारपणें ते सांगत असल्याचं तुम्हांला दिसेल. चवथीकडं मॅजिस्ट्रेट चेंबरमध्यें ज्याचं जजमेंट लिहीत आहेत तो आरोपी पोलीस पाहाऱ्यांत आपल्या भवितव्याचा विचार करीत खिन्न होऊन बसल्याचं दिसून येईल आणि असंच आणखी कुठं तरी 'वकीलसाहेब काय वाटेल ते घ्या; पण च्यामायला कशी पालथी उलथी झाली पाहिजे त्याची !' असं म्हणून नोटांचं पुडकं वकीलांच्या हातांत कोंबीत असता, 'करू रे, तू कां काळजी करतोस त्याची ?' असं त्याला पैसा पाहून तोंडदेखलं आश्वासन तो देत असल्याचं दिसेल. कुठं वकीलाच्या हलगर्जीपणामुळं दावा काढून टाकल्याकारणानं हिरमुसलेला खेडूत 'तुम्ही तर म्हणत होता 'हमखास आपल्या सारखं होईल' म्हणून नि मग असं कसं हो झालं ?' असं त्याला विचारीत आहे; आणि त्यावर 'साहेबाला कांहीं अक्कल आहे कां त्या ? त्याच्याकडच्या दाव्याचं हें असंच व्हायचं ! अपील कर तूं; मग दाखवतो त्याला इंगा !' असं बोलून तो आपली पडती बाजू सावरतांना दिसेल. कुणी केलेल्या कामाची उधारी गोळा करण्यासाठीं पक्षकार धुंडीत असतांना बघाल. तर कुणी अडाणी पक्षकारांना बदसल्ला देऊन त्याला आड वाटेला नेत असताना दिसतील. कुठं पानतंबाखुच्या अड्यावर कोर्टाचं राजकारण चाललेलं ऐकायला येईल; तर कुठं बाजार बसव्यांनीं समोरासमोरच्या माडयांतून गिऱ्हाईकावरून अर्वाच्य बोलून रस्त्यानं जाणाऱ्या येणाऱ्यांना

तमाशा दाखवावा, तसें मोकळ्या आवारांत पक्षकारांची टेहळणी करीत हिंडत असलेल्या कज्जे दलालांची ' माझा पक्षकार तू ओढलास ' या सबबीवर बाचाबाची चाललेली दिसेल. आणि त्याबरोबरच ' कैफीयत दिली. ' नोटीस काढली ' ' वारंट सुटलं ' ' जाहीरनामा लावला ' ' हुकुमनामा झाला ' इत्यादि शब्द कानांवर पडतील तुमच्या. तें सारं पाहून आणि ऐकून याच्या मुळाशीं प्रतिपक्षावर मात करणं, बदला घेणं, सूड उगवणं याच प्रवृत्ति आहेत याबद्दल तुमची खात्री होईल नि तुम्हांला शिसारी येईल त्या वातावरणाची ! पण तिथं सतत वावरणाऱ्या मंडळींनां त्याचं काय होय ? तें सारं नित्याच्या परिचयाचं आहे त्यांच्या. त्यामुळं त्यांचीं मनं इतकीं निढाऊन गेलेलीं असतात कीं त्यांवर त्या कशाचाच कांहींही परिणाम होत नाहीं. त्यामुळं त्यांचे सारे व्यवहार कसे सुरळीत चाललेले असतात. कोणी कोर्टाच्या आवारांत चकरा मारून सावज शोधीत असतो. कोणी रस्त्यांतच चकाट्या पिटीत उभे असतात. तर कोणी हॉटेलमध्यें बसून फराळाच्या पदार्थांचा फडशा पाडीत असता प्रतिपक्षाला पाणी पाजण्याचे मनसुबे रचीत असतात. मंडळी बोलता बोलता खात असतात; खाता खाता बोलत असतात; अन् हें सार पक्षकारांच्या पैशावर चाललेलं असतं ! ' दाम करी काम ' ही म्हण शंभर टक्के सत्य कुठं ठरत असेल ? तर ती तिथं ! पैसा पुढं करा; साधा पट्टेवाला सुद्धा साहेबांपर्यंत नेऊन सोडील तुम्हांला ! तुमच्या जवळचा पैसा पाहून ' केस हमखास जिंकतों ' असं वकील तुम्हांला सांगेल. त्याचा कारकून हातांतलं काम बाजूला सारून तुमचं काम हातांत घेईल. शिरस्तेदार हसरा चेहरा करून ' काय पाहिजे तुम्हांला ?' म्हणून विचारील. इतकंच काय, पण अनोळखी माणूससुद्धां अधिकाऱ्यापुढं तुमची ओळख घालील ! पण तेंच तुमच्याकडून लभ्यांश कांहींच नाहीं असं त्यांना दिसू द्या कीं वकील ' वेळ नाहीं मला आतां ' असं सांगेल. त्याचा कारकून ' तुमचं एवढंच काम आहे काय मला ?' असं म्हणून तुम्हांला धुडकावील. शिरस्तेदार साधी तारीखसुद्धा न सांगतां ' बंद पहा तिकडं ' म्हणून तुम्हांला वाटाण्याच्या अक्षता लावील. अन् पैसे देणाऱ्या कुळाला लांबूनच मुजरा ठोकणाऱ्या पट्टेवाल्याला तुम्हीं कांहीं विचारलंत तर ' कशासाठीं काम करायचीं हो मिस्टर तुमचीं ? कोर्टांत

आल्यापासून कधीं चहापाण्यासाठीं चार पैसे दिल्याचं आठवतं कां तुम्हांला!' असं उलट तोच तुम्हांला सुनावील! फार काय पण तुमची तिथं ओळख देण्याची अवश्यकता असेल नि तिथंच तुमचा कोणी परिचित माणूस असेल तर तो सुद्धा तुम्ही फुकटचं गिऱ्हाईक म्हणून 'माझी ओळख चालायची नाहीं.' असं सांगून अंग झाडून मोकळा होईल ! एकूण काय, वकील, कारकून, शिपाई, पट्टेवाले, सारे पैशाचे दोस्त असतात तिथं ! तो पुढं केला तर तुमचं काम ! नाहींतर हराम! अशी स्थिति आहे तिथं.

पण त्या वातावरणांतल्या माणसांना तसं करणं भागच पडतं ! कारण पैसा जास्त मिळवला नाहीं तर ऐटींत राहाता येत नाहीं ! आणि ऐटींत राहिलं नाहीं तर रुबाब दिसत नाहीं ! बरं रुबाब दिसला नाहीं तर दुसऱ्यावर इंप्रेशन तरी कसं पडायचं ? म्हणून जास्त पैसे मिळवायचे ! अर्थात ते कसे मिळवायचे याचं शास्त्र आहे, आणि ते अनुभवानं अवगत होतं.

तिथले सारेच नियम वेगळे आहेत ! इतर ठिकाणीं लवकर आणि बिनचुक काम केलं तर शाबासकी मिळते. पण तिथं तसं करून चालेल कां ? त्यानं पैसा मिळेल कां ? त्यासाठीं प्रत्येक काम जितकं उशीरा करावं तितकं तें फायदेशीर. तसंच दुसरीकडं चुकीबद्दल प्रायश्चित्त मिळतं; पण तिथं कामांत चुका ठेवल्या म्हणजे त्या काढून टाकण्यासाठी पक्षकाराकडून हात ओले होतात! काम पैसा देत नाहीं; माणसं तो देतात. पण त्यांची आपली गाठच पडली नाहीं तर तो कसा मिळायचा ? मग या गाठीभेटी व्हायला याशिवाय दुसरा राजमार्ग कोणचा ? अशा कांहीं महत्वाच्या कामानिमित्त पक्षकारांच्या भेटी घेण्यांत कारकुनांचा ऑफीसचा वेळ निघून जातो, म्हणून दिवसा त्यांचा कामाला हात लागत नाहीं; आणि म्हणून तें दिव्याच्या प्रकाशांत करावं लागतं त्यांना ! असं करण्यांत आणखी एक गोष्ट अनायासेंच साधते. वरीष्ठांच्या दृष्टीनं कष्टाळू ठरतात ते. पण त्याहीपेक्षा ऑफीसच्या कामाच्या दप्तराच्या ओझ्याची घरीं ने आण केली तर अधीक चांगलं. घरीं पक्षकाराकरितां ऑफीस थाटता येऊन वर कर्तव्यदक्ष म्हणून मिरवायला सांपडतं तें वेग-

ळंच ! हें झालं कनिष्ठांचं कर्तव्य ! वरिष्ठानें नुसतीं खुसपट काढून खालच्यांचं काम वाढवणं हें त्यांच्या कार्यव्यापृतेचं लक्षण समजलं जातं ! त्याचप्रमाणं एक्सप्लेनेशनची तरवार खालच्या माणसांच्या मानेवर सतत टांगती ठेवणारा आणि त्यांच्याकडे अष्टौप्रहर करड्या नजरेनं पाहाणारा तो खरा अंमलदार असं शिफारस पत्र मिळतं त्याला ! त्यासाठीं कोणचंही प्रकर्ण मिटवण्यापेक्षा तें पेटवण्याकडं प्रवृत्ति हवी त्याची. हो, असं तें पेटवलं म्हणजें त्या प्रकाशांत त्याची लायकी खुलून दिसते ना त्याच्या वरिष्ठांना ! तिथलं एकंदर तें सारं वातावरण पाहून प्रथम जरी मन भारावून गेलं थोडं तरी आपण त्याच्या अंतरंगांत गेलों म्हणजे प्रश्न पडतो कीं हा बाजार बसव्यांचा कुंटणखाना आहे? कीं पशुंचा कारखान आहे ?' पण नंतर परिचयांनं पटतं कीं हें त्यापेक्षाही भयंकर आहे ! कारण त्यांत होणारा शारिरिक अधःपात सुविचारामुळं पश्चात्ताप होऊन पुढं मागं थांबण्याचा संभव असतो. सन्मार्गाला ती व्यक्ति लागू शकते. पण यांत होणारा मानसिक अधःपात माणसाला संपूर्णतया पशुवृत्तीचा बनविल्याशिवाय राहात नाहीं ! यांत पडलेला माणूस जगाला फसवता फसवता स्वतःच्या आयुष्याचीही फसवणूक करून घेतो. आणि प्रारंभीं जगाला बाधक होणारी पशुवृत्ति नंतर स्वतःच्या पोराबाळांच्याही बाबतींत तशीच होते !

हें सारं पाहिल्यानंतर ज्यांचीं कामें यांच्याशीं पडतात ते लोक प्रसंगीं यांनी आपल्याला खिडींत गाठू नये या भीतीनं दादासाहेब, बाबासाहेब म्हणून गाढवाला गोपाळशेट म्हणत असले तरी लायकी ओळखून असतात यांची! अशा मंडळीकडून या लोकांनीं मानाची अपेक्षा बाळगण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं! शुक्रवारांतल्या बाया रात्रीच्या गिऱ्हाइकाची दिवसा रस्त्यावर गांठ पडली असता लाजेनं खालीं माना घालतांना बघितलं म्हणजे दिवाळी दसऱ्याला व्यापाऱ्याकडे पानसुपारीला जाऊन तिथं थाटांत गळ्यांत हार घालून घेणाऱ्यांच्या बेशरमपणाची कीव करावीशी वाटते !

न्यायालयांतलं वातावरण नि त्याचं बाह्य स्वरूप हें असं आहे ! प्रत्यक्ष न्यायदेवतेचा याच्याशीं कांहींच संबंध नाहीं अर्थात् न्यायदेवतेला दोष देण्याचंहि कारण नाहीं. न्यायाधीशांची दृष्ठि सोज्वळ नि न्यायाचीच असते, पण दुकानांत गर्दी झाल्या-

मुळें तोलून देणाऱ्याची धांदल उडावी, तसं न्यायाची कामं वाढल्यामुळं न्यायाधीशाची नजर न्यायाच्या काटयावरून दुसरीकडं जाऊ शकत नाहीं. त्यामुळेंच त्यांच्या आवतीं भोंवतीं ठाण मांडून बसलेले बडवेलोक भक्तांना ठिकठिकाणीं कसे नाडतात, त्याचप्रमाणं मंदिराच्या आवारांत दुकानं थाटून बसलेले वेगवेगळे दुकानदार त्यांना कसे लुबाडतात हें त्यांना दिसून येत नाहीं. आणि त्यामुळंच या लोकांनीं या देवतेचीं पवित्र मंदिरं भ्रष्ट करून टाकलीं आहेत !

शंकराच्या देवळांत जाऊन त्याची उपासना करण्याऐवजीं कांहीं लोक कामनिक भक्तीनं त्याच्या भोंवतीच्या देवी, गणपती. मारुती इत्यादि उपदैवतांचीच आराधना करतात. त्याचप्रमाणं या देवतेपेक्षां तिच्या मंदिरांतील प्रत्येक दालनांतून वास्तव्य करणाऱ्या वेगवेगळया दैवतांकडूनच बहुतेकांना कार्यभाग साधावयाचा असल्यामळं त्या मुख्य देवतेपेक्षां त्यांचीच आराधना चाललेली असते त्यांच्याकडून. या दैवतांमध्यें च रेकॉर्डकीपर अथवा दप्तरदार या नावानं संबोधलं जाणारं एक दैवत आहे. न्यायदेवतेला यमधर्मराज म्हटलं तर याला चित्रगुप्त म्हणायला कांहींच हरकत नाहीं. कारण याच्या दप्तरांत अनेकांचे ललाट लेख असतात. बाहेरच्यांच्या बाबतींत हे राजेश्री जसे चित्रगुप्त तसे यांच्या हाताखालच्या उमेदवाररुपी भुतांचे हे वेताळ ! त्या भूतसृष्टींत एक वेताळ आहे कीं अनेक असून कारणपरत्वें त्यांच्या ट्रान्सफर्स होतात कल्पना नाहीं. पण उमेदवारांना मात्र अनेक वेताळ लाभतात नि त्यांतलें कांहीं आग्या वेताळही असतात ! या दप्तरदाराची दप्तरखान्याची जागा तपासणीच्या वेळीं व्यवस्थित दिसत असली तरी इतर वेळीं अडगळीच्या खोलीचंच तिचं स्वरूप असतं. कोर्ट कामाच्या दप्तरांचे ढीग अस्ताव्यस्त स्थितींत आवती भोंवती पडलेले आहेत; चोहोंबाजूला शिडचांवरून दप्तरं ठेवलेलीं आहेत; बाजुबाजुला निरुपयोगी झालेलं फर्निचर पडलेलं आहे अशा त्या खोलींत लग्न कार्यासारख्या मंगल प्रसंगीं विधवेला कोठीच्या खोलींत गुतवून ठेवावं त्या प्रमाणें त्या जुन्या दप्तरांच्या जीर्ण रुमालाप्रमाणं ज्यांची शरीरं जीर्ण झाली आहेत, अन्नावांचून ज्यांची पोटं खपाटी गेली आहेत आणि कुटुंबाच्या चरितार्थाच्या काळजीनें ज्यांच्या चर्यावर मूर्तिमंत अवकळा पसरलेली आहे अशी कांहीं मंडळी आपल्याला दिसतील. तर हीं जीं मंडळी त्यांना उमेदवार

असं म्हणतात ! उमेदवार हा झाला त्यांचा हुद्दा; पण त्यांची ड्यूटी असते हरकामेपणाची ! त्यांचं काम म्हणजे ऑफीसचीं खरकटीं काढणं ! कोणाचं मोस्तर पाठवायचं असतं, कोणाची प्रोसेस तुंबलेली असते; कोणाचे हुकुम नामे करायचे शिल्लक पडलेले असतात; कोणाची बारनिशी राहिलेली असते; एक ना दोन ! किती प्रकार सांगायचे ? एकूण काय ? तोबऱ्याला कारकून आणि लगामाला उमेदवार असा प्रकार असायचा तो ! बाकी याचं श्रेय व्यक्तीपेक्षां परिस्थितोलाच अधोक दिलं पाहिजे. कारण माणसांत पशुवृत्ति भिनायला त्याला रक्त मांसाची चटक लागावी लागते. तें खाद्य बिचाऱ्या उमेदवाराच्या वाट्याला कुठलं येणार ? वाघ लांडग्या सारख्या हिंस्त्र श्वापदांनीं त्यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या श्वापदांचा फडशा उडवल्या नंतर बिचाऱ्या दुबळ्या प्राण्याच्या वाट्याला काय येणार ? त्याप्रमाण कारकुनांनींच पक्षकाराला मोकळा केल्यानंतर उमेदवारांनीं हात चोळीत बसण्याशिवाय अन्य मार्ग काय आहे त्यांना ? या लोकांकडून हलक्या सलक्या कामाची ऑफीसला अपेक्षा असल्यामुळं स्वाभिमानशून्य, उणंदुणं बोलणं मनावर न घेणारी, 'मुकीं बिचारीं कुणी हाका' अशा मनोवृत्तीचीच माणसं हवीं असायचीं त्यांना. त्यामुळं स्वाभिमानानं जगू पाहाणाऱ्याला फणा उभारलेल्या नागासारखा लेखून त्याला ठेंचून काढायला नेहमीं टप-लेली असतात ही मंडळी ! बरं त्यांच्यावर अन्याय झाले तरी त्याची त्यांनीं तक्रार करायची कुठं ? आणि ती कशी ? कारण जिथ तिथं थ्रू प्रॉपर चॅनल आडवे यायाचे ! त्यांना डावलून कसं जायाचं ? बरं त्या मार्गानं जायचं म्हटलं तर त्याच्या झारीच्या तोंडाशीं हेच शुक्राचार्याप्रमाणं बसलेले ! त्यामुळं देतील तो मुका मार सहन करून जीवन कंठण्याशिवाय गत्यंतरच नसायचं अशा स्वाभिमानी मंडळीना ! या लोकांकडं बघण्याची कोणाचीही दृष्टि स्नेहाची, प्रेमाची तर राहोच, पण साध्या सहानुभूतीची देखील नसते. तात्यासाहेब भाऊसाहेबांना नि दादासाहेब काकासाहेबांना चांगले दिसत असतील ! पण उंचावर पांचवारी नेसून उभे राहिलेल्या सुंदरीच्या सौन्दर्याचं खाली उभं राहिलेल्याला हिडीस दर्शन व्हावं, तसं या मंडळींना या साऱ्या साहेबांचं सत्य दर्शन अशा स्वरूपांत होतं !

पण अशा स्थितींत पिचत पडलेली मंडळी देखील कांहीं थोडे अपवाद

सोडल्यास त्याच लायकीची असतात ! जन्मठेप झालेले कैदी तुरुंगातल्या वातावरणांत हंसत असतात; खिदळत असतात; मजा करीत असतात. तसं ही मंडळीही त्या परिस्थितींत निढावली गेल्यामुळं कोणी रस्त्यावर पडलेल्या भाकरीच्या तुकड्याकरिता भोंवतालच्या चार कुत्र्यांनीं एकमेकांत झगडावं त्याप्रमाणं एकाद्याकडून चार आठ आणे मिळाले तर त्याच्या वाटणीकरतां आपसांत भांडत बसतात. तर कोणी पान तंबाखुचे बार भरीत असतात. कोणाचं इंग्लंड अमेरिकेच्या राजकारणावर वक्तव्य चाललेलं असतं; तर कोणी शनी मंगळ युति कोणच्या राशीला तापदायक आहे हें भोंवतालच्यांना सांगत असतो. कोणी व्हराड्यांत बसून आडाणी बायाबापड्यांना कायद्याचा सल्ला देत असतो; तर एकादा हें कांहींच न करतां पुढच्या डेस्कवर पाय तणावून देऊन डोळे मिटून आराम करीत असतो.

आणि विविध गुणांनीं युक्त अशा या मंडळीतच कोणे एकें दिवशीं माझा प्रवेश झाला; आणखी असाच एके दिवशीं त्यांच्यांतून मी बाहेर पडलों ! माझी उभी हयात त्या खात्यांत घालवणं हें जसं माझं घोर दुर्दैव ! तसंच ज्या वातावरणांतल्या मंडळीच्या घटकेच्या सहवासानं माणसाचा पशू होऊन जावा तिथं मी तीन तपावर काळ काढून माझ्यांतला माणुस जिवंत राहिला हें माझं परम भाग्य म्हटलं पाहिजे !

: २ :

एकाच माणसांत चढेलपणा आणि पडेलपणा हे दोन्हीं गुणही कसे असतात? तसंच बहिरंगी सोवळा दिसणारा माणूस अंतरंगांत किती ओवळा असतो याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आमचे नाना भावे! त्यांचा सर्वांगीण परिचय ज्या अशुभ दिवसांन मला करून दिला. त्या दिवसाची गोष्ट. पोपट उडून गेलेल्या मोकळ्या पिंजऱ्यांत त्याचं खाद्य उरलेलं असावं आणि झाडावरच्या पोपटाच्या दृष्टीस तें पडून त्याच्या मोहान त्यानं आपणहून त्या बंदिवासांत पडावं, तसं झालं माझं त्या दिवशीं.

मी सकाळचे प्रहरीं सहज घराबाहेर पडायला आणि आमचे पूर्वपरिचित शेजारी नाना भावे मंडईची झोळी घेऊन घरातून निघायला एकच गांठ पडली; त्या बरोबर त्यांनीं पहिला प्रश्न केला मला ' कां रे नाहीं जमलं कां अजून कुठं ?

' चाललेयत् प्रयत्न. जमेल तेव्हां जमेल. ' मी कांहींस निराशेनंच उद्गारलों. ' आलं तुमच्या कानावर असं कांहीं तर सांगा मला ' नंतर मी त्यांना म्हणालों.

' जरूर सांगेन. तूं एकदा मॅट्रिकला बसला होतास नाहीं का ?

' नाहीं हो. बसलों असतों तर पास झालोंच असतों. पण घरच्या अडचणी निमित्त मध्येंच शाळा सोडावी लागली मला. '

' अस्सं. एकूण काय सध्या तूं मोकळा आहेस. '

' अगदीं मोकळा ! ' खिन्नपणें हंसत मी म्हणालों.

' मग आमच्याकडं करतोस का काम सध्या चार दिवस ? दहावीस रुपये मिळून जातील सहजासहजी. आणि जमलंच तुझ्या नशीबानं तर पुढंही उमेदवार म्हणून कर काम तिथं. दुसरीकडं जमेतोंवर.'

अनुक्रम ३००५३
विभाग वा.वा.
२२२३
०७०५

'पगार काय मिळेल तिथं मला ?'

'काय मिळेल तो मिळेल. नाहीं तरी तू मोकळाच हिंडतो आहेस ना सध्या ? मग कांहींच न मिळण्यापेक्षां मिळेल तेवढं पदरांत पाडून घ्यावं. तेवढेच चार पैसे होतील खर्चाला. नाहीं कां ?'

'तें खरं; पण त्याची कांहींतरी कल्पना हवी ना ?'

'अरे बोलून चालून उमेदवारी ती. काय मिळेल तें मिळेल दरमहा. पण तें पुढचं आहे. आज काम आहे तें चार सहा दिवसां पुरतंच; नि त्या-बद्दल मिळतील तुला कांहींतरी दहा पंधरा रुपये. अजून कुठं जमलं नाहीं म्हणालास तूं; म्हणून वाटल आलाय् चान्स अनायासें चार पैसे मिळवून देण्याचा तो बाहेरच्या कोणा अनोळखी माणसाला देण्यापेक्षा तुला दिलेला बरा.'

'तें खरंय पण ?....जाऊं द्या. पण हें काम तरी कसलं आहे ?'

'काम सोपं आहे अगदीं. अस्सल कागदाच्या नकला करायच्या आहेत. एरवी तें काम उमेदवार करतात कोर्टाचे. पण झालंय् काय---ते सारे गेले आहेत मे महिन्याची सुट्टी म्हणून आपापल्या गावीं सारें; अन् इकडं तर अर्जंट काम आलंय् तेव्हां तें कोणाकडून तरी ताबडतोब करून घेतलं पाहिजे. तूं 'हो' म्हणालास तर तें कराव लागणार आहे तुला. मी चार सहा दिवस लागतील म्हटलं; पण तूं जास्त वेळ बसलास तर त्याच्याहि आधी आटोपेल ते ! मग काय विचार आहे ?'

'मी यायचं म्हटल तर केव्हांपासून यायाला हवं ?'

'आजपासून आलास तरी आम्हांला हवं आहे.'

'बरं तर येतों आजपासून मी

'मग मी दुसरा नको ना पाहूं ?'

'नको मी निश्चित येतों.'

आपल्या परिचिताचे किती तरी स्वभाव विशेष, तशाच आयुष्यांतल्या अनेक घटना आपल्या स्मृतिकोशांत ठेवलेल्या असतात; आणि कारण परत्वें केव्हां तरी आपण त्या बाहेर काढतों. या राजश्रींच्याही अनेक गोष्टी संग्रहीं होत्या माझ्या. या निमित्तानं एक एक त्या बाहेर निघू लागल्या

त्यांची जी बैठकीची ओटी होती तिच्याच समोर माझी अभ्यासाची खोली होती. आणि रात्रीचा फराळ करून ते बैठकीवर येऊन पडायला

आणखी मी खानावळींतून जेऊन यायला बहुधा एकच गांठ पडायची. अशा वेळीं मी खोलीचं कुलूप उघडीत असतांना पाहून कधीं आपल्याशीच पण मला ऐकू येईल अशा आवाजांत 'पंडितानां समाजे अपंडितानां कान्हं भजेयुः जेहेत्ते पंडितांच्या सभेंत अपंडित जे आहेत त्यांनीं मौन धरावं असं म्हणावं त्यांनीं तर केव्हां केव्हां तिथुनच विचारावं 'झालं कां जेवण ?' आणि कधी कधीं आंत मंडळींना उद्देशून त्यांनीं म्हणावं ' बरं कां हो आपला समोरचा पंडित फार छान गातो ! आवाजाला भारी गोडवा आहे! अरे पंडित तुझं तें 'बा रे पांडुरंगा' म्हणून दाखव रे यांना एकदां. कां 'आवड तुला बेलाची' म्हणतोस ?'

आणि मग मीही माझ्या 'पंडित' नांवावर कोटी केलेली पाहून कुलूप लावून आंत दिवा लावीत असता मनांतले मनांत हंसत असे. त्यांना उत्त-राची अपेक्षा असे त्या वेळीं उघडलेलं कुलूप हातांत घेतलेल्या स्थितींत पडवीच्या कट्टयाखालीं चौकांत जाऊन उभें राहून त्यांच्या प्रश्नाचीं उत्तरें देत असे आणि आवाजाच्या स्तुतीनं भाळून गेल्यामुळे कोट काढून त्यांच्या बैठकीवर जाऊन त्यांनीं अपेक्षिलेलं गाणं म्हणत असे. पण लवकरच मला कळून आलं कीं ती कोटी म्हणजे आपली प्रच्छन्न टिंगल आहे; ते प्रश्न औपचारिक आहेत. तशीच ती स्तुतीही खोटी आहे. कारण मी तिकडे गेलोंरे गेलों कीं 'अगगग' न नाहीतर आई ! आई नं सुरवात होऊन 'अंग भलतच दुखतंय् बुवा आज; पंडित रगडतोस का रे थोडं ?' किंवा कंबर अगदीं गेली ! चार पाय दे बुवा कमरेवर 'अथवा पायाला एकाएकीं पेटके यायाला लागले बघ. दाब बरं जरा' अशांत शेवट व्हायाचा त्याचा. आणि मीं सुरवात केली की त्यांनी झोपेचं सोंग करायच' हेतू हा कीं 'यामुळं आपल्याला 'पुरे म्हणायला नको; नि आपण पुरें म्हटल्याशिवाय हा पुरे करणार नाहीं. आणखी अशा रीतीनं याच्याकडून फुकट सेवा पुष्कळवेळ करून घ्यायला सांपडेल.' पण मी जशी त्यांची ही युक्ति ओळखली तसं त्यांनीं डोळे मिटले कीं तिथून काढता पाय घ्यायाला लागलों. असें झालं म्हणजे मग मात्र त्यांचो जोर चटकन उडत असे.

याच्या मोबदल्यांत त्यांनीं मला आमीष लावावं 'तुला टाक, निफं, पेन्सिली, रबर, कागद काय लागेल ती स्टेशनरी बाहेरून घ्यायाची ती

आमच्याकडून घेत जा. बाजारभावापेक्षां ती स्वस्त देऊं तुला. मी आमच्यां मोरूकरितां आणतों एका व्यापाऱ्याकडून. तो माझ्या ओळखींचा असल्या-मुळं व्यापारी भावानं देतो मला.'

आणि माझी टिंगल करायची लहर लागली त्यांची (अन् ती बहुधा दर सुटीच्या दिवशीं सकाळीं लागे.) म्हणजे त्यांनीं म्हणावं 'दहा वाजलें पंडित सुगरची पहाट झाली. आतांच उठला असशील ना?' देशस्थ नि गैरशिस्त अथवा 'देशावरची माणसं म्हणजे अजागळ!' 'यजुर्वेदी आधीं नयनि दिसती बावळटसे' काय पंडित 'पानी, लोनी, जोसी, मासी असेच उच्चार करतां ना तुम्हीं नगरी लोक?' अशा रीतीनं त्यानीं आपली करमणुक करून घ्यावी.

या नि अशा कित्येक गोष्टी स्मृतीपुढें उभ्या राहिल्या आणि मनांत म्हटलं ' या राजेश्रींच्या हाताखालीं नोकरी करायची आहे काय आतां आपल्याला? ठीक आहे.'

त्या दिवशीं त्यांच्या ठरलेल्या वेळांत माझं सारं उरकून मी त्याच्या-बरोबरच कोर्टांत गेलों. पेशवाईची आठवण करून देणारा परीटघडीचा पांढरा सफेत अंगरखा, डोक्यावर तांबडे पागोटं, अंगावर उपरणं, पायांत लालचुटूक पुणेरी जोडा. अशा थाटांत माझ्याबरोबर ते चालले होते, वाटेंत घरगुती गप्पा मारीत होते. काय असेल तें असो, कोर्टाच्या आवारांत शिरतांच त्यांनीं आपली ती भूमिका बदलली आणि अनोळखी माणसासारखें ते तुटकपणा दाखवूं लागले, लगेंच माझ्या तें ध्यानांत आलं. वाटलं. 'ऑफ़सचं तंत्र हें असचं असेल.

जिल्हयाच्या गांवीं असलेल्या तालुकाकोर्टांत नानांचो अधिकाऱ्याची नोकरी हाती, हें तेथें जातांच 'नानासाहेब' असं संबोधून पट्टेवाल्यांनं त्यांना लांबलचक मुजरा ठोकला त्याच वेळीं कळून आलं आणि त्यावरून सकाळीं मला ते आजपासून तुला काम देतो असं म्हणाले असतां यांच्या हातांत तशी कांहीं तरी सत्ता असावी असं वाटलं होतं त्याला पुष्टी मिळाली. ते ज्यावेळीं स्थानापन्न होऊन आपल्या पुढील मोठ्या टेबलाच्या ड्रॉव्हर-मधून किल्ल्यांचा जुडगा त्याच शिपायाजवळ देत त्याला 'यांना त्या कपाटांतून टाक, निफ़, दौत, शाई, कागद वगैरे काढून दे' म्हणून म्हणाले

त्यावेळीं समजलं कीं ते हेडक्कार्क (कोर्टाच्या भाषेंत ज्यांना क्लार्क ऑफ दी कोर्ट म्हणतात ) असून कोर्टांची कर्तूमकर्तू अशी ही शक्ति आहे ! शिपायांनें दिलेलें लेखन साहित्य पहातांना मला त्यांना व्यापारी भ वांत स्टेशनरी पुरवणाऱ्या त्यांच्या व्यापारी मित्राची आठवण झाली. त्यांनीं मला जुन्या मळक्या सतरंजीच्या लांबलचक तुकड्यावर आंथरलेल्या फाटक्या तुटक्या आणि शाईचे डाग ठिकठिकाणीं पडून खराब झालेल्या गादीकडं बोट करून तिथं बसायला सांगितलं. तिथं पांढऱ्या चादरी घातलेल्या चांगल्या चांगल्या गाद्या असता आपल्याला अशी भिकार गादी कां दाखवली याचं प्रथम मला थोडं वैषम्य वाटलं. पण नंतर समजलं कीं उमेदवाराची बसायची जागा ती हीच ! अर्थात मला तेच काम करायचं असल्यामुळं तिथं बसण्याबद्दल कुरकुरायला जागा नव्हती.

त्यांनीं एका दिवसापुरतं म्हणून दिलेलं काम मी अडीच तीन तासांतच केलेलं पाहून ' इतक्या लवकर झालं इतकं काम ?' म्हणून त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलं. इतकंच नव्हे तर अरे मग तुझ्यासारखा फास्टहॅन्ड घेतलाच पाहिजे आम्हांला, असं म्हणून त्यानीं तिथल्या नोकरीचं मधाचं बोटही लावून ठेवलं.

त्यांनीं अपेक्षित्यापेक्षांही अल्प मुदतींत ज्या दिवशीं मी काम संपवलं त्या दिवशीं रात्रीं त्यांनीं मला घर बोलावून घेऊन माझ्यापुढं दहा रुपयांची नोट आणि एक कागद करून ' हा तुझ्या कामाचा मोबदला घे आणि यावर एक सही करून टाक, म्हणजे आपला हा व्यवहार मिटला ' असं ते म्हणाले.

तो कागद म्हणजे आम्हांला आमच्या कामाच्या मोबदल्याची पावती असून ' ऐशीं रुपये रोख मिळाले ' असा त्यावर मजकूर होता. तें पाहून मी सही करायला आडलों त्यावर ते म्हणाले ' ऐशीं रुपये मिळाले असं लिहून देऊन फक्त दहाच रुपये हातांत घ्यायाचं तुझ्या जिवावर आलंय्, असं दिसतय्, पण मी तरी काय करूं ? माझा नाइलाज आहे !'

' कसला नाइलाज ?' मी त्यांना विचारलं.

' अरे त्यांत भानगड अशी होऊन बसलेय् कीं मी तर तुझ्याकडून काम करून घेतलं; आणि साहेब म्हणायला लागलेयत् कीं ' उमेदवार नीं

काम केलं नसतं तर ऑफीसांतल्या कारकुनांच्याकडून करून घ्यायाचं होतं तें त्या ऐवजीं बाहेरच्या माणसाकडून काय म्हणून करून घेतलंत तुम्ही ? आतां ते सारे पैसे कोटीच्या नावें क्रेडिट करा ' आतां आली पंचाईत ! साहेबांचा हुकूम कसा अमान्य करता येणार मला ?'

'अस्सं !' कांहीं तरी बोलायचं म्हणूनच मी बोललों झालं.

'होय ना ? तेव्हां मी मनांत म्हटलं ' आपण फुकट श्रम कसे घ्यायाचे एकाद्याचे ?' म्हणून हे मी पदरचे देतों आहे तुला. पण तूं कष्टी होऊं नकोस त्याबद्दल. याची भरपाई तुला आमच्याकडं नेमून घेऊनच करतों मी-

तें ऐकल्यानंतर मुकाटयानं मी पैसे घेतले; आणि पुढं केलेल्या कागदावर सही करून तो नानांच्या हवाली केला.

मी त्यांचा निरोप घेऊन निघायला नि बाबुराव आपटे, कोटींतलेच त्यांचे एक संबंधीं नमस्कार नानासाहेब म्हणत आंत यायला एकच गांठ पडली. ' ठरवून टाकलं तीस रुपयांवर ' ते म्हणाले.

मी जिज्ञासेनं बाहेरच्या बाजूला क्षणभर थांबलों. बाबूराव सारं कांहीं खेळलेला पक्का तपासगीर. कोल्हाटणी, नाचणाऱ्या बाया, यांच्यांत त्याचं वळण फार. तळीरामानं एकटयानं मदिरामंडळ स्थापून अनेकांना त्यांत ओढलं, तसं या राजेश्रीनीं एकदा स्वतःच्या खर्चानं तमाशा करून साऱ्या ऑफिसला नादावून सोडल्याचं माझ्या कानावर आलं होतं. नाना चुकून एकदा त्या मैफलींत सांपडलें होतें. त्याबरोबर तो स्नानसंध्याशील ब्राम्हण इतका नादावून गेला त्या गोष्टीला, कीं आपल्या खर्चानं तमाशा करायचा असा आपला मनोदय त्यांनीं अध्वर्यु बाबुरावांना बोलून दाखवला. बाबुरावांना जेवढी सावजं आपल्या जाळयांत सांपडतील तेवढीं हवींच होतीं. त्याप्रमाणं त्यांनीं तें कंत्राट घेतलं.

गेले चार दिवस त्यांचीं यांचीं त्या बाबतींत बोलणीं चालल्याची कुणकुण ऑफीसांत कानांवर आल्यामुळं तेंच असावं बहुधा असं वाटून त्या संबंधीं खात्री करून घ्यावी या विचारानं क्षणभर मी दाराशीच थांबलों तोंच ' काय मग कीर्तन ठरलं तर एकदाचं ' घरांतल्या माणसांना अज्ञानांत ठेवण्यासाठीं नानांनीं तमाशा ऐवजीं कीर्तन शब्द योजिला असावा.

' अहो, ठरलं म्हणजे काय, ठरलंच!' बाबुराव ठासून म्हणाले.

' त्या दिवशीचं आख्यान जशाच्या तसं झालं पाहिजे म्हणून सांगा अां त्यांना '

' त्याची नको काळजी. तें माझ्याकडं लागलं बाकी नानासाहेब, भलता आवडलेला दिसतोय् परवाचा प्रोग्रॅम तुम्हांला ! हो. बाकी आतां तुमच्या या वयांत दुसरं काय व्हायाचय् म्हणा तुमच्या हातून ? तेव्हां तेवढीच गंमत झालं ! खरं कीं नाहीं !'

' काय लाख बोललात! द्या टाळी '! असं म्हणत आपलं तोंडाचं बोळकं वासून हॅ हॅ करून त्यांनीं दाजीसाहेबांनीं पुढं केलेल्या हातावर टाळी मारली.

' हो, तात्यासाहेबांनाही बोलावायचंय बरं कां या निमित्तानं ' नाना म्हणाले.

' अहो गौरीवाचून हळदी कुंकू नि नवरानवरीवाचून लग्न झालंय् कां कुठं ? तेव्हां तात्यासाहेब हें यायाचेंच !'

' होय ना ? मग हरकत नाहीं पण त्यांना आणणार कोण ?'

त्याची नको तुम्हांला काळजी. तें काम माझ्याकडं लागलं ! मग तर झालं ? '

' मग छान झालं तर. आणि आमचं तें काम ध्यानांत असेलच तुमच्या?'

' वरच्या कोर्टात तुम्हांला घ्यायाला त्यांना सांगायचं हेंच ना ? होईल हो तें. आहे काय त्यांत मोठंसं ?'

बाबुराव आणखी किती वेळ तिथं थांबले होते कोण जाणें ? कारण त्यानंतर मी तिथून निघून गेलों.

त्या कार्यक्रमासाठीं नानांनीं ओळखीच्या एका पक्षकाराची निवांत अशी प्रशस्त जागा बघितली होती आणि तिथं मेजवानीचाही बेत केला होता. दुपारीं जेवायला आणि रात्रीच्या त्या कार्यक्रमाला कोर्टांतली फक्त निवडक निवडक मंडळीच होती पण काय असेल तें असो नानांनीं मला मात्र त्या दोन्हीही कार्यक्रमाला बोलावलं होतं.

नानांनीं जेवणाचा नुसता थाट उडवून दिला होता ! आणि त्यांत यत्किंचितही उणं पडू नये या विचारामुळं त्यांची अगदा धांदल उडालेली दिसत होती प्रतिष्ठित मंडळींपैकीच कांहींनीं पुढाकार घेऊन स्वयंसेवकत्व पत्करलं होतं.

मंडळी पानांवर येऊन बसल्यानंतर सामुदायिक रीत्या 'पुंडलीक वरदा हारि विठ्ठल' झाला

'नानासाहेबांनीं बेत तर झोकांत केलाय् बुवा !' बर्वे हळूच शेजारच्याला म्हणाले.

'अहो, एवढयानंच संपलं नाहीं. रात्रीं छुमछुमचांही प्रोग्रॅम आहे !' त्यावर राजांनीं पुढची बातमी दिली.

'आहे बुवा !' बर्वे.

'नसायला काय झालं? एकाद्याच्या घराला आग लावून चार लोकांना घेऊन शेकत बसायचं; त्यापैकींच प्रकार आहे हा ! -'शास्त्री हळूच म्हणाले.

'म्हणजे ?' बर्व्यांनीं प्रश्न केला.

'अहो, नाहीं तर काय ? राजेश्रींना डिस्ट्रिक्ट कोर्ट हवंय्; त्यासाठीं तात्यासाहेबांना खूष करण्याकरितां हा सारा खटाटोप ! पण त्यासाठीं पैसा जो खर्ची पडतो आहे. तो आहे उमेदवारांच्या फीचा! बिचाऱ्यांच्या मुलांबाळांच्या तोंडचा घास काढून फीस्टा उडवणं नि तमाशे करणं आपल्याला तर मुळींच पसंत नाहीं बुवा !'

'तुमच्या पसंती नापसंतीला विचारतो कोण शास्त्रीबुवा ? तुम्ही या खात्यांत आलात तेंच चुकलं मुळांत' बर्वे म्हणाले.

'असेल तसं, पण तुम्हांला तरी हें पसंत आहे का ?'

'पसंत न करून करता काय ? जिथं राहचचं तिथल्या वातावरणाशीं जमवून घेतलंच पाहिजे.'

'म्हणजे हे असं करायचं असंच ना ?'— शास्त्री.

'अहो, कोण इथं सोवळा दिसतोय् तुम्हांला ?' बर्वे बोलत होते 'परवा ते रिटायर झालेले गुप्ते दप्तरदार दप्तरासाठीं आणविलेले मांजरपाटाचे तागेच्या तागे घरीं पळवून पलंगपोसापासून ते घरांत नेसायला बायकोच्या पातळांपर्यंत त्याचा उपयोग करीत होते ! तसंच त्या वासुदेवराव काळयानीं सी. ओ. सी. होतांच कोर्टांतल्या स्टेशनरीवर जावयाला दुकान थाटून दिलं स्टेशनरी सामानाचं ! त्या नामजोशानं तर म्हणे कहरच केला होता ! तो नाझर असतांना त्याच्या ताब्यांत असलेल्या अज्ञानाच्या इस्टेटींतली

चांदीचीं सारीं भांडीं पळवलीं नि नगाला नग कसलीं तरी फुटकीं तुटकीं भांडीं आणून ठेवलीं तिथं ! अन् तुमच्या त्या काळ्यानं काय कमी लाटा-लाटी केली ? चोरीच्या मुद्देमालांतले सारे डाग लंपास केले कीं त्यानं ! एकूण काय, पक्षकार तडाख्यांत आला तर पक्षकार पिळायचा ! माल ताब्यांत आला तर माल हाशम करायचा! असा खाक्या आहे इथं !'

' अहो, बाहेरच्यांना लुटणं फार तर क्षम्य ठरेल; पण आश्रयाला आले त्यांनाच तुम्हीं पिळून काढता ! काय म्हणावं या अधम वृत्तीला !' शास्त्री.

' अजून नवीन आहांत या खात्यांत म्हणून ही भाषा ! चार दिवस इथं रुळलांत म्हणजे सांगू तुम्हांला. आपला तो बाळा शिपाई माहीत आहे कां तुम्हांला ? तो यांच्याकडं बदलून गेला नि तो न्हावी आहे असं यांना कळलं त्याबरोबर आठ दिवसांवरची हजामत दोन दिवसांवर आलोय ! नि दररोज मालीश चंपीचा कार्यक्रम चाललाय् सध्या भाव्यांचा ! तसेच तो पाटील उमेदवारींत कायम करण्यासाठीं त्याच्या मेव्हण्याच्या वखारींतून दोनशें रुपयांचीं इमारती लांकडं घेतलीं यांनीं ! धर्मकृत्य म्हणून भिक्षुका-कडून आपण विनामोबदला कांहीं घेत नाहीं ना? पण हे राजेश्री आपल्या कडच्या त्या पुजाऱ्याला भिक्षुकीला ऑफीसच्या वेळेची सवलत देण्यासाठीं त्याच्याकडून रोजची पूजा आणि सोमवारीं एकादशनी सत्तेनं करून घेतात फुकटांत ! आतां सांगा कुठं टिकायची तुमची नीति अनीति नी न्याय अन्याय ?' इतकं बोलून बव्यांनीं आपलं प्रवचन पुरं केलं.

' तुहीं कांहीं म्हणा, पण आपल्या मनाला कांहीं प्रशस्त वाटत नाहीं बुवा हें ! उघड उघड अन्याय आहे हा सारा !–" शास्त्री.

' हें पहा, शास्त्रीबुवा, चार जिलब्या आणखी घ्या; पण असं बोलूं नका बुवा ! अहो, हे असले नीतिपाठ द्यायला तुम्हीं काय शाळामास्तर आहांत? कीं करून सवरून भागलेले नि शेवटीं देवपुजेला लागलेले पेन्शनर आहांत? अहो, कुठच्या कुठं पल्ला मारायचाय् अजून तुम्हांला; तोंच ही भाषा तुमच्या तोंडीं ! घाला आणखी चार जिलब्या यांच्या पानांत. हो, पोट भरलं म्हणजे आपोआप तोंड बंद होईल यांचं. म्हणे ' हें बरं नाहीं !' कोटींतल्या माणसाची कृति एक नि उक्ति दुसरीच ! हें जर कुणाला कळलं तर कारकुनाऐवजी पुढारी समजतील ना आपल्याला ? दुसरं असं बघा

शास्त्रीबुवा--कारकून पैसा खातात असा सर्वत्र बोभाटा झालेला आहे; खरं ना? मग मी म्हणतों अमकी स्त्री व्यभिचारिणी आहे असं चार लोक बोलू लागल्यानंतर तिनं आपल्या वासनेचा कोंडमारा तरी कां हो करायचा? तेव्हां मिस्टर, असं बोलू नका इथं अन् तुम्हांला हें जर बघवत नसेल तर हें खातं सोडून खुशाल चालते व्हा! लायक माणूस तरी येईल तुमच्या जागीं!' --इतकं बोलून बव्यींनीं जेऊन उठतां उठतां आपलं भाषण संपवलं.

जेवणं झालीं. पानसुपारीचीं तबकं रिकामीं झालीं. सिगारेटचीं पाकीटं मोकळीं करून मंडळींनीं तीं चार दिशांना फेकून दिलीं; आणि पाय ताणून देऊन शुभ्र चादरी अंथरलेल्या गाद्यांवर मागच्या तक्क्यांना टेकून आराम करायला सुरवात केली; एवढ्यांत नाना स्वयंपाकाकडील बाजू पार पाडून मंडळींत आले आणि 'काय मंडळी, कसा काय होता बेत?' म्हणून त्यांनीं विचारलं.

'सोळा आणे! अहो, नानासाहेब ज्यांत आहेत त्या बेताबद्दल काय विचारायला हवं? उत्तम व्हायाचाच तो!' बाबुराव उठून बसत म्हणाले.

'पडा, पडा, बाबुराव उठतां कशाला? तात्यासाहेबांचा डोळा लागला वाटतं? रात्रीं जागरण व्हायाचे आहे, तेव्हां थोडी डुलकी घेतलेली बरी; खरं कीं नाहीं?'--नाना.

'मंडळी, नानासाहेबांच्या या कार्यक्रमाला आपण उपस्थित झालात त्याप्रमाणं त्याही कार्यक्रमाला आपण साऱ्यांनीं रात्रीं येऊन सक्रीय सहानुभूति दाखवावी असं नानासाहेबांच्या वतीनं माझं आपल्याला सांगणं आहे.' --बाबुराव.

'आतां रात्रीं कसला आणखी कार्यक्रम ठेवलाय?' शास्त्र्यांनीं प्रश्न केला.

'अहो, शास्त्रीणः कार्यक्रम किर्तनाचा. दुसरा कसला असणार?' --बाबुराव.

'कोणाचं कीर्तन आहे?'

'कीर्तन का?' कीर्तन आहे बुचडेबुवांचं!' बाबुराव मिष्किलपणें म्हणाले; आणि त्यांनीं इतरांकडे पाहून अर्थपूर्ण हास्य केलं.

शास्त्री त्यावरून काय उमगायचे तें उमगले, ‘ पण तात्यासाहेब येणार आहेत तेव्हां तिथं आपल्या अनुपस्थितीची नोंद व्हावयाला नको ’ या भेणे भावानंच ते अनिच्छया त्या कार्यक्रमाला हजर राहिले.त्यामुळं ते दूर मागं बसले होते. पण कुणीतरी तात्यासाहेबांना तें सुचवल्यामुळं त्यांनीं त्यांना मुद्दाम पुढं बोलावून घेंतलं.

कार्यक्रमालासुरवात झाली; हळू हळू बैठकीला रंग चढत चालला तसं शास्त्र्यांना तिथं बसणं असह्य होत चाललं. इतक्यांत बाबुरावांनीं ‘ मथे तुझी ती पेटंट लावणी झाली पाहिजे आतां या साहेबांच्यापुढं हावभावा-सहीत !’ असं म्हणत असता त्यांच्यापुढं बसण्यासाठीं तिला खुणावलं. त्या-बरोबर ती ठुमकत मुरडत त्यांच्यापुढं येऊन बसली. शास्त्र्यांचा जीव घाबरा घुबरा झाला.

आणि ती श्रृंगारयुक्त हावभाव करीत लावणी म्हणत होती-

आतां मात्र त्यांना तें सारं असह्य झालं. ‘ हा काय चावटपणा चाल-लाय् ?’ असं म्हणत ते ताडकन् जागचे उठले आणि त्यांनीं जाण्यासाठीं रस्ता धरला. मंडळींचा हास्यकल्लोळ ते जिना उतरून वाटेवर येईपर्यंत त्यांच्या कानावर येत होता.

शास्त्री गेल्यानंतर ज्यासाठीं नानांनीं एवढा खटाटोप केला होता. त्यांना त्याची वानगी द्यायला हवी, म्हणून बाबुरावांनीं मथीला त्यांच्या पुढं येऊन बसायला सांगितलं.

त्याप्रमाणें ती येऊन बसली आणि गाणी म्हणू लागली—

तिचे त्या वेळचे अंगविक्षेप आणि त्याच वेळीं मंडळींची चेष्टेंची दृष्टि पाहून मनांतून इच्छा असूनही तो प्रकार पुढें चालू राहावा असें त्यांना वाटेना; आणि म्हणून. ‘ अहो, हें काय ? आमच्या वयाकडं तरी बघा ’ असं वरकरणी म्हणत असता त्यांनीं हलकेंच पांच रुपयांची नोट तिच्यापुढं केली. तें पाहून ‘ हं हं नानासाहेब, तशी देऊ नका तिला ती. दोन्ही ओठांत धरा ती; अन् मथे तू आपल्या ओठांत धरून ओढून घे ती ’ बबुराब म्हणाले. पण इतका रंगेलपणा इच्छा असली तरी मंडळींना

दिसायला नको या विचारानं नानांनीं तिला नोट घेण्यासांठीं खुणावून ती पुढं येतांच तिच्या हातंत ती दिली. असो. तर अशा रीतीनं त्या मैफलींत रात्र संपून दिवस केव्हां उजाडला हें कोणाच्या ध्यानांतही आलं नाहीं इतकी रंगली होती ती ! वरचेवर कॉफीचीं आधणं उतरत होतीं पानसुपारीचीं तबकं रिकामी होत होतीं. सिगारेटच्या पाकिटांतल्या सिगारेटी तोंडांत नि त्या बरोबरोबरच कोणी पहात नाहीं असं पाहून खिशांतहि जात होत्या. शेवटीं मंडळींनीं सकाळच्या ताज्या दुधाचा चहा घेतला आणि तें स्थळ एकदाचं सोडलं !

: ३ :

मे महिन्याची सुटी संपत आली होती; पण ती संपावयाच्या आधींच दोन दिवस, सुटीवर गेलेली मंडळीं परत येऊन सारं कोर्ट भरलं होतं. 'सुटीची आपल्याला कांहींही प्राप्ति होऊ न देता ती मला—एका उपऱ्या माणसाला करून दिलीं; इतकंच नव्हे तर उमेदवार म्हणून साहेबांकडून त्याची (माझी) नेमणुकही करून आणली, या विचारानं प्रत्येकजण माझ्या कडं मत्सरग्रस्त दृष्टीनें बघू लागला; आणि कोणी कोणी तर "पाहू द्या ना तो कसा राहातो ते?' असं आव्हानात्मक बोलल्याचं कानांवर यऊं लागलं. घडलेल्या प्रकाराबद्दल उमेदवार मंडळी माझ्याप्रमाणंच नानांवरही नाराज झाली होती. त्यांनीं ते प्रकरण साहेबांच्या कानांपर्यंत पोहोंचवलं. तें ऐकून लौकिकांत कमीपणा आल्यामुळं जारापासून झालेल्या संततीला जारिणीनं हिडोस फिडोस करावं, त्याप्रमाण नाना माझ्याशीं वागू लागले. तेव्हां पासून माझ्याकडं बघण्याची त्यांची दृष्टीच साफ बदलून गेली!

नानांना आजवर मी शेजारी म्हणून ओळखीत होतो; पण अधिकारी म्हणून कुठं पाहिलं होतं त्यांना मी? त्याचं प्रत्यंतर हळू हळू येऊं लागलं आतां.

दुपारच्या वामकुक्षीचा त्यांचा कार्यक्रम अव्याहतपणें चालू होता. ते तालुका कोर्टांत असेपर्यंत झोपण्याच्या स्वतत्र जागेच्या अभावी खुर्चीवर बसल्या बसल्याच त्यांना तो कार्यक्रम उरकावा लागे अशा वेळीं त्यांना सारखी पेंग यायची नि त्यामुळं कांहीं वेळां पुढं झोकांड्या जायच्या त्यांच्या तर कांहीं वेळां त्या मागं जायच्या. त्यांच्या त्या अर्ध जागृति अर्ध शुषुप्ति अवस्थेचा अनेकांनीं अनेक रीतींनीं फायदा करून घेतला होता. एका पोस्टमनन कोर्टांतल्या व्ही. प्या' फार्मवर अशाच वेळीं त्यांच्या सह्या घेऊन

तें पैसे आपल्या खिशांत घालण्याचा सपाटाच लावला होता कित्येक दिवस ! तो सरकारी नोकरच असल्यामुळं नाना अशा वेळीं त्यानं पुढं केलेल्या कागदांवर बिनतक्रार डोळे झाकून सह्या करीत असत. पण एरवी प्राप्ति नसेल तिथं मग तो पक्षकार असो नाहीं तर वकील असो खुशाल धुडकावून देत असत त्याला ते ! आणि एकाद्यानं जागं केल्यामुळं ते आशेनं जागे झाले आणि परिणामी त्याच्यापासून त्यांना कांहींच लाभ झाला नाहीं तर कमालीचे भडकत असत त्याच्यावर. त्याप्रमाणं एकदा खुर्चीवर बसल्या बसल्याच ते डुलकी घेत असता एक तरुण वकील आले होते त्यांच्याकड. त्यांना कांहीं माहिती हवी होती त्यांच्या पासून; म्हणून त्यांनीं त्यांना जागं केलं. त्या बरोबर नाना एकदम त्यांच्यावर उखडले. ‘सार्‍या गोष्टी मला काय विचारतां ? करा चौकशी तिकडं’ असं तिरसटासारखं ते बोलून गेले. पण वकीलही कांहीं लेचेपेचे नव्हतें. ‘ही माहिती मला हवी आहे; नि ती खालच्या मंडळीकडून मिळणं शक्य नसल्यामुळं तुम्ही ऑफीसर म्हणून तुम्हांला विचारायला आलों आहें’ निश्चयी स्वरांत ते म्हणाले.

तें ऐकून विनाकारण झोपमोड झाल्यामुळं आधीच रागावलेले नाना अधिकच भडकले. ‘वेळ नाहीं मला, सांगितलं ना तुम्हांला ?’ आवाज चढवून ते म्हणाले.

‘हें पहा, ही माहिती मला सरकारी कामासाठीं पाहिजे आहे; नि ती तुम्ही दिलीच पाहिजे ! इट इज युअर ड्यूटी !’ शांत पण निग्रही स्वरांत वकीलांनीं त्यांना सुनावलं.

‘माझ्या ड्युटींची जाणीव देणारे तुम्ही कोण; हू आर यू टू आस्क मी ?’ टेबलावर जोरांत हात आपटून त्यांनीं त्यांना रुबाबांत विचारलं. पण त्यांची ती घमेंड उतरण्यासाठीं वकीलांनीं इंग्रजींत बोलण्याचा जेव्हां सपाटा लावला तेव्हां नानांची तारांबळ उडाली. ते काय बोलताहेत हें देखील नीटसं त्यांच्या ध्यानांत येईना. ते त्याचं उत्तर काय देणार? आपल्या बोलण्यानं त्यांची अशी त्रेधा तिरपिट उडालेली पाहून वकील गालांत किंचित हंसले. तें पाहून मात्र नानांच्या संतापाचा पारा एकदम चढला. ‘दात दाख–

वायला काय झालं? Don't you know I am an officer?' नानांचा पहिला रुबाब कायमच होता.

' You are not an officer; but a clerk of the court?' वांत्रय साधंच पण वकील तें अशा कांहीं स्वरांत उच्चारले कीं तुम्ही यःकश्चित् एक कारकून आहात असा अर्थ त्यांत स्पष्टपणें ध्वनित होत होता.

' तुमच्या सारखे वकील सुद्धां पायलीचे पन्नास पडलेयत इथं ! ' त्यांना हेटाळणीच्या स्वरांत क्लार्क ऑफ दी कोर्ट म्हटल्यामुळं चिडलेले नाना म्हणाले.

' त्या पन्नासांतला मी नव्हे ! ' करारीपणें वकील उद्गारले.

' खरं आहे. त्यांना कांहीं तरी अक्कल असते; पण तुम्ही नुसतीच झिरमिळयांची पगडी डोक्यावर चढवून आलात ! पण त्या पगडीच्या आंत देअर मस्ट बी समथिंग ! नाहीं तर पक्षकार पगडी उडवतील एकादे दिवशीं ती ! हं ! '-- इतकं बोलून कसा पण याला चित केला ! अशा विजयी मुद्रेनं त्यांनीं ऑफीसांतल्या मंडळीकडं नजर टाकली.

' बघुबघू, '-- वकील.

' खुशाल बघा. जा आता वेळ घेऊं नका माझा ' असं म्हणून त्यांनीं त्यांच्याशीं चालूं असलेलं बीलणं संपवलं; आणि दुसऱ्या उद्योगाला लागले ते.

थोडयाच वेळांत नानांच्याकडं एक तीक्ष्ण दृष्टिक्षेप टाकून वकील तिथून मुकाटयानं निघून गेले; आणि विजयी मुद्रेनं नानांनी आपल्या छपरी मिशावरून हात फिरवला.

दुसराही एक प्रसंग असाच घडला. एकदा तें खुर्चीवर बसून झोपेंत मागं पुढं झोकांडया घेत असता मध्येंच त्यांनीं डोळे उघडून बघायला आणि समोर माणूस दिसायला एकच गांठ पडली. त्या बरोबर '-काय आहे ?' त्यांनीं त्याला विचारलं.

' काम लवकर हवंय् साहेब ' तो माणुस म्हणाला.

' मग ? ' अर्थपूर्ण दृष्टीनं नाना त्याच्यांकडं बघत उद्गारले. पण त्या माणसाला त्या उद्गाराचा नीटसा अर्थबोध न झाल्यामुळं ' तो अर्ज आहे

ना माझा?' तो म्हणाला.

'तो दिसला हो मला; पण तो उडून न जाण्याची कांहीं तजवीज केली नाहींत तुम्ही.'

'पण तो आहे ना अजून टेबलावर ?'

'तें खरं; पण तुम्ही गेलांत कीं तोही जाऊन पडेल कुठं तरी !'

'मग काय करूं ?'

'वजन ठेवा. वजन ठेवा त्याच्यावर '

त्याबरोबर त्या माणसानं बाहेरून बारीकसा दगड शोधून आणून त्या कागदावर ठेवला. तें पाहून नाना संतापांत आवाज चढवून म्हणाले, 'मग तुम्हीच का नाहीं बसलात त्याच्यावर ? मला तरी त्यांत नि तुमच्यांत कांहींच फरक दिसत नाहीं ' आणि नंतर खुर्चीमागं माझ्याकडं तोंड वळवून ते म्हणाले 'सांगा यांना वजन काय ठेवायचं असतं तें !'

त्यानंतर व्यर्थ झोपमोड झाली आपली अशा विचारानं खुर्चीमागं रेलून पुन्हा त्यांनीं झोपेची आराधना सुरू केली.

ते तालुका कोर्टात असेपर्यंत झोपण्याच्या स्वतंत्र जागेच्या अभावी त्यांची त्या बाबतींत फार गैरसोय होत असे. खुर्चीवर बसल्यां बसल्याच त्यांना तो कार्यक्रम उरकावा लागे. पण त्यांनीं तमाशा केल्यानंतर लवकरच त्यांना (आणि आम्हांलाहि) वरच्या कोर्टात घेतलं गेलं. (पण तें तात्यासाहेब खूष झाले म्हणून नव्हे; तर तें कोर्टच बंद झालं म्हणून ! असं होणार हें आधीं कळतं तर तमाशाचा खर्च केला नसता या विचारानं नाना किती दिवस तरी मधून मधून बेचैन होत असत.) त्यामुळं त्यांची ती गैरसोय दूर झाली. तिथं दप्तरदार म्हणून त्यांची नेमणुक झाल्यानंतर एका रेकॉर्डच्या खोलींत त्यांनीं गाद्यातक्के टाकून दुपारच्या झोपेंची खास व्यवस्था करून टाकली.

ते कोर्टांत येऊन खुर्चीवर बसले कीं हळू हळू त्यांना पेंग यायला लागून मागं पुढं झोक जायाला लागायचे त्यांचे असं झालं म्हणजें 'मी जरा पडतों आं आंत ' असं कोणाला तरी सांगून त्यांनीं तिकडं जावं; ते दोन अडी–

चला तिकडून परत यावं. एकदां ते असेच तिकडं झोंपले असतां एका वकीलांनीं ' अर्जंट काय आहे. ताबडतोब भेटायचं आहे त्यांना ' असं म्हटल्यामुळं नाइलाज होऊन कारकून त्यांना नानांच्या चेंबरमध्यें घेऊन गेला; आणि त्यानं नानांला झोपेंतून जागं केलं. वकीलांनीं ' एका बाईचं अफीडेव्हीट करायचंय् ' असं सांगून, त्या खोलीच्या मागील दारांतून एका पडदानशीन बाईला त्यांच्यापुढं आणून उभं केलं. नानांनीं अर्धवट झोपेंतच ' देवाशपथ खरं सांगेन. खोटं सांगणार नाहीं ' वगैरें प्रतीज्ञा वदवून घेऊन त्यावर त्याप्रमाणं शेरा असलेला शिक्का मारला. त्या खालीं सही ठोकली. वकीलांनीं पुढं केलेली पांच रुपयांची नोट सदऱ्याच्या आंतील बंडीच्या खिशांत ठेवून दिली आणि झोपेंतून जागृतावस्थेंत आलेल्या दहा मिनिटांचा पुरेपूर फायदा मिळाला या समाधानांत गादीवर पुन्हा अंग टाकलं. पण त्याच वेळीं तिकडं त्या खोलींबाहेर पडणाऱ्या वकीलांनीं एकवार मागं वळून पाहून नानांनीं डोळे मिटवून घेतल्याची खात्री करून घेतल्यानंतर त्या बुरखेवाल्या बाईचा (तो पुरुष होता) बुरखा हातानं काढून ' कशी लेकाच्याच्या डोळ्यांत धूळ फेकली! 'अशा अर्थीं मिश्कीलपणें हंसत त्याच्या हातावर विजयाची टाळी दिली !

नाना कधीं कधीं झोंप लागावयाच्या आधींच आराम करण्यासाठीं म्हणून तिथं जाऊन पडत. अन् मग अशा वेळीं ते जोशी, कुलकर्णी, देशमुख वगैरे ठरावीक दोन तीन मंडळीपैकीं कोणाला तरी आंत बोलावून घेऊन ' जरा आंग रगडा हो. फारच ठणकतय् बुवा ! ' असं तें ठरावीक पालुपद म्हणून त्यांना वेठीला धरीत असत. त्यांचं तें अंगमर्दन चालू असतां त्या माणसाला उत्तेजीत करण्यासाठीं ' हां ! अस्सं! ' असं म्हणावं कधीं त्यानीं तर कधीं 'आणखी जोर हवा जरा. कां हो, अगदीच कसा जोर नाहीं तुमच्या अंगांत,, इतके तरुण असतांना?' असं ते म्हणत असत. आणखी मग त्या गृहस्थाची इकडं सेवा चालू असता त्यांचं तिकडं घोराख्यान सुरु हावं.

ही पाळी त्यांनीं एकदा आमच्यावर आणली होती. मला त्यांनीं आंतून हांक मारली तस मला वाटलं कांहीं काम असेल. म्हणून मी आंत गेलो. यावर त्यांनीं मला ही कामगिरी सांगितली.' पण माझ्याच्यानं व्हायाचं नाहीं तें ! ' असें म्हणून मी तें करायचं साफ नाकारलं; आणखी त्यांच्या

परवानगीची वाट न पाहाताच बाहेर निघून आलों.त्यामुळं नाना माझ्यावर भयंकर चिडले; आणि माझा सूड घ्यायाचा म्हणूनच कीं काय दुसरें दिवशीं उगीचच चार दप्तरं तिथून हालवून दुसऱ्या खोलींत नेऊन टाकायला सांगितलीं त्यांनीं मला.

‘ओझीं उचलायचं काम माझं नाहीं. शिपायाला सांगा’ असं स्पष्ट शब्दांत त्यांना सांगून त्याही कामाला मी नकार दिला. नानांना तो अपमान सहन झाला नाहीं. त्यांचा चेहरा रागावलेल्या बोक्यासारखा झाला; आणि समोरच्या टेबलावर आपला उजवा हात जोरानं आपटून संतप्त स्वरांत ‘तुम्ही कोण समजतां स्वत:ला ? काय लायकी आहे तुमची ?’ इत्यादि इत्यादि सुनावलं त्यांनीं मला.

‘इथल्या कोणाही माणसापेक्षां माझी लायकी कमी नाहीं’ शांतपणें त्यावर मी म्हणालों.

‘उ ंट ! घरीं बोलतां काय तुम्ही ?’

‘तुम्ही सुद्धां ही घरचीच भाषा वापरली,म्हणूनच मी ऐकून घेतलं.एरवी माझी चूक यत्किंचितही नसता कोणाकडूनही उर्मट म्हणून घेणार नाहीं मी’ निग्रही स्वरांत मी म्हणालों-

‘शहाणे आहांत ! जा जागेवर जाऊन बसा.’ म्हणून संतप्त मनस्थितींतच ते टेबलावरचे कागद उगीचच चिवडू लागले.

मतलब असेल तिथं मधुकराप्रमाणं गुंजारव करणारे नाना मतलब संपताच लाथेनं उडवून द्यायला कमी करीत नसत त्याला ! काम संपलं कीं आपुलकी संपली असा त्यांचा खाक्या असे. त्यांना कुठंही जातांना बरोबर कोणीतरी लागत असे; आणि बहुधा तो खुषमस्कऱ्या असावा अशी त्यांची अपेक्षा असे. आणि अशा मंडळीना आमच्याकडं कधींच वाण पडली नाहीं. त्यामुळं कोर्ट बदललं तरी बदललेल्या कोर्टांत देखील असा कोणी ना कोणी मिळायचाच त्यांना. त्याप्रमाणं ते ज्या दिवशीं डिस्ट्रिक्ट कोर्टांत आले त्याच दिवशी अशाच एका गृहस्थांनी त्यांचं टेबल आपल्या धोतराच्या पुढच्या सोग्यानं पुसून आपण त्या पंखी आहोंत अशी त्यांना जाणीव करून

दिली. त्यांचं नांव वाकडे. वाकडे हे पूर्वी एका सबजज्जांकडं आचारी पाणके असे कोणी तरी होते म्हणे. त्यांची बदली झाली तेव्हां त्यांनीं यांना बरो-बर घेऊन जाण्याऐवजीं इथंच उमेदवारींत चिकटवून दिलं. आणि तेव्हां पासून ते अशाच साधनांनीं त्या जागेला चिकटून होते. वाकड्यांच्या त्या साध्या कृतीवरून देखील नाना त्यांच्यांवर निहायत खूष झाले; आणि त्या प्रसन्न मनस्थितींत असता त्यांनीं त्यांच्या घरची चौकशी केली नाना इतकंच करून थांबले नाहींत तर त्यांनीं दुसरें दिवशीं मंडईंत जातांना यांच्या घरीं आपली पायधूळ झाडली. आपलें वरिष्ठ आपल्याकडे अना-हुतपणें येणं वाकड्यांना परम भाग्य वाटलं आपलं; आणि त्या आनंदी मनस्थितींत यथाशक्ति त्यांचा सत्कार केला. नानांनीं त्यांच्या कडील पाहुण-चाराचा स्वीकार केल्यानंतर वाकड्यांच्या गृहस्थाश्रमपालनाची आणि त्याबरोबरच त्यांच्या गृहिणीच्या सुग्रणपणाची तोंड फाटेतों स्तुति केली

वाकडे नानांना वाटेला लावीत दूर आलेले पाहून 'चला की मंडईपर्यंत वेळ असला तर. बोलत बोलत जाऊ' असं त्यांनीं म्हटल्यावरून ते त्यांच्याबरोबर मंडईंत गेले. मग नोकर बरोबर असतां अधिकाऱ्यांनीं ओझं वाहणं कसं योग्य आहे ? असा पोक्त विचार करून त्यांनीं त्यांची. भाजीची झोळी आपल्याकडे घेतली; आणि मध्येंच ती त्यांच्या जवळ देण्यापेक्षां त्यांच्या घरीं ती पोहोंचवली तर अधीक चागलं असं वाटून त्यांनीं नानांकडं आणून पोहोंचती केली ती. झालं. दुसऱ्या दिवसापासून नानांनी वाकड्यांकडं जायाचं; तिथं चहा घ्यायाचा; तिथून त्यांना घेंऊन मंडईत जायचं; आणि शेवटीं त्यांच्या पाठीवर मंडईचं ओझं देऊन त्यांना घरापर्यंत घेऊन यायचं हा नित्यक्रम होऊन बसला त्यांचा ! बरं वाकडे ही त्यांची फुकट हमाली करीत होते म्हणून त्यांना दया क्षमा होती काय म्हणता ? छे हो ! नांव नको त्याचं ! वेळ आली कीं त्यांनाही फैलावर घ्यायाला कधींच कमी करीत नसत ते; याचं प्रत्यंतर एकदा पाहयाला मिळालं. त्यावेळीं वाकड्यांच्या कडून कांहीं तरी चूक झाली होती. चूक तशी साधीच होती; पण तिला गंभीर स्वरूप देऊन नानांनीं त्यांना घाबरून सोडलं होतं.त्यामुळें नानांनीं आपल्याला झाल्या चुकीबद्दल वेडंवाकडं प्रायश्चित न देतां त्यांनीं तें प्रकरण मिटवावं म्हणून ते त्यांच्या

जवळ गयावया करून ' मग साहेब ? ' असं त्यांनीं मोठ्या आशेनं त्यांना विचारलं.

' मी काय सांगू ?' नाना रुक्षपणें उद्गारले.

' असं करूं नका साहेब '

' मग कसं करूं साहेब ? ' वेडेवाकडे हेल काढीत नानांनीं उलट त्यांना विचारलं.

त्याच वेळीं या मिटवामिटवीसाठीं वाकड्यांनीं नानांना कांहीं तरी भेट आणली होती वाटतं. ती कोणाच्या दृष्टीस न पडती तर नानांनीं गुपचुप-पणें निश्चित घेतली असती. पण बावरलेल्या मनःस्थितींत वाकड्यांना तेवढा पोंच राहिला नाहीं आणि त्यामुळें त्या गोष्टीचा थोडा बभ्रा झाला. त्यामुळं चिडलेल्या नानांनीं निस्पृहपणाचा आव आणून दरडावून त्यांना विचारलं ' अन् तें काय आहे ? '

' उगीच आपलं '—पुढं बोलायला वाकडे घुटमळले.

' उगीच आपलं काय ? कुणी सांगितले तुम्हांला हे उद्योग ? का आण-लंत तें बोला. ' त्यांनीं त्यांना चांगलंच फैलावर घेतल्यामुळं ते जास्तच घाबरलें. ' परत नेतों साहेब. ' ते म्हणाले.

' पण आधीं आणलंतच कां ? आणि म्हणे परत नेतों साहेब. पण आतां परत तरी कोणाच्या परवानगीनं नेतां?

' मग ठेवतों साहेब. '

' कुणी सल्ला दिला तुम्हांला हा ? बोला. '

' आपले ते कुलकर्णी '—पण त्यांना पुरं बोलही न देतां ' झक मार-तात ते नि तुम्ही ! ' नाना म्हणालें.

हें ऐकून नशीब आपलं अशा अर्थी वाकड्यानीं कपाळाला हात लावला. ' असे दगड आणून बसवलेयत् इथं सारे ' शेवटीं नानांनीं उमेदवारांबद्द-लचा आपला अभिप्राय व्यक्त केला !

असो. तर नाना अशा अनेक गमती जमती करीत त्यांचा काळ चालला असतां तात्यासाहेब गेले आणि त्या ठिकाणीं बाबासाहेब आले; आणखी

थोडक्याच दिवसांत त्यांनीं त्यांची उचलबांगडी करून त्यांना एका तालुक्याच्या ठिकाणीं टाकलं. पण नानांचं दुर्दैव एवढ्यावरच संपलं नव्हतं; तर ज्या वकीलांचा त्यांनी एके काळीं अपमान केला होता तेच सबजज्ज होऊन तिथं आले.

ते आलेले कळतांच नानांची पांचावर धारण बसली ! पण बाह्यतः त्यांनीं तसं दिसू दिलं नव्हतं. स्टेशनवर साहेबांना उतरून घेण्यासाठीं जातांना त्यांच्या स्वागत सन्मानाप्रीत्यर्थ त्यांनीं भला थोरला हार नेला होता; आणि साहेब गाडींतून उतरल्याबरोबर नाना तो त्यांच्या गळयांत घालणार तोंच साहेबांनीं त्यांच्या हातांतून जवळ जवळ तो हिसकावून घेऊन 'देअर मस्ट बी समथिंग आं ?' असं छद्मीपणानं हंसत हंसत म्हणून नानांच्या गळयांत तो घातला ! त्या प्रकारानं इतरांना काय वाटलं असेल कुणास ठावूक ? पण त्या कृतीनं नाना मात्र काळे ठिक्कर पडले !

त्यानंतर लवकरच नानांच्या दुर्दैवानं मागच तें व्ही. पी. प्रकरणही त्यांना कल्पना नसता एका एकीं उपटलं; कोर्टानं 'अमक्या अमक्या प्रकरणांतले पैसे कोर्टांत जमा झाले नाहींत' असें पोस्टाला कळवलं ! आणि त्यावर पोस्टांत चौकशी करून 'कोर्टातल्या जबाबदार माणसांच्या व्ही. पी. फॉर्म्संवर सह्या झालेल्या आहेत तेव्हां ते पैसे आमच्या माणसानं कोर्टांत भरले आहेत' असं उलट कळवलं. आणि त्यानंतर नानांच्या सह्या म्हणून तें प्रकरण त्यांच्या या नव्या साहेबांच्याकडं चौकशीला आलं. त्या बरोबर साहेबांनीं नानांना चेंबरमध्यें बोलावून घेऊन घडलेला प्रकार त्यांना सांगून 'देअर मस्ट बी समथिंग' हें त्यांचंच वाक्य वेगळ्या अर्थानं त्यांच्यापुढं ठेवून त्यांच्या दुःखावर चरचरून डाग दिला !

नानांना आपण न कळत कोणत्या प्रकणांत गोवले गेलों याची आतां पुरेपूर जाणीव झाली. तसं ते साहेबापुढं हात जोडून गयावया करीत म्हणाले 'यांतून मला वांचवा साहेब कृपा करून. हात जोडतों मी आपल्याला आपण समर्थ आहांत.'

'मी समर्थ असलों तरी तुम्हांला वाचवण्याची माझी इच्छा नाहीं पण त्या बरोबरच तुमचा सूड घ्यावा अशीही माझी इच्छा नाही. तुमच्यापुढं दोन पर्याय ठवतों. नोकरीवर राहून तुरुंगांत जायचय्? कीं पेन्शनचा अर्ज देता ?'

'पेन्शनचा अर्ज देतों' नाना खिन्नपणें उद्गारले.

नानांचं भाकीत उलटचा रीतीनं खरं झाल. पक्षकाग़नं वकीलांची पगडी उडवण्याऐवजीं त्या वकीलांकडूनच नानांची पगडी शेवटीं उडवली गेलीं!

: ४ :

आमच्याकडून नानासाहेब गेले आणि त्यांच्या ठिकाणीं मामासाहेब आलें तरी सुखाची आशा होती काय म्हणता आम्हांला ? छे हो! नांव नको त्याचं ! आम्हांला त्रास देण्याची त्यांची तऱ्हा एक असली तरी यांची दुसरी एवढाच काय तो त्यांच्यांत फरक!

शहाण्याचं चाकर व्हावं पण मूर्खाचं धनी होऊ नयं म्हणतात, पण इथं तर मूर्खाचं चाकर होण्याची वेळ आली होती! खरोखरच तो माणूस मूर्ख होता! अहो, नुसता मूर्खंच नव्हे (तसा असता तर एक वेळ परवडला असतां ) तर हलकट होता तो! अशाच्या हाताखालीं नोकरी करणं म्हणजे केवढं दुर्दैव असेल, कल्पना करा. पण नशीबापुढं कोणाचा इलाज चालतों ?

तें बाळ मी प्रथमपासून ओळखीत होतों ( आणि तोही मला ओळखीत असावा. त्याशिवाय तो पहिल्यापासून माझं नांव असं काळचा यादींत घालता ना ? ) पण नांवानं नव्हे; व्यक्ति म्हणून! त्यामुळं 'असके तमके दप्तरदार येणार' म्हणून ज्या वेळीं त्याचं नांव कळलं त्यावेळीं त्याच्या विषयीं बरी वाईट कुठलीच भावना झाली नव्हती माझी; पण गृहस्थ

समोर येतांच माझ्या विद्यार्थी दशेंतला तो प्रसंग माझ्या दृष्टीसमोर उभा राहिला आणि ही विचित्र विधीघटना पाहून सखेदाश्चर्य वाटलं मला !

त्यावेळचा तो प्रसंग असा होता. पहाटे उठून आळंदीला जावयाचं असं आम्ही चार पांच मंडळींनीं ठरवलं होतं; आणि त्याप्रमाणं चार साडेचार वाजतां घरांतून निघालों आम्हीं. त्यांत आमच्या एका मित्राचा नातलग म्हणून आयत्या वेळीं हे राजेश्री आले होते ! आणि कांहीं वेळानं 'सड-केनं लांब पडेल; मी तुम्हांला शॉर्टकट् दाखवतों' असं सांगून या स्वारीनं आम्हांला जें नेलं तें खडकी ॲम्युनेशन फॅक्टरीच्या प्रवेश बंद हद्दींत ! त्यांच्या म्हणण्याप्रमाणं फाटक ओलांडून आम्ही जो आंत जातों तोंच 'ठैरो · किधर चला है ? जेलमे जाना है क्या तुमकू ?' असं एका डगलेवाल्या लष्करी शिपायानं दरडावून गेटाच्या आंतील बाजूला लावलेल्या मोठ्या पाटीकडं बोट केलं आणि आम्हाला विचारलं 'दिखता नहीं उधर क्या लिखा है ओ ?' त्याच्या म्हणण्याप्रमाणं चार पावलं मागं जाऊन आम्ही तो बोर्ड वाचला आणि 'परवानगी शिवाय आंत येणाऱ्यावर कायदेशीर इलाज केला जाईल' हा त्यावरचा मजकूर वाचून त्या अतिक्रमणाबद्दल आमचं धाबे दणाणलं ! पहिल्या महायुद्धांपूर्वीचा काळ, इंग्रजी अंमल, दारूगोळ्याच्या कारखान्याची हद्द आणि अतिक्रमण करणारीं आम्हीं सारीं पोरं, तेव्हां आम्ही किती घाबरून गेलों असूं कल्पना करा. खेटरं मारल्या सारखें खालीं माना घालून मुकाट्यानं आम्ही तिथून परतलों. पण त्या बहाद्दराला कांहींच वाटलं नाहीं त्याचं! 'च्या आयला, असं झालं कां ?' तिरळा डोळा फिरवून हंसत हंसत तो म्हणाला ! तेंच येडं तात्यासाहे-बांचा भाचा म्हणून वशील्यानं मागं केव्हांतरी कोर्टांत लागलं; आणि नंतर नंबर येतांच आमचा ऑफीसर म्हणून आमच्या उरावर येऊन बसलं! काय म्हणावं या विधि घटनेला ? वशीला की जय ! दुसरं काय ?

पण आतां त्याला मागची आठवण देऊन येडं म्हणायची सोय होती कां ? आर्य पतीव्रतेचा नवरा जगाच्या दृष्टीनं कितीही मूर्ख असला तरी तिनं त्याला परमेश्वर मानावा असा दंडक. त्याप्रमाणं अधिकाराच्या खुर्चीं-वर कोणी फुडतुस माणुस जरी येऊन बसला, त्याचों जोड्याजवळ उभं राहाण्याची जरी लायकी नसली तरी गादीला मान दिला पाहिजे अशी

राजाज्ञा नव्हे, वरिष्ठ आज्ञा होती. नावांपुढें साहेब लावणं हा तर शिरस्ताच पडून गेलेला. त्याप्रमाणं कोणा तरी भाच्याचा मामा असणारं तें गुणी बाळ दप्तरदार होतांच साऱ्या कोर्टाचं मामासाहेब झालं !

तसं तें खरंच मोठं गुणीबाळ होतं ! त्याच्या अंगचे अनेकानेक गुण जसजसें प्रत्ययाला यायाला लागले तसतसं वाटलं देवा, आमचा छळच करायचा होता तुला, तर याच्यासारख्या नालायक माणसाची त्या कामीं योजना केलीस त्या ऐवजी तो निदान लायक माणसाकडून तरी करावयाचा होतास !

खरोखरच तो अगदीं नालायक माणुस होता. ऑफिसर असून देखील खोटं बोलण्याचं त्याला कांहींच वाटत नसे. त्याच्या सेक्शन पुरता हजेरीबुकाचा सर्वाधिकारी तोच असल्यामुळं स्वतःची दुसरे दिवसाची हजेरी आदलें दिवशींच संध्याकाळीं त्यानं मांडावी. तर त्याच्या काळ्या यादींत ज्यांचीं नांवं होती त्यांच्या नांवापुढं उशीराबद्दलच्या तांबड्या रेघा माराव्यात. त्यामुळं तो माणुस वेळेच्या आंत येऊनही जाबजबाबचं सव्यापसव्य करण्याची त्यांच्यावर वेळ यावी ! बरं खोटं त्याच्या माथीं मारलंच कुणी, तर कधीं हँ हँ ' करीत हंसून थट्टेवारी न्यावं त्यानं. तर कधीं 'डिस्ट्रिक्ट जज्जाची चूक क्लार्क ऑफ दी कोर्टनं काढायची असते का? ' असं उलट निर्लज्जासारखं त्याचं समर्थन करावं !

बाकी सगळ्या बाबतींत तो नालायक असला तरी फायद्याच्या गोष्टी चांगल्याच कळत असत त्याला. त्यासाठीं तो मिळेल तिथं खात असे; आणि तें खाण्यासाठीं संधी येईल तिथं पेटवीत असे ! 'आतां तें पेटलं !' हें त्याचं परवलीचं वाक्य ठावूक झालं होतं साऱ्यांना. तें ऐकलं लोकांनीं कीं समजावं याचं पोट दुखायला लागलं म्हणून! तसंच त्यानं 'पोट दुखतंय बुवा! ' म्हणून पोटावरून हात फिरवला म्हणजे आतां याची पोटदुखी थांबवण्याची व्यवस्था झाली नाहीं तर हमखास हा कुठं तरी 'पेटवणार' ! अशी धास्ती वाटायची मंडळींना ! पण हें जसं ठरलेलं असे तसा त्यावरचा उपाय



ग्रंथालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

यही ठरलेलाच असे. आणि तो म्हणजे त्याला हॉटेलमध्यें दाबून खायला घालून थंडा करून आणणं !

असं कांहीं करायचं त्याच्या मनांत आलं म्हणजे त्यानं वरून (सी. ओ. सी. चं ऑफीस जज्जांचीं कोर्टं वगैरे साऱ्याीं माडीवर असत ) येतांना एकाद्या अगदीं किरकोळ गोष्टीला गंभीर स्वरूप आणून संबंधीताला घाबरवून सोडण्यासाठीं म्हणावं 'छे बुवा! मी पुष्कळ सांगितलं पण साहेब कांहीं ऐकत नाहींत. (या वरच्या लोकांनीं खालच्यांना हुकमतींत ठेवण्यासाठीं त्यांच्यावर हवी तशी दडपशाही करावी आणि तें साहेबांवर ढकलावं कीं संपलं! त्यांची खात्री असते कीं 'कोण लेकाचा साहेबांपर्यंत जातो आहे?' अन् हें अगदीं खरं आहे. उगीचच साहेबाचा बाऊ वाटत असतो या खालच्या नोकरांना. जणू काय तो वाघसिंह असून त्याच्यापुढं आपण गेलं कीं तो आपल्याला गट्ट करून टाकील! म्हणून त्याच्याकडं जायाला सहसा कोणी धजावत नाहीं. आणि हें ओळखूनच 'साहेब म्हणतात'चे पालुपद दुय्यम अधिकारी वरचेवर घोळून घोळून म्हणत असतात. यापासून त्यांचा दुसरा फायदा असा होतो कीं करून सवरून नामानिराळं राहाता येत त्यांना. ) आतां तें पेटलं !'

अशा वेळीं त्याच्या विशेष घसटींतली जी दोन तीन मंडळी होतीः त्यां- पैकीं कुणी तरीं एकानं हंसत हंसत चेष्टेन म्हणावं 'मग आज कोणाची आहुति पडणार?'

'कोणाचीही पडू शाहो. टाका तुम्ही विझवून मामासाहेबांना कॅंटीनमध्यें नेऊन म्हणजे झालं !' दुसऱ्यानं त्यावर म्हणावं.

तें ऐकून थोडं शरमल्यासारखं होऊन तो म्हणायचा 'हः ! हें काय खरंय् ? आम्ही काय खाण्यासाठीं पेटवतों वाटतं ?'

'छे हो ! असं म्हणतो कोण मामासाहेब तुम्हांला? तुम्ही कां उगीच मनाला लावून घेता ? हे मघाशीं म्हणत होते 'मधल्या सुट्टीत हॉटेलमध्यें जाऊ म्हणून.' तेव्हां मी त्यांना म्हटलं 'थांबा मामासाहेबांना येऊ द्या' म्हणून. चला जाऊन येऊ आपण. तो कार्यक्रम उरकला म्हणजे आपलं कामाला लागायला बरं. खरं कीं नाहीं? उठा तर मग.'

असं म्हणण्याचाच काय तो अवकाश कीं उठलाच बाळ खुर्चीवरून! मग तिथं एकदा व्यवस्थित झालं म्हणजे पोटावरून हात फिरवीत म्हणावं त्याने ' दॅटस् ऑल राईट ! '

पण त्याचा अर्थ एवढाच असे कीं पोटाचं भागलं. पण वरची दक्षिणा ? त्यासाठीं वेगळे प्रयत्न असत त्याचे. पक्षकार त्याच्याकडं येतांच पहिल्यानंच तो खूप ओरडायचा त्याच्यावर. आणि मग त्यानं चिरीमिरी पुढं केली म्हणजे त्याचा आवाज एकदम नरम पडायचा. त्याला प्राप्ती झाल्याची ती खूण पुढं पुढं जशी ओळखली मंडळींनो, तशी अशा वेळीं तीं एकमेकांस खुणवाखुणवी करून हंसायची. तें त्याच्या ध्यानांत आल्यानंतर त्यानं त्या पद्धतींत सुधारणा केली. ' मग आधींच नव्हतं कां तसं सांगतां येत? ' असं कांहीं तरी त्यानं त्या पूर्वींच्याच चढ्या आवाजांत म्हणावं. हेतु हा कीं भोंवतालच्यांनीं समजावं ' सांगणाऱ्या माणसानं प्रथम अपुरी किंवा चुकीची माहिती दिली होती ती आतां पुरी किंवा बरोबर दिली. ' पण एकदा तो प्रयोग चांगलाच त्याच्या अंगावर उलटला ! पक्षकारही तितक्याच आवाजांत म्हणाला ' काय सांगायचं होतं हो आधीं? हे आठ आणे घ्या म्हणून?' त्याबरोबर एकदम त्याचा आवाज खालीं आला आणि त्यानं हातानं खुणावीत त्या माणसाला गप्प केलं. त्या बरोबर खूपच हशा पिकला मंडळीमध्यें. त्यावर थोडं ओशाळून तो म्हणाला, ' च्या आयला तुम्ही म्हणजे अगदीच हे आहात ! '

अकलेच्या नावानंही पूज्यच होता तो! साधे फीचे हिशोब ते किती? पण ते तासन् तास करीत बसून देखील कधीं कधीं जमत नसत त्याला. त्याचं दुसरही एक कारण होतं म्हणा कांहीं वेळेला गडबडींत सरकारी फीही खाजगी मिळकती बरोबर खिशांत जात असे त्याच्या ! तर कित्येक वेळीं आपली मिळकत खिशांत घालतांना समोर बसलेल्या तिऱ्हाईत प्रतिष्ठितानं पाहू नये या भीतीनं ड्रॉवरमध्यें टाकायचा तो आणि मग हिशोबाचे वेळीं आपली प्राप्ती किती आणि फीची रक्कम किती याचा पडायचा घोळ आठवणीच्या अभावी !

कांहीं वेळां मूर्ख माणूस अंतःकरणानं चांगला असलेला दिसतो. पण इथं तेंही नव्हतं. कोणावरच्याही आपत्तीनं केंव्हांही द्रव येत नसे त्याला.

आणि एखाद्यावरचा दु:खाचा किंवा आपत्तीचा प्रसंग ऐकतांना 'होय ना ? असं ना ?' असं वरवर जरी सहानुभूतीच्या स्वरांत म्हणत असला तरी अंत:करणांत सहानुभूतीचा लवलेशही नसायचा त्याच्या. त्याचा आणखी एक स्वभाव विशेष म्हणजे कमालीचा खुनशी होता तो. काय आश्चर्य आहे पहा, असं असतांनासुद्धां तो अधिकारी म्हणून आमच्या डोक्यावर मिरे वाटीत होता! त्याच्या या क्षुद्रवृत्ति पाहुन असं वाटायचं कीं ऑफीस मध्यें अधिकाऱ्याकडून खालच्या लोकांना सर्रास लबाड लेखलं जाऊन त्यांच्या सह्या प्रतिज्ञापत्रें वगैरेंच्या खालीं अशा या विश्वासार्ह (!) मंडळींच्या सह्या झाल्याशिवाय त्या लोकांचा खरेपणा ग्राह्य धरला न जाणं यापरती सत्याची दुसरी घोर विटंबना तो कोणती ?

अमक्या वयांत इतकं वजन असावं; तमक्या वयाला इतका उंची असावी असं सारं कांहीं हिशोबांत बसवून शास्त्र बनवलं आहे त्याचं. पण ज्याप्रमाणं इंग्लंड अमेरिकेंतल्या माणसाच्या उंचीच प्रमाण चीन जपान मधल्या माणसाला लागू पडायचं नाहीं. त्याप्रमाणं इंग्रजी राजवटीपासून सरकारी नोकराच्या बुद्धीची उंची परीक्षेवरून आणि मनाची उंची अधिकारपदावरून ठरली आहे. पण भारताच्या सध्याच्या बदलत्या हवामानाला ती मिळती जुळती नाहीं. इतकच नव्हे तर कित्येक बाबतींत असं दिसतं कीं माणूस अधिकारपदावर जितका जितका वरवर चढत जातो तितकी तितकी त्याची नैतिक पातळी खालीं खालीं जात जाते ! आणि त्याचं कारण अगदीं उघड आहे. माणूस जितका जितका मोठा होत जातो तितकी तितकी त्याची भूक ही वाढत जाते ना ? जाऊं द्या झालं ! पण हेच विचार पुढं चालू झाले म्हणजे असं वाटतं. आज शंभर वर्षांच्यावर मालकीनं वहिवाटणाऱ्या शिरजोर भाडेकऱ्याचा घरावरचा ताबा उडवला खरा; पण घराची धुळधाण करून गेला तो !'

माझी स्वाभिमानी वृत्ति त्याच्या डोळ्यांत सलत होती म्हणून कीं अन्य कांहीं कारणामुळं माझा मानभंग करायला केव्हांचा तरी तो टपून बसला होता; पण अद्यापपर्यंत तरी मी त्यांच्या तडाख्यांत सांपडलों नव्हतों. ती संधी त्याला एकदाची मिळाली. त्या वेळीं हेडसेक्शनर म्हणन माझी नेमणुक झाली होती; आणि हे राजेश्री हॉटेलमध्यें गरगरीत झाल्यामुळं पोटावरून

मधून मधून हात फिरवीत मीं दिलेल्या हिशोबाच्या कच्च्या खर्चाचा आणि आपल्या जवळच्या फीच्या पैशांचा मेळ घालीत बसले होतें. आणखी नेहमी प्रमाणंच हिशेब कांहीं जमत नव्हता. अशा स्थितींत मध्येंच त्यानं मला विचारलं 'त्या अमक्या तमक्याची पावती दिसत नाहीं हो ?'

मी जागेवरूनच उत्तर दिलं 'अहो आपण त्याला पैसे परत दिले. त्याची पावती कशी होणार ? '

'बरं बरं जास्त शहाणपणा शिकवू नका मला ' त्याचा मूर्खपणा चार मंडळींत उघड झाल्यामुळ चिडून तो म्हणाला. नंतर कांहीं वेळानं पुन्हा त्यानं विचारलं, 'मघाच्या त्या व्ही पी च्या रक्कमा दिसत नाहींत यांत?'

' व्ही. पी. आज पाठवलीय तो आल्या शिवाय रक्कम कुठली जमा करायची ? ' पुन्हा मुर्खपणा बाहेर आला त्याचा. आतां मात्र त्याच्यानं स्वस्थ राहावलं नाहीं.

' तुमचा चार्ज उद्या जोशांना द्या. तुम्हांला जमत नाहीं हें काम. ' तो म्हणाला. त्यावरूल आपली नालायकी लपवून मला तो नालायक ठरवू पाहातोय् हें कोणाच्याही ध्यानांत आलं असतं. पण सत्तेपुढं दुबळं शहाणपण काय करणार ? ' बरंय् मी म्हणालों. त्यानतरही त्यानं पुन्हा कांहीं तरी विचारलंच मला. पण त्यावर मी सरळ उत्तर न देता 'बघा तुमचे तुम्ही' असं रागांतच म्हणालो. आणि त्याबरोबरच 'बरंय् बघतो आं' असं 'दम भरावा अशा आविर्भावांत तोही म्हणाला. तेवढ्यांत एक गृहस्थ नक्कल घेण्यासाठीं आला. तो आधींच इतर ठिकाणचीं बिलं बुजवण्यांत खिसे खालीं करून आला होता वाटतं. त्यामुळं सडकेवर वेगवेगळें अपघात होऊन सायकलची मोडतोड आणि अंगावर जखमा झालेला सायकलस्वार खेटरं मारल्यासारखा चेहरा करून चालला असता, सहज समोर आलेल्या पोराच्या तोंडांत उगीचच भडकावून देतो; त्याप्रमाणं मी त्याला हिशोब बंद झाला म्हणून सांगतांच तो जो माझ्यावर भडकला तो कांहींच्या वाहींच ! ' मी आज चार दिवस येतो आहे आणि तुम्हीं मला दररोज वेगवेगळ्या थापा देता. तुम्ही असं कां करतां तें मी ओळखतों; पण प्रत्येक ठिकाणां पैसे फेकायला मी कांहीं कुबेर लागून गेलों नाहीं ' वगैरे प्रकारची त्यानं बडबड केली.

चार दिवस येत होता. तसंच त्याला वेगवेगळीं कारणं सांगितलीं जात होतीं या गोष्टी खऱ्या. पण त्या थापा नव्हत्या; तर त्या त्या वेळची ती खरीखुरी परिस्थिति होती. आणि त्यानं जें शेवटीं त्याचं कारण पुढं केलं तें तर साफ खोटं होतं, मला तुमच्याकडून पैसे हवें आहेत; आणि म्हणून मी तुमचं काम लांबणीवर टाकतो आहे, असं तुम्हो कशावरून म्हणता? मी तसं तुम्हांला शब्दानं कृतीनं किंवा अन्य कांहीं साधनानं व्यक्त केलं का?' मी शांतपणें त्याला विचारलं.

'तसं सांगायला कशाला पाहिजे? कळत नाहीं काय आम्हांला?' त्याचा आवाज चढलेलाच होता.

आमची चाललेली ही बोलाचाली ऐकून दप्तरदारानं त्या माणसाला आपल्या टेबलापाशीं बोलावून घेतलं; आणि आधीच्या प्रकारानं चांगला भडका उडायचा नाहीं म्हणून कीं काय त्यांत बाणखी इंधन घालावं या विचारानं त्याला 'लेखी तुमचं काय जें म्हणणं आहे तें द्या' म्हणून सांगितलं' पण त्यार तो म्हणाला ' मला नक्कल मिळाल्याशीं कारण, मला काय करायचं तुमच्या या ऑफीसच्या भानगडींत पडून? ' त्यामुळं त्याचा नाइलाज झाला.

या साऱ्या भानगडींत हिशोब जमलाच नव्हता अजून आणि तो जमण्याचींही चिन्ह दिसत नव्हतीं. तिकडं नाझरचे तर निरोपावर निरोप येऊन राहिले होते; हिशोब आणि पैसे पाठवून देण्याबद्दल अशा स्थितींत आपली फजीती मला दिसायला नको म्हणून तुम्हाला लवकर जायाचं होतं ना? जा हवं तर ' असं तो म्हणाला, आणि पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी घरीं निघून गेलों.

दुसरे दिवशी मी ऑफीसमध्यें वेळेंच्या आंत येऊन देखील माझ्या नावांपुढं उशीराची तांबडी रेघ आणि माझ्या मागून आलेल्या कांहीं मंडळींची हजेरी लागलेली पाहून त्यांनं मला आदले दिवशीं सुटी देण्याचं सौजन्य दाखवलं त्यांतला कावा पुरतेपणी उमगला. मी अशा मनस्थितींत असतांच ' आतां तें पेटलं ' असं सांगतच तो गृहस्थ खालीं आला.

' काय आणि कोणाचं पेटवलं यानं ? ' याची खात्री झाल्यामुळं मी त्याच्या टेबलापाशीं जाऊन म्हणालों ' पण मी तर ऑफीस टाइमच्या आंत आलों होतों !

' तें साहेबांना सांगा. '

' तुम्ही तर आतां येता आहां; मग इतक्या लवकर हजेरी गेली कशी वर ?- मी.'

' कोण म्हणतो मी आतां येतो आहे म्हणून ? मी मघाशीच आलो आहे आणि हजेरी साहेबांनीं मागितल्यावरून वर पाठवली ' तो म्हणाला उशीराबद्दल तुमचा लेखी जबाब मागितलाय् साहेबांनीं ' नंतर त्यानं मला फर्मावलं.

' पण मी वेळेवर आलों होतों. त्याच्या आधींच कोणी तरी ती खूण केलेली आहे. '— मी.

' तुम्ही कांहीं तरी सांगतां '— तो.

त्यावर मी खोंचकपणें विचारलं ' खूण साहेबांनीं केली कीं तुम्ही ?'

' त्याच्याशीं तुम्हांला काय करायचंय् ? तुम्हांला जबाब मागितलाय जबाब द्या. '

' पण मी वेळेवर आलों होतों; पुन्हा सांगतों. '

' तुम्ही खोटं बोलतां ' तो म्हणाला.

तें ऐकून मला इतकी चीड आली कीं त्यां सपाटयांत मी बोलून गेलों ' खोटं मी बोलत नाहीं. तुम्ही बोलता ' म्हणून

झालं. ज्या संधीची तो वाट पाहात होता ती संधी अनायासें त्याला मिळाली. ' कोणापुढं बोलता तुम्ही ? अधिकाऱ्याचा अपमान करायला वाटत नाहीं तुम्हांला कांहीं ? आधीं जबाब द्या याचा. मग तो, मला रिपोर्ट केलाच पाहिजे तुमच्याबद्दल. '

तें ऐकून जागेवर जाऊन बसण्यासाठीं मीं तोंड फिरवलं. त्यावर ' आणता ना लिहून जबाब तुमचा ?' त्यानं मला प्रश्न केला.

' जवाब तुमच्या जवळ देतां येत नाहीं मला. साहेब मागतील त्यावेळीं बघेन मी '—मी.

' मग्रुर माणसा, मी अधिकारी तुला सांगतों आहें ना,जबाब दे म्हणून ? दे म्हटलं; दिला पाहिजे तुला. '

' जरा सभ्यपणानं बोलाल कां ?'

तें ऐकून तो जरा वरमला. पण चढेलपणा कायमच होता त्याचा. ' सभ्यपणानं काय बोलायचं तुमच्याशीं ? पहिल्यापासून ओळखून आहें मी तुम्हांला !'

त्यावर मी कांहीं एक न बोलतां जागेवर जाऊन बसलों.

थोडया वेळानं शिपायामार्फत पुन्हा निरोप आला त्याचा ' जबाब द्या. नाहीं तर तो देत नाहीं असं लिहून द्या. '

झाला हा प्रकार पाहून ' आधींच माफी मागून मोकळे झाला असता तर तिथंच मिटलं असतं ' असं म्हणून कोणी कोणी हळहळले. तर उगीच चिडीला नेलंत प्रकर्ण तुम्ही. आतां फार जड जाईल तुम्हांला ' म्हणून कांहींनी भीति घालली मला. एकदां वाटलं साहेबांना समक्ष भेटून सारं सांगाव. पण पुन्हा विचार केला ते म्हणायचे 'ऑफीसमार्फत आलं म्हणजे मी बघेन. आणि ऑफीस तर आपल्याला सुळावर द्यायला बसलें रं ! एकं-दरीत तो प्रसंगच असा बाका येऊन ठेपला होता कीं एक तर स्वाभिमान-शून्य बनून त्याच्यापुढं नाकधुऱ्या तरीं काढायसा हव्यात; नाहीं तर नोक-रीवर लाथ मारून बाहेर तरी पडायला हवं. याशिवाय तिसरा मार्ग नाहीं असं वाटलं.

गडकऱ्यांचा सुधाकर म्हणतो ' रात्रीं दारु प्याल्याची घाण ज्यांच्या तोंडची अजून गेली नाहीं त्यांनीं दारु सोडण्याचा उपदेश करावा!' त्या प्रमाणं ज्यांची नि खरेपणाची उभ्या आयुष्यांत कधीं गांठभेट झाली नाहीं; सारं आयुष्य लबाडया करण्यांत नि खोटं बोलण्यांत घालवलं ज्यांनीं, त्यांनीं आपल्याला खोटं बोलता म्हणावं ! काय म्हणावं याला ? आंतले आंत खूप संताप झाला होता. पण तो सारा गिळून स्वस्थ बसणंच भाग होतं मला.

त्या दिवशीं जरी माझं मन सांगत होतं कीं कनिष्ठाची तक्रार वरिष्ठाच्या कानावर घातली तरी तें शेवटीं आपलं बोलणं यत्किंचितही मनावर न

घेता आपल्या हाताखालच्याच माणसाचे हितसंबंध पाहाणार ! अशा स्थितींत त्यांच्याकडं जाण्यांत तरी काय अर्थ आहे ?' तरी दुसरे दिवशीं मी मनाचा हिय्या केला आणि साहेबांच्या बंगल्यावर त्यांची भेट घेऊन सर्व हकीगत त्यांच्या कानांवर घातली.

त्यांनीं माझं सर्व बोलणं शांतपणें ऐकून, घेतल्यानंतर 'मग तुम्ही ही हकीगत C. O. C. ना कां सांगितली नाहींत ?' म्हणून विचारलं.

'त्यांनीं माझं म्हणणं मनावर घेतलं नसतं' मी म्हणालों.

'नसतं घेतलं तर नसतं घेतलं; पण निदान वस्तुस्थिति काय आहे ही तरी समजली असती तुमच्या तोंडून त्यांना ?'

'खरं आहे, आपण म्हणता तें'

'अजूनही भेटून सांगा त्यांना हें. आणि दप्तरदार मागतात तर द्या त्यांना जबाब लिहून'

'पण आपण-- '

'बघेन मी माझ्याकडं आलं म्हणजे'

आतां साहेबांनीं सांगितल्यांमुळं C. O. C. कडं जाणं भागच होतं मला. त्याप्रमाणं त्यांच्या घरीं जाऊन सांगण्या इतका वेळ ऑफीसला उरला नव्हता म्हणून मी ऑफीसांत जातांच अगदीं सुरवातीलाच त्यांच्याकडं गेलों. पण ते उद्योगांत असल्यामुळं त्यावेळीं त्यांची गांठ पडूं शकली नव्हती. म्हणून मी फिरून मधल्या सुटींत जाऊन त्यांना भेटलों. माझी गांठ पडण्या आधींच मी साहेबांना भेटून आल्याचं त्यांना कोणाकडून तरी समजलं होतं वाटतं. त्यामुळं मला पाहातांच त्यांनीं एकदम विचारलं 'साहेबांच्याकडं गेला होता वाटतं ?'

'होय.'

'इकडं न येता एकदम तिकडं कां गेलांत ?'

‘त्या बाबतींत आपण कांहीं केलं नसतं असं वाटलं म्हणून गेलों होतों !’

हो. मी कांहीं केलं नसतं हें खरं ’

‘तर मग उघड उघड अन्याय आहे हा !’

‘असेल. पण तुम्हांला नोकरी करायचीय ना इथं ? मग तो सोसला पाहिजे. अधिकारी आहेत तें. ऐकून घेतल पाहिजे त्याचं काय म्हणतील ते. कां त्यासाठीं साहेबांकडं जायचं ? त्यांच्या जवळ तुमचं खरं करायला गेलांत नि नाहक नकसान करून घेतलंत तुमचं !

‘माझं नुकसान होण्याचं कारण ? ते तर माझ्याशीं व्यवस्थित बोलले की ’

‘अस्सं ? अन् ते तसं बोलले म्हणून तुम्ही दप्तरदारांना खोटं ठरवणार ! पण ध्यानांत ठेवा तें कसं केलं तरी एक अधिकारो आहेत ! आणि तुम्हीं आहात यःकश्चित उमेदवार! तेव्हां तुम्हीं आपली पायरी ओळखून वागा इथून पुढं समजलात ना ? ’

‘मी माझ्या पायरीवरच उभा आहे. अप्पासाहेब ’

‘फार बोलता हो ? इथं राहचचंय् कीं जायचंय् ?’

‘तशी वेळ आली तर जाईनही. पण माझ्यां स्वाभिमानाला धक्का लागू द्यायचा नाहीं मी. ’

‘असं ! तुमच्या स्वाभिमानाच्या कल्पना बऱ्याच बेफाट सुटलेल्या दिसतात ! त्याना वेळींच लगाम लावला नाहीं तर इतरांच्या पुढं तें वाईट उदाहरण ठेवल्यासारखं होईल. ‘सो आय् मस्ट टीच यू ए लेसन ’ इतकं बोलून त्यांनीं आपल्या कामांत लक्ष घातलं; आणि तें पाहून खिन्न मनःस्थितींत मी बाहेर पडलों.

‘वार्निंग मिळालं ना पाहिजेच तसं. नाहीं तरी तुम्हीं लोक फारच आगांव झालात ?’ मी बाहेर पडतांच पट्टेवाल्यानं तारे तोडले. मी त्याच्याशीं एक शब्दही न बोलता तिथून निघालों.

घडलेली हकीकत ऑफीसांत येतांच कर्णोपकर्णी साऱ्यांच्याच कानांवर गेल्यामुळें सकाळपासूनच आमच्या खोलींतलंसारं वातावरण कुंद होतं. अशा स्थितींत माझ्याशीं बोलायला कोणी

तयार नव्हता. आणि माझा अकारण मानभंग झाल्यानं अंतःकरणांत अपमानाचं शल्य बोचत असल्यामुळं मीहीं कोणाशीं कांहीं,एक न बोलता अधोवदन स्थितींत मुकाट्यानं माझ्या जागेवर बसलों होतों. परिस्थितीची भीति वाटत नव्हती तर मला असत्याची चीड आली होती ! पण राज-वाड्यांत नाटकशाळा होऊन राहिलेल्या स्त्रियांना एखाद्या मानिनीला भ्रष्ट करून त्यांच्यांत नेऊन सोडल असता जितका आनंद होईल तितका आनंद त्या मंडळींना झाला होता. आणि त्यामुळं कांहीं तर मला टोचून बोलून माझे वाभाडे काढण्यासाठीं टपून बसले होते अगदीं.

माझ्या त्या मनःथितींत मला कोणाशीं काहीं बोलावसं वाटत नव्हतं; पण अपराध्यासारखं खालीं बघत स्वस्थ बसणही जड जाऊ लागलं; म्हणून समोरच्या डेस्कवरच्या कागदावर मी कांहीं तरी खरडीत होतों; इतक्यांत आमच्या खोलीचं दार लोटून गुंड्यानं आंत प्रवेश केला. गुंड्या म्हणजे आमच्यातलं अगदी इब्लिस वाळं ! केव्हां कोणाला तो काय बोलेल नि लाजेनं त्याला खालीं बघायला लावील याचा कांहीं नियम नसायचा. त्या प्रमाणं आंत येतांच त्यानं आमच्यावर हल्ला केला. ‘ऐका, मंडळी ऐका. गोष्ट सांगतों तुम्हांला एक. एक होता पोपट.उडता उडता त्याला दिसला पिंजरा. आंत चांगले चांगले खाद्यपदार्थं मिळतील असं वाटलं. नि त्या मोहानं तो त्या पिंजऱ्यांत पडला. पण त्यांत पडल्यापासून उपास-मार सुरू झालीं त्याची. झाडावरचं स्वातंत्र्य गेलं नि पिंजऱ्यांत खायाला मिळेना. तो पिंजऱ्यांत पडला त्या वेळीं ते स्वातंत्र्याचे बोल ‘दोनशें वर्षे शेळी होऊन जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन दिवस जगणं बरं–काय पण गोड बोलत होता तो! ते बोल बहिरे कानाला हात लावून ऐकत तर चष्मेवाले आपल्या चष्म्याच्या काचा पुसून त्या वेळचा त्याचा आविर्भावयुक्त मुखडा न्याहाळीत! एरवी पोपटाला पिंजऱ्यांत बोलावयाला शिकवतात; पण याला येत असलेलें बोल कसे विसरेल हा, असं मालकाला वाटत होतं. कारण त्याला ते ऐंकायला नकोसं झालं होतं. तो पोपटही बाहेर पडण्यासाठीं पिंजऱ्याचे गज चोचीनं कुरतडण्याचा प्रयत्न करीत होता. मालकानं तें पाहून पंखच उपटून टाकले त्याचे ! आतां त्याची ती केविलवाणी फडफड बघवत नांहीं हो ! ’

' अरेरे ! फारच वाईट ! धोडोपंत त्यावर म्हणाले.

' थू तेच्या जिनगानीवर ! 'गुंडचा

' अरे तुला कांहीं काळवेळ कळतो कां नांहीं ? वाकडे

' राया तुला रे का वेळ नांही रे । राया तुला रे ताळमेळ नांहीं !' मला तो उद्देशून म्हणाला!

'वा बुवा ! धोंडोपंतांनीं त्याला प्रशस्तीपत्र दिलं.

' भडव्या, काय तमाशा चाललाय काय इथं ? गुंडचांनं त्यानां उलट आहेर केला आणि काय दोस्त? 'म्हणुन माझ्यामागं येऊन बसला तो. स्वारीनं आमच्या पाठीवर थाप मारुन 'काय चालले आहेत उद्योग? असं म्हणत नंतर त्यानं मीं लिहिलेला मजकुर माझ्या पाठीवरून ओणवून वाचला, मी त्याला मुळींच विरोध केला नाहीं. तें वाचून होताच ' मंडळी ऐका पोपटाचे हेनवे बोल ऐका.हा इथं लिहितोय 'भग्नदंत हरी करुनि तयाचीं तीक्ष्ण नखें जरि काढियलीं । दुर्बल रिपु जरि निर्भय झाले तळमळ त्याची कां शमली—'? पण मी यांना असे विचारतों कीं काय हो राजेश्री, आता असे तळमळत बसलात नि असले केविलवाणें सूर काढता, तें आपलं शहाणपण त्या वेळीं कुठं गेलं होतं ? ' च्या आईला भडव्याच्या !' असं म्हणायचं होतंस त्याला हवं तर– आम्ही सुद्धां म्हणतों; पण मागं. कां तोंडावर बोलायचं असतं असं ? छे कोणचा अधिकारी क्षमा करील याला ? अहो, किती झालं तरी अंमलदार आहे तो ! अन् त्याचा उपमर्द करायचा ? तो गाढव असला तरी गादीचा मान राखला पाहिजे ! त्यानं नुसतं डोळे वटारून जरी आपल्याकडं बघितलं तरी त्याच्यापुढं हात जोडून म्हणायला हवं त्याला ' चुकलं माफ करा. मुस्कटींत मारा माझ्या. तुमचा हात दुखेल म्हणून मीच माझ्या हातानं मारून घेतों ! तें सारं राहिलं बाजुलाच ! नि तुम्ही त्याला चक्क म्हणालात ' तुम्ही खोटं बोलता म्हणून ! शांतं पापं ! शांतं पापं ! काय रे माकडचा, ( वाकडयांना तो नेहमीं माकडचा म्हणायचा ) मी म्हणतों ते खरं कीं नाहीं ?'

' अगदीं खरं' असं कुठं बोलतात काय ? भलतंच !'— वाकडे.

' अहो, इतकंच करून हा थांबता तरीं हरकत नव्हती, पण हा आपला

तो गाढवपणा–शहाण्याचा गाढवपणा कसा म्हणायचा ?–शहाणपणा सांगायला साहेबांकडं गेला ! अरे पण लेका, आधीं उंटाच्या x x चा मुका घ्यायला जावं कां ? नि मग असं रडत बसावं कां ? डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणजे काय तुझा बाप लागून गेलाय्, म्हणून लाडंलाडं त्याला सांगायला गेलास ? त्यानं चांगली लाथ मारली ! आतां बसले गालफडं चोळीत !'

'हें कुणी सांगितलं आपल्याला ?' मी त्याला विचारलं.

'खोटं आहे कां ?' त्यानं उलट मला प्रश्न केला.

'रुटरच्या बातमीदाराची बातमी खोटी कशी असेल ?' त्यावर धोंडोपंत म्हणाले.

'पण गुंडोपंत आपल्या या प्रवचनाच्या नादांत मघाचं आपलं काव्य तसंच राहून गेलं कीं ' ते म्हणाले.

दॅटस् ऑल राईट ! बरी आठवण केलीस धोंड्या. मघाशीं चांगलीच सुरसुरी आली होती मला काव्य करण्याची. ती प्रतिभा कां काय म्हणतात ना, ती स्फुरली होती बघा;

'मग अजून येईल कीं. आपण आणली म्हणजे येतें !— धोंडोपंत

'तुझ्यासारख्या दगडा धोंड्याचं काम नाहीं तें. त्याला माझ्यासारखे (माझ्या पाठीवर थाप मारून) नाहीं तर यांच्यासारखे बेदाणे लागतात ! ऐका मंडळी, तुमची इच्छा आहे तर म्हणतों ऐका.

'कशि काढलास मुक्ताफळं ?
आतां भोग तू त्याचीं कडुफळं !

राया केलास घटकेचा खेळ रे
कशि उडवलि तापलेली धूळ
रडुन रडुन डोळे रे सुजतील !

माझ्या रायाचं पिकलं गळू रे
आतां तुला रे कसं सांभाळू
फुटलं म्हणजें ठणाणा करशील

'पुरे कां मंडळीं ? कां आणखी पाहिजे ?'

'आणखी होऊं द्या' कांहीं आवाज.

'नाहीं बस. प्रतिभेचं पेट्रोल संपलं ! तेव्हां गाण्याची गाडी बंद ?' असं गुंड्या म्हणायला नि आप्पासाहेबांनीं शटर उघडून आंत डोकावून बघायला एकच गांठ पडली.

'काय, गुंडोपंत काव्यगायन चाललंय् तुमचं कां व्याख्यान देत आहा ?' त्यांनीं गुंड्याला विचारलं.

'नाहीं. तसं कांहीं नाहीं. एका सिनेमांतलं सांगत होतों त्यांना'

'सांगा सांगा' असं म्हणत त्यांनीं शटर सोडून दिला आणि खालच्या मोकळ्या भागांतून मंडळीना त्यांचीं पावलें दप्तर कचेरीकडं वळलेलीं दिसलीं.

त्या बरोबर 'काय भानगड आहे हो?' धोंडोपंतांनीं शंका प्रदर्शित केली

'आतां तें पेटलं !' गुंड्या म्हणाला.

'एक पेटतंय् नि दुसरं विझतंय्' वाकडे म्हणाले.

ही आपलीच कारवाइ दिसतेय् महाराज' धोंडोपंत

'आम्हांला काय तेवढेच उद्योग आहेत वाटतं ?' वाकडे.

'तुम्हांला उद्योग पुष्कळच आहेत हो, माहीत आहे आम्हांला. पण ते उद्योग करता करतांच सहज काडी टाकलेली दिसतेय् हीं अप्पासाहेबांचे भेटींत. असं, पंत म्हणाले. आणि त्यावर 'कुणास ठावूक बुवा?' अशा अर्थीं वाकड्यांनीं आपल्या उजव्या हाताचा तळवा केला; आणि त्यानंतर कोणी सह्या करितां नकला टाकायला म्हणून, तर कोणी दौतींत शाई भरून घेण्यासाठीं म्हणून अशा वेगवेगळ्या निमित्तानं प्रत्येकान रेकॉर्ड ऑफीसमध्यें प्रवेश केला.

'काय मिस्टर दॅटस् ऑल राईट, इज इट ऑल राईट ?' अप्पासाहेबांनीं खालीं पाहून हिशोब जमवण्यांत गढून गेलेल्या दप्तरदाराला प्रश्न केला. त्यांच्या अकल्पित आगमनानं प्रथम तो भांबावला. पण लगेंच स्वतःला सावरून घेत 'एस. ऑफ कोर्स ! असं म्हणून अप्पासाहेबांना मान देण्यासाठीं उभा राहात असतांना तो म्हणाला 'तुम्ही आल्याचं कळलच नाही बरं कां मला.'

'पैसे काढ घालीच्या गडबडींत नसेल कळून आलं' मिश्किलपणें हंसत अप्पासाहेब म्हणाले.

'मला मोड करून घ्यायाची होती. अनायासें ती होती इथं. म्हणून खिशांतली नोट त्यांत ठेवली नि यांतले पैसे खिशांत घातले

'अहो तें कुठे विचारलं मी तुम्हालां ? अन् हे काय हिशोब तुम्ही लिहिता वाटतं ?'

'हां तें सध्या माझ्याकडंच घेतलय उमेदवार फारच चुका कराला लागले हो !

'तें बरं केलंत नाहीं तरी आताशीं दर रोज ताबंडी शाई फी बुकाला लागलेली दिसत होती. अन् तें कांहीं बरं नव्हे नाहीं कां? बघू बघू आजचा जमाखर्च तुम्ही लिहिला असेल नाहीं कां ?'

'हो,' म्हणत असता दप्तरदारानं समोरच्या खुर्चीवर बसलेल्या अप्पासाहेबांपुढं फीबुक सारलं.

'अर्ज बघू बर आजचे' असं त्यांनीं म्हणताचं त्यानं सारे अर्जही त्यांच्यापुढं केले. फी बुक तपाशीत असता 'काय हो ही तीन रुपयाची रक्कम जमेकडं आणि नावेकडं त्याचं नंबरला कशी आली ?' आश्चर्य व्यक्त करीत अप्पासाहेबांनी त्याला प्रश्न केला.

'पाहू पाहू' असं म्हणताच त्यांनीं फी बुक त्यांच्यापुढें केलें.

'[हो. बरोबर आहे. पुढील तजविजीसाठीं तो अर्ज नि सोबतचे तीन रुपये योग्य कोर्टाकडं पाठविले. म्हणून ते तीन रुपये त्या नंबरला खर्चीं घातले आहेत.'

'पण हा अर्ज तर इथेंच दिसतोय्. मग पैसे कसे पाठवलेत नुसते ?

'असं झालं कां? तरी मीं विचारलं होतं जोश्यांना पावती करू कां म्हणून ?'

'अहो, जोश्याला नि कुलकर्ण्यांला कशाला विचारायला हवं यांत ? पैसे पाठवले असले तर सोबत अर्ज जायाला हवा होता; नि अर्ज इथं आहे तेव्हां पैसे खर्ची पडायला नको होते.'

'तर मग खर्ची पडले नसतील बरं का पैसे.'

'खर्ची पडले नसले तर मग शिल्लक असायला हवेत ने' मग पुस्तकाप्रमाणं शिल्लक जमली कशी तुमची?'

'हो. खरंच कीं.'

'अहो खरंच की काय ? खोडा इथं नि करा इनिशिअल तुमची' आणि त्याप्रमाणं त्यानं केल्यानंतर पुन्हां शंका येऊन त्यांनीं त्याला विचारलं 'काय हो, आणखी अशाच एकाद्या नंबरचे पैसे नजरचुकीनं खर्ची घालायचे राहिले नाहींत ना ?'

'छे हो '—तो.

'छे हो. तर मग ते पैसे शिलकेंत वाढायला हवेंत.'

'आप्पासाहेब, आतां खरं खरं सांगतों बघा. मघापासून तीन रुपये चुकतच होते हिशोबांत. मला वाटलं बोलण्याच्या नादांत मीच खिशांतून काढून यांत ठेवले असतील. म्हणून मी तीन रुपयें खिशांत ठेवून शिल्लक बरोबर करून ठेवलीं असे म्हणून तीन रुपये खिशांतून त्यांत टाकीत असता 'दॅटस् ऑल राईट!' नेहमीच्या संवयीप्रमाणें तो उद्‌गारला. आणि त्यावर 'नो नॉट यट.' असं म्हणून त्यांनीं त्याला अर्ज आणि त्या सोबतची रक्कम वाचायला सांगितली आणि त्याप्रमाणं ते पुस्तकावर टिका करायला लागले. पण मध्येंच त्यानं एक अर्ज वाचताच ते अडले.

'काय हो, आतां तुम्हीं वाचलेला अर्ज नि सोबतचे पांच रुपये यांत दिसत नाहींत कुठं ? त्यावर त्यानं फी बुक स्वता तपासून पाहिलं आणि शेवटीं दिलगिरीपूर्वक म्हणाला'दिसत नांहीं खरंच राहिलंच बरं का नोंदायचं नजर चुकीनं.'

'तें खरं; पण मग हे पांच रुपये भरतींत जास्त यायला हवेत नाहीं का ?'

'अप्पासाहेब तरी मला मघाशीं वाटलंच बरं कां. कांहींतरी घोटाळा होतोय आज म्हणून, किती पांच रुपये कमी येतात नाहीं कां ? म्हणजे तीन आणि दोन ? बरोबर आहे. मघाशीं दोन रुपये वाढत होते खरेंच. मला वाटलं पक्षकाराला मोड द्यायला म्हणून खिशांतून काढले नि परत

ठेवायची आठवणच राहिली नसेल म्हणून मी ते खिशांत टाकले.' असं म्हणून त्यानं खिशांतून पांच रुपये काढून फीच्या पैशांत ठेवले.

पण पक्षकाराला मोड द्यायला होती कुठं तुमच्या खिशांत ? आतांच ना तुम्हीं म्हणालांत 'फीच्या पैशांतून मोड घेण्यासाठीं खिशांतून नोट काढून यांत ठेवली?'

'हो. म्हणालों खरं. काय घोटाळा झालाय् कांहीं कळत नाहीं !' चिंतातुर मुद्रा करून तो उदगारला.

'तुमची खाजगी प्राप्ति नि सरकारी पैसे यांची एकत्र गल्लत करता; म्हणून हे घोटाळे होतात बघा, मघाचे ते तीन रुपये खोडलेत; आतां हे पांच रुपये कुठें घालणार तुम्ही ?'

'कुठं घालू?' पडलेल्या आवाजांत त्यानं विचारलं.

'मी तरी काय सांगू आतां ? साहेबांना विचारल्याशिवाय मला नाहीं सांगता यायचं. कारण आतां इतक्या ठिकाणीं खोडा खोड करायची म्हणजे मोठी पंचाईत आहे ! बघू. ते काय सांगतील त्याप्रमाणं करता येईल' असं म्हणत असता ते उठले आणि जातांना दप्तर कचेरींतल्या शिपायाला फीबुक आपल्या आफीसांत घेऊन येण्याची त्यांनीं आज्ञा केली.

ते गेल्यानंतर एक उसासा टाकून 'काय हो आतां आमचं प्रकर्ण पेटणार काय ?' दुमुंखला होऊन केवालवाण्या स्वरांत त्यानं शेजारच्या कारकुनाला विचारलं. आणि दुसरें दिवशीं गुंड्या आमच्या खोलींत आला तो जवळ जवळ नाचत आणि 'माम्या मेला ! खलास झाला! आनंदी आनंद गडे! इकडें तिकडें चोहिकडें असं गात गातच आला.'

दैवयोग किती विचित्र येतात पहा. तो पेटवायला गेला मला; पण त्यांत आहुति पडली त्याचीच. त्या झोटिंगाला माझ्या मानधनाचा बळी द्यावा लागणार होता; पण भाग्य माझं, त्याचाच बळी पडला त्यानं पेटवलेल्या अग्निकुंडांत ! ताबडतोब त्याच्या बदलीची ऑर्डर निघाली. अशारीतीनं आमचं पेटू घातलेलं प्रकरण इन्धब घालणारेच खतम झाल्यामुळे तें पेटण्याऐवजी आपोआप विझलं !

: ५ :

आमच्यांत जीं अनेक रत्न होतीं त्यांत धोंडो गुंडोंचा प्रामुख्यानं अंतर्भाव करावा लागेल. देवाला जाणाऱ्यांत हौसे गवसे आणि नवसे असे त्रिविध प्रकार असतात असे म्हणतात. अर्थात त्या प्रत्येकाची भूमिका वेगवेगळी असते तिथं; पण अशा तिन्हीही भूमिका पार पाडणारी ही दुक्कल होती. त्यांनीं उद्योग नसला म्हणजे हौस–गंमत करायची; सावजं हातांत येतांच गवसेपणा करायचा; आणि प्रकर्ण अंगलट येतसं दिसलं म्हणजे नवस–आराधना–वरिष्ठांची पायधरणी करायची.

कोर्टकचेऱ्या हा एक जुगार आहे; आणि त्या जुगारी जगांत इच्छित दान पाडून देतो असं प्रतिज्ञेवर सांगणारे अनेक शकुनी द्रव्याच्या लोभानं क्षेत्रांतल्या बडव्यासारखं पक्षकारांच्या पाळतीवर असतात. ते विधवेला अन्नवस्त्र मिळवून देण्याचं अमीश लावतील. अज्ञानाला वडिलांनीं घालवलेली संपत्ति हमखास पुन्हा मिळवून देतों म्हणून छातीवर हात मारून सांगतील; आणि ज्यूरी फितवून गुन्हेगाराला निर्दोषी म्हणून सोडवून दिलं तर काय देशील बोल? म्हणून एकाद्या-जवळ पैजेचा विडा उचलतील. खरोखर होत्याचं नव्हतं करण्याइतकं अचाट बुद्धिसामर्थ्यं यांच्या ठिकाणीं असतं. तसंच तें या दुकलीच्या ठिकाणींही पुरेपुर होतं !

वास्तविक गुंडो धोंडो आणि मंडळी असं जरी त्यांच्या दलाली फर्मचं नामाभिदान असलं तरी ‘आणि’ च्या पुढची ‘मंडळी’ म्हणजे त्या ‘आणि’च्या मागची ती दोनच मंडळी ! तेवढीच त्या गुंडो धोंडो फर्मची व्याप्ति ! त्यांतला धोंडोपंत कायदेशीर गुंडगिरी करायचा तर

गुंडोपंत आडमुट्टेपणाची भाषा बोलायचा नेहमीं. आणि पहिल्याचे मुत्सद्दी डावपेंच चाललेले असायचे तर दुसरा स्वताच नागवा असल्यानें केव्हां कोणाची भर रस्त्यांत बेंअब्रु करील याचा कांहींच नियम नसायचा! तसंच धोंडोपंत कायदेबाज खरा, पण गुण्डोबाच्या गुण्डगिरीपुढं त्याची मात्रा चालत नसे; आणि सारे कायद कानू जरी त्याच्या डोक्यांत खेळत असले तरी ते वेळीं जागचे जाग्यावरच राहत ! आणि गुण्डोबा गुण्डगिरी करून केव्हां मोकळा होत असे त्याचा पत्ताही लागत नसे त्याला !

धंद्यांत भांडवल घालायचा त्यांच्यापुढ कधीं प्रश्नच उभ्दवला नव्हता. फक्त काय ते थोडे श्रम करावे लागायचे दररोज खोलीच्या साफसफाई आणि स्वच्छतेसाठीं. पण गुण्डया वेळेवर कधींच असायचा नाहीं तिथं. मग धोंडोपंतानं नाइलाजानं चरफडत केर वगैरे काढून जागा स्वच्छ करावी आणि मग त्या राजेश्रीनीं आयत येऊन उगवावं ! बरं त्याला विचारलं तर अशी कांहीं थाप मारावी त्यानं कीं ती ऐकून धोंडोपंतानं गारच व्हावं! मग तो रागावतोय् कुठला त्यावर ? बरं कधीं काळीं गुंडयानं धोंडोपंताच्या आधीं खोली उघडलीच तरी तो तशाच स्थितींत बैठक मारायचा ! पण झाडून झटकून घेईल तर शपथ !

आजही असाच प्रकार झाला होता. धोंडोपंत कांहीं खाजगी कामानिमित्त चार दिवस परगांवीं जाऊन आल्यानंतर नेहमीपेक्षां जरा उशीरानंच तो दुकानीं आला; पण गुंडोबाचा कुठं पत्ता होता ? त्यामुळं दुकान त्यालाच उघडावं लागलं. आंत पाहातो तों सर्वत्र केर सांचलेला, ठिक ठिकाणीं कागदाचे चिठोरे पडलेले; बसण्याच्या गादीभोंवती बिडयांचीं थोटकं आणि जळक्या काडया पडलेल्या; असा सारा थाट ! आणि बसू म्हटलं तर टिचभर जागादेखील मोकळी नाहीं! त्यानं संतापांतच कोट काढून खुंटीवर ठेवला; धोतराचा सोगा आवरून केरसुणीनं आधीं जागा साफ केली; आणि नंतर तो मागच्या तक्याला रेलून आणि पाय पुढच्य डेस्कवर टाकून बैठकीवर जरा आरामशीर पडला. आणखी येतांना बरोबर आणलेलं पुस्तक चाळू लागला, तोंच गुंडोबाचं आगमन झालं.

‘ माझ्या जागेवरून ऊठ ’ वहाणा काढता काढताच त्यानं धोंडोपंताला सुनावलं. ‘ झाडायला मी नि इथं आयता पसरायला तूं काय रें ? अन् गुंड्या काय ही अव्यवस्था करून टाकलीस चार दिवसांत जागेची ? अन् कायरे? गृहस्था! चार! दिवसांत केरसुद्धां काढला नाहींस इथला तूं’,त्यामुळं ही कज्जे दलालाची पेढी आहे कां न्हाव्याचं केस कापायचं दुकान आहे, कळावं असं लोकांना ?’

‘ लाज वाटते कां काहीं तुला बोलायला ! अरे बाहेरून पैसा मिळवून आणला नाहीं तर इथलं भाडं कोण बाप भरील कां तुझा ? आम्ही बोंबलत हिंडत होतों पक्षकार धुडीत त्याचं कांहींच नाहीं; नि हा भडवा मला म्हणतो झाडून काढलं नाहींस म्हणून ! ’

‘ बरं जाऊं दे बुवा ! कटकट नको रामप्रहरांतच ! ’ असं म्हणून धोंडोपंतानं पुन्हा पुस्तकांत लक्ष घातलं.

‘ विश्व शून्यांत साठवलं आहे ’ त्यानं पुढं वरलेल्या पानांतलं वाक्य होतं तें. ’

‘ तें जाऊ दे रे. पैसा कशांत साठवला आहे तेवढं सांग ’ पोशाख उतरीत असतांना गुंडोबानं पृच्छा केली.

‘ भांडणांत आणि कज्जे दलालींत.

‘ ठीक बोललास.’

‘ आणखी गुंड्या, विश्वाचा लय जसा शून्यांत व्हायाचा, तसं माणुस भांडण्याच्या नादीं लागला कीं पैशाचं वाटोळं ! ’

‘ हें आपण नाहीं बोलायचं दगडा ! अरे लोकच जर शहाणे झाले नि आपल्याकडं न आले तर मग नवा नवा करवती काठं कुठला ? सीलच्या अंगठ्या कशा मिळायच्या ? नि मग घरावर तिसरा मजला तरी कसा चढायचा! ’

‘ गुण्ड्या, तूं लहानपणीं शिकला नाहींस वाटतं—वर्मं काढुनी शर-मायाला उणें कुणाला बोलु नको. ’

'गहाण कुणाचे डुलवू नको' गुण्डयानं धोंडोपंताच्या सुरांत सूर मिळवला.

'गुण्डया जोडे खाशील बरं का अशानं.' एकेरीवर येऊन धोंडोपंत म्हणाला.

'एवढी कुठली पुण्याई आलीय बाबा माझी? बरं तें जाऊ द्या. पण उठता कां जागेवरून आमच्या कृपा करून?' आणि हें बोलत असता गुंडयाचं लक्ष घडयाळकडं गेलं. साडेनवाला अवघी पांचच मिनिटं काय तीं शिल्लक होतीं.

'आतां एक गिऱ्हाईक येणार आहे' तो पुन्हा बोलू लागला 'चांगलं आडमाप आहे शरीरानं, पण दिसतंय् गलथानच! परवा एकाच्या मकला काढीत असता मला समजलं कीं अमक्या तमक्याची मिळकत त्यानं आपल्या जमातीला बक्षीस दिली. हा माणुस माझ्या ध्यानांत होता-म्हटलं 'बघू या तरी खडा टाकून' म्हणून त्याच्याकडं गेलों नि त्याला म्हटलं 'बुवा, मला असं असं कळतंय कीं हें तुमच्या बाजुनं होण्या-सारखं आहे अगदीं. मग एवढी थोरली इस्टेट अशी चोरा पोरी कां जाऊ देता?' त्याला तें पटलं, म्हणाला 'बुवा, तुम्हींच आमचं हें काम करून द्या' मी म्हटलं चल; तुला चांगला माणुस गांठून देतों.' मनांत म्हटलं 'चांगला बकरा सांपडला कापायला!' पण हें बघ धोंडया, हे गिऱ्हाईक सर्वस्वी माझं आहे आं? तेव्हां नेहमीप्रमाणं प्राप्तीचा अर्धा-वाटा मिळायचा नाहीं तुला यांत. आधीं बजावतोय् तुला. तुला फक्त चौथा हिस्सा; नाहीं तर मागून हेंगल घालीत बसशील. अरे तो आलाच कीं, आतां अगदीं आळी मिळी.' असं म्हणत असता गुण्डया दाराजवळ जाऊन उभा राहिला आणि धोंडोपंत जिवाजीदप्तरीच्या थाटांत तक्याशी टेकून बसला.

'या वस्ताद साहेब.' आलेल्या गृहस्थाची धोंडोपंताला ओळख करून देत असता गुण्डया बोलत होता 'धोंडोपंत हें आमच्या पेठेचं भूषण आहे बरं कां? अतीशय सज्जन गृहस्थ! बरं दिलदार असे कीं कुणीही काय वाटेल तें यांच्याजवळ मागो; तोंडांतून नाहीं म्हणून नाहीं यायचं कधीं!

आणि लोकोपयोगी कामं करण्याची तर हौस इतकी दांडगी आहे कीं बोलायची सोय नाहीं! खेरीज तालीमबाजीत वस्ताद आहेत हें शरीरावरून दिसतंच आहे आपल्याला. परवाच्याच कुस्तींत सहाशे रुपये इनाम मिळालं यांना.'

'आपलं तसंच राहून जाईल आं यांत?' स्तुतीला कंटाळलेले वस्ताद गुण्डोपंताकडं हंसत हंसत बघून म्हणाले.

त्याबरोबर आपण याला स्तुतीची दारु पाजीत आहोंत, पण हा कांहीं तिनं झिंगण्याचीं चिन्हं दिसत नाहींत एवढं त्या दोघा धूर्तांनीं ओळखलं. तसं लगेंच पवित्रा बदलून 'हे आमचे धोंडोपंत' गुण्डया त्यांना ओळख करून देऊ लागला 'काय कायद्याचं डोकं चालतंय् म्हणता यांचं कीं ज्याचं नांव तें! अहो, मुंबईचे मोठ मोठे बॅरिस्टर येतात ना सल्ला घ्यावयाचा यांचा!' पण कदाचित गुण्डयाकडून आपली नीटशी माहिती या गृहस्थाला मिळायची नाहीं, अशी शंका येऊनच कीं काय धोंडोपंतानं गुण्डयाला मध्येंच थांबवून तो स्वतःच पुढं सरला.

'अहो गुंडोपंत, आतां तुम्ही बॅरिस्टरचं नांव काढलंत, तेव्हां सहजच परवाच्या गोष्टीचं स्मरण झालं. असंच सकाळच्या वेळीं एका महत्वाच्या मुद्या संबंधीं आधार शोधीत होतों, इतक्यांत एक गृहस्थ आला नि म्हणाला कीं, बुवा, अमक्या तयक्या बाबतींत तुमचा सल्ला पाहिजे.' मी म्हटलं सल्ला देतों. पण त्याची फी अशी अशी आहे.' लगेंच त्यानं पैसे काढले मूर्तिमंत पाऊणशे रुपये घेतले या हातानं अवघ्या पंधरा मिनिटांच्या कामाचे! अहो हें बोलून चालून टाळक्याचं मोल आहे! इथं किती वेळ लागला हें कां बघायचं असतं?' इतकं बोलून धोंडोपंत क्षणभर थांबला आणि आपल्या बोलण्याचा वस्तादच्या मनांवर काय परिणाम झाला तें त्याच्या चेहऱ्यावरून अजमावू लागला; आणि धोंडोपंताला झालेली पाऊणशें रुपयांची प्राप्ति ऐकून 'काय कायदा आहे? काय फायदा आहे?' असं गुण्डया इकडं स्वताशींच पुटपुटला.

'गुंडोपंत, या बाबतींत पुढली गंमत ऐकली नाहींत तुम्ही.' धोंडोपंत पुन्हा बोलू लागला 'परवा मारे वर्तमानपत्रांतून गाजावाजा

झाला कीं त्या ह्या बॅरिस्टरानं काय बरं नांव त्याचं ?– तोंडासमोर आहे – काय हो' असं म्हणत असता विचारदर्शक कपाळाला एक दोन आठ्या घालून आणि डोळे बारीक करून धोंडोपंत आपल्या स्मृतीला ताण देऊं लागला.

' जाऊ द्या धोंडोपंत, कशाला शीण देतां उगीच डोक्याला ? आठवल्यावर सांगा कीं, तूर्त आपण असं धरून चालू कीं कुणीतरी बॅरिस्टर तुमच्याकडं आला होता, त्याला तुम्हीं कांहीं तरी सल्ला दिला; नि त्यानं नंतर तिकड कांहीं तरी केलं; पुरे एवढी तूर्तास यांना माहिती. खरं कीं नाहीं हो वस्ताद ? कां खोलांत शिरायचंय याच्या तुम्हांला ? ' गुंड्यानं वस्तादाला विचारलं.

' छे, त्याच्याशीं आपल्याला काय करायचंय ? आपलं काम झाल्याशीं कारण. ' वस्ताद

' तर त्यानं म्हणे भली मोठी केस जिंकलीं ' धोंडोपंत पुन्हा आपलंच चऱ्हाट वळू लागला. ' मी मनांत म्हटलं, ' पाहू या तरी एवढी केस कसली आहे तें ? म्हणून मी ला रिपोर्ट चाळला. बघतो तों तीच केस नि त्या माणसाला मी जो सल्ला दिला त्याच मुद्यावर ती लढवली जाऊन जिकलीही पण गेली हायकोर्टांत ! त्या वेळीं देखील मला वाटलंच कीं, ह्या सल्ला कांहीं लुंग्या सुंग्या ठिकाणीं जात नाहीं. ' अन् इतक्या तडकाफडकी इतके रुपये तरी कोण देतो हो काढून ? '

आण खीहि कांहीं वेळपर्यन्त धोंडोपंताचं हें आत्मपुराण चाललं असतं; पण वस्तादानं कंटाळून गुंड्याला खुणेनं पुन्हा आपल्या कामाची आठवण करून दिली. त्या बरोबर तो त्या कामाकडं वळला.

' धोंडोपंत यांचा एक चुलता होता तो नुकताच वारला '

इतक्यांत ' आनंद आहे ! ' नेहमीच्या परिपाठांतला शब्द धोंडोपंतानं उद्गारला.

' अहो, चुलता वारला नि आनंद कसा ? दुःख आहे म्हणा. ' गुंड्यानं दुरुस्ती सुचवली, वस्तादानंही स्मित हास्य केलं, त्याबरोबर आपलं

अनुक्रम
दि.
क्रमांक
नों. दि.

बोलणं घसरल्याची धोंडोपंताला जाणीव झाली. पण तो आपलंच बोलणं खरं करण्यासाठीं बोलू लागला ' गुण्डोपंत, तुम्हांला कायद्याचं ज्ञान नाहीं '

' खरं आहे. कुठलं असणार आम्हांला तें ' गुंड्या.

' अहो, हे कायद्याचा सल्ला घ्यायाला आले आहेत ना ? '—धोंडोपंत.

' हो ना. '

' झालं तर मग ? कायदा हा ' सुख दुःख समेकृत्वा ' अशा वृत्तीचा आहे. तेव्हां त्याला दुःख कसलं ?'

असं? मग आनंदही नसेल त्याला? मग हे सारे उपदव्याप रिकामेच तर म्हणायचे ? बरं जाऊ द्या तें – तेव्हां त्यानं आपल्या हयातींत एक ट्रस्ट डीड करून आपली सारी इस्टेट जमातींतल्या पंचांच्या स्वाधीन केली आहे. त्याला औरस संतती नसल्यामुळं कायदेशीर हक्कानं ती इस्टेट आपल्याला मिळावी असं यांचं म्हणणं आहे. त्या कामीं यांना तुमचा सल्ला पाहिजे.

' जरूर. तुमच्या सारख्यांना सल्ला द्यायाचा नाही तर मग हीं कायद्याचीं पुस्तकं कशाला ठेवलीं आहेत इतकीं ? अहो तुम्हांला काय वाटेल तो सल्ला विचारा. इथं काळा कायदा आहे. पांढरा कायदा आहे—'

' कायद्याच्या पुस्तकांचीं हीं नवीनच नांवं ऐकतों आहे मी ! ' आश्चर्यानें बस्ताद उद्गारला.

' अहो, काळा कायदा म्हणजे एकाद्याचं वाटोळं करायचा कायदा. आणि पांढरा कायद्या म्हणजे कल्याण करावयाचा कायदा. आतां तुमचा सल्ला काळ्या बुकांत सांपडावचा नाहीं. त्याला पांढऱ्या बुकांतलाच कायदा पाहिला पाहिजे. ' गुण्डोपंतानं स्पष्टीकरण केलं.

' वस्ताद साहेब, ' तो पुढं बोलू लागला 'अहो पक्षकारांना कळावं म्हणून आम्ही हीं नांवं ठरवून टाकलीं आहेत. बाकी कायदा हा एक का आहे ? अहो मुल्ला आहे. हिंदूला ' आहे; ' महामेडन आहे; ' इटि

किटी ' आहे; ' ज्युरिस पुरडन्स आहे; ' सिव्हिल प्रोसिजर ' आहे; नाना भानगडी आहेत ! '

वस्तादवर इंप्रेशन मारण्यासाठीं आपल्या बोलण्यांत ऐकलेल्या इंग्रजी शब्दांची खोगीरभरती करण्यांत त्यांच्या उच्चाराचे धोंडोपंताकडून भराभर खून पडत असलेलें पाहून ' या वस्तादाला जर कां थोडं इंग्रजी येत असलं तर फजीतीला पारावार नाहीं ! ' अशा विचारानं गुंड्याचा चेहरा पडला होता; पण धोंडोपंताला त्याची दादही नव्हती; त्याच बोलणं जसं थांबलं तसं गुण्ड्याला हायसं वाटलं; आणि नंतर तो म्हणाला तें जाऊ द्या. इतका कायदा त्यांना काय कळतोय् ? नि मला तरी कुठं कळतोय् ? यांना आतां त्यासाठीं फिर्याद लावावी लागेल तेव्हां--'

' हां. तें सांगतों आतां ' एकमेकां साहय करूं । अवघे धरू सुपंथ ' असा आपला माझा स्वभाव आहे. आणि ' जें जें आपणाशीं ठावें, तें तें दुसऱ्याशी शिकवावें ' शहाणे करून सोडावें अवघे जन ' या समर्थांच्या उक्तीप्रमाणें आम्ही आतांपर्यंत वागत आलों आहोंत. आतां यांच्या सारख्यानीं खूष होऊन देणगी, बक्षीस कांहीं दिलं तर तें आम्ही घेतो एकादें वेळीं—पण ते कामाचं मोल म्हणून नव्हे. नाहीं तरी आमच्या डोक्याच्या मानानं तुम्ही देऊन देऊन काय देणार हो ? तेव्हां तुम्हांला थोडक्यांत सांगतों, तूर्त तुम्ही पन्नास एक रुपये घेऊन या. दहा पंधरा रुपये नकला काढायला लागतील—कारकुनांना द्यायाचे असतात; शिपाई पट्टेवाले, तोंडाकडं आशेनं बघतात, त्यांच्याही तोंडावर प्रत्येकी चार दोन आणें चहापाण्यासाठीं फेकावे लागतात. तें सारं तुमच्याच हातानं करू. हा पैशाची बाब असते. तेव्हां ज्याचा तो समक्ष असलेलाच बरा तिथ झालं तर चांगल्या वकीलाचा सल्ला घ्यायला निदान पंचवीस रुपये तरी पडतील. '

पण तुम्हांला ठावूक आहे, मग वकीलाचा सल्ला कशाला? वस्तादानं मध्येंच पृच्छा केली.

'ही शंका बरोबर आहे तुमची. प॰ त्याचीं कारणें अशीं–आम्ही कितीही शहाणे असलों तरी सरकारी मान्यता आम्हांला नसल्यामुळं त्यांच्या मुखानं बोलावं लागतं नाईलाजानं आम्हांला. दुसरं असं कीं झिरमिळीच्या पगडीखालचं डोकं आमच्या मानानं किती मठ्ठ असतं हें तरी तुम्हांला त्याशिवाय कसं कळावं! तेव्हां वकील हा दिलाच पाहिजे आपल्याला. त्याला दहा पांच रुपये कमी द्यावे लागतील एवढाच आमच्यामार्फत त्याच्याकडं जाण्यांत तुमचा फायदा.'

आणि आणखी अशाच थोड्या बोलण्यानंतर ' बरंय तर मग वस्ताद, संध्याकाळी घेऊन या पैसे म्हणजे उद्यापासून लागू उद्योगाला तुमच्या.' असं धोंडोपंतानं उपसंहारात्मक भाषण केलं आणि थोड्याच वेळांत वस्ताद जीनी आपली बैठक हालविली.

श्री. गोडांबे हे धोंडोपंतानं दिलेले वस्तादचे वकील. वस्तादानं सांगितल्या प्रमाणं त्यांनीं आज गुण्डो धोंडोची कोर्टांत गांठ घ्यायाचं ठरवलं होतं, आणि त्याप्रमाणें टांग्यांतून ते कोर्टांत चालले होते, तोंच त्यांच्यापुढं दुसरा टांगा चाललेला त्यांना दिसला. त्यांत, आयत्या वेळी टांगा घेऊन जो पक्षकार दाराशीं येईल त्याच्याबरोबर टांग्यांत कोर्टांत जावयाचं या नेंहमीच्या शिरस्त्याप्रमाणें सोनोपंत सदाचारी वकील चालले होते. एका शेतकरी कुटुंबांतल्या सवतीसवतींच्या जमिनीच्या बाबतींत चाललेल्या तंटयांत गोडांबे वादीच्या बाजूचे आणि सदाचारी प्रतिवादींच्या बाजूचे वकील असून त्या खटल्याची आज तारीख होती. त्याची आठवण देऊन टांग्यांतच एकमेकांनीं एकमेकांना नमस्कार केला आणि कोर्टाच्या आवारांत त्यांचे टांगे शिरल्यानंतर गोडांब्यांना ती दुक्कल समोरच उभी असलेली दिसल्यामुळं त्यांनीं आपला टांगा तिथंच थांबवला आणखी सदाचाऱ्यांचा टांगा पुढें गेला. गोडांबे टांग्यांतून उतरून त्यांच्याकडे येत असतां ' काय वकील, तुमच्याकडं पक्षकाराला फिर्यादीवर नुसती सही करायला पाठवलं तर तितक्यांत तुम्ही गाढवपणा करून ठेवलात ! '

संताप आंतले आंत दाबून गुंड्या त्यांना म्हणाला,

तें ऐकतांच वकीलांचाहि संताप अनावर झाला. ' गुंडोपंत, शुध्दीवर आहांत का तुम्ही ?' ते ओरडले.

'सबूर ' शांतपणाचा आव आणून धोंडोपंत बोलूं लागला 'अहो वकील, स्टँपासाठीं तो तुम्हांला दीडशें रुपये देत होता; ते घ्यावयाचे टाकून 'हें काम तुमच्यासारखं व्हायचं नाहीं. हीं माणसं तुम्हांला कांहींतरी सांगताहेत, आणखी तुमचे सारे पैसे खड्यांत जातील ! ' असला त्याला उपदेश करायचा उपद्व्याप सांगितला होता कुणी तुम्हांला ? '

'अहो, तुम्हांला त्याचं कांहीं नाहीं; पण मी जर अशी खोटीं कामं करूं लागलों तर एकादे दिवशीं माझी सनद रद्द व्हायची ना अशानं ? '

' मग बसा कोर्टाच्या व्हराडयांत असेच चक्रा मारीत आयुष्यभर ! ' गुंड्या तुच्छतापूर्वक म्हणाला.

' तें पाहीन मी; पण माझ्या नांवावर उकळलेले पैसे तेवढे देऊन टाका पाहू मला.'

' काय वेड लागलंय् तुम्हांला ? आमची नुकसानी करून वरती बक्षीसी मागतां वाटतं ?' गुण्ड्यानं त्यांना विचारलं.

' बरं तर मग हेही ठेवा ' असं म्हणून खिशांतून दोन रुपये काढून धोंडोपंतापुढे केले.

' ठेवा हे पैसे खिशांत ' त्या पैशासहीत त्यांची मूठ दाबीत असतां पंत म्हणाला .

' हें पहा, देणार असाल तर सगळे द्या. नाहीं तर मला हे नकोत.' —गोडांबे.

घ्या. असू द्या. माझं ऐका. '—धोंडोपंत.

' वकील वेडे आहांत तूम्ही. ठेवा तें पैसे खिशांत. अहो दोन रुपये तर दोन रुपयेच. ते तरी कुठं मिळायला बसलेयत तुम्हाला ? गुंड्याचा हितोपदेश सुरु झाला. 'जुन्या मराठी पांचव्या पुस्तकांत बरं कां वकील दोन रुपयांचा उपयोग म्हणून धडा होता, तो तुम्ही वाचलेला दिसत नाहीं. नाहीं तर हे दोन रुपये असे रागानं फेकून दिले नसतेस तुम्ही. अहो, या दोन रुपयांचं तुम्हांला काय करता येणार नाही ? चार वेळां ऐटींत कोर्टात टांग्यांत बसून येता येईल. सोळा वेळा सलून-मधून दाढी होईल. झालं तर लॉलायबरीची थकलेली बाकी द्यायला यांची मदत होईल. रेस्टारंटमध्यें स्नेह्यांना

घेऊन चहाला जाता येईल. बायकोसाठीं गजऱ्याचा महिनाभर रतीब लावता येईल. हजार उपयोग होतील त्यांचे'–

'तुम्ही काय चेष्टा चालवली आहे काय माझी?–'गोडांबे

'मग पंचवीस रुपये काय झाडाला लागले आहेत इथं ? पैशासाठीं कष्ट करावे लागतात, रक्त आटवाव लागतं, तेव्हां कुठं ते दिसतात. कोर्टीच्या व्हरांड्यांत हिंडून मिळत नसतात ते !–गुण्ड्या

'गुण्डोपंत गप्प बसा हो जरा. वकीलसाहेब असूं द्या ते '–धोंडोपंत

'काय हो वकील सबंध केसचे तरी पंचवीस रुपये मिळाले आहेत कां तूम्हांला आजवर कोणाकडून?' गुण्ड्यानं त्यांना विचारलं.

'गुण्ड्या, जा पाहु इथून. बरं कां वकील, तुम्हांला सांगतों, आमची फी तरी कुठं मिळालीय अजून? पण म्हटलं आम्हांला नाहीं मिळालं तरी चालेल, तुमचं आपलं देऊन टाकावं.'

'तें चांगलं करतां. पण मग ते काय अवघे दोन रुपये?'

'मग किती ?'

'कबूल केल्याप्रमाणं पंचवीस रुपये द्यायाला हवेत तुम्हांला '–गोडांबे.

'अहो, कबूल केल्याप्रमाणं कुणी कधी वागतं कां? पक्षकारादेखत बोलावं लागतं तसं आम्हांला. त्याशिवाय त्याच्याकडून तरो पैसे कसें मिळायचे आम्हांला?' धोंडोपंत.

'हें पहा, त्याच्याशीं मला कांहीं एक कर्तव्य नाहीं. मी फक्त माझ्या पैशापुरतं बघतोय.'

'तर मग तेवढेच घ्या मुकाट्यानं. कोर्टांत विचारताय तरी कां तुम्हांला कुणी? बेकार हिंडत फिरता! 'म्हणून दया येऊन वाटलं 'द्यावं काम तुमच्याकडं.' तर तुम्ही कसले?' गुंड्या.

'अस्सं!' – वकील.

'हो. अस्सं तर काय?' हे तेवढे तरी घ्या म्हणतात. मी तेही दिले नसते'

'आहात खरे बुबा तसे!'

'आम्ही कसेहि असूं; तुम्हांला काय करायचंय त्याच्याशीं?'–गुंड्या.

आणि शेवटीं यांत कांहीं अर्थ नाहीं असं समजून गोडांबे ज्या कोर्टांत त्यांची पुराव्याची तारीख होती तिकडं चालू लागले.

० ० ० ०

इकडं सोनोपंत सदाचारी वकील कांहीं वेळापूर्वी टांग्यातून उतरल्या-नंतर ज्या पक्षकाराचे पैशानं ते कोर्टांत आले होते त्याला म्हणाले ‘ हे बघ अजून अवकाश आहे पुष्कळच कोर्ट बाहेर यायला. तोपर्यंत मी दुसरीकडचं काम उरकून येतो. अन साहेब आलेच बोर्डावर तर मला बोलावायला ये तिकडं! ’ आणि नंतर ते तिथून झटकले.

वाटेंत केळीवाली बाई उभी होती. तिच्याकडून केळीं घेऊन तीं खात खात आणि त्यांच्या सालीं इतस्ततः फेकून देत स्वारी जिथं त्या सवती सवतींच्या खटल्याची तारीख होती त्या कोर्टांत आली. बाहेरच्या बाजुलाच त्यांतली एक पक्षकारबाई आपल्या वकीलांची वाट बघत बसली होती. सदा-चाऱ्यांनीं कोर्टांत शिरता शिरतांच ‘काय ग बाई?’ म्हणून तिला विचारलें.

‘तारीख हाय कोर्टाम्होरं, म्हून वाट पघतेय वकीलाची’ ती म्हणाली.

‘मी आलोय कीं. मग आणखी कोणाची वाट बघतेयस?’ हातांतलीं ब्रिफं खालींवर करून ‘ अग ५६६ नंबरचा दावा तुझाच ना? ’ म्हणून त्यांनीं तिला विचारलं. आणि तिनं होकारार्थी मान हालवितांच ‘अग मग ये कीं आंत.’ ते म्हणाले.

तिला वाटलं साहेबच आहेत हे. ‘ पन माझं वकील यायला होवत ना? ’ ती म्हणाली.

‘ अग आतां कोणचा वकील येणार आहे आणखी दुसरा? ये आंत इकडं ’

‘पन ते येऊ द्या ना.’

‘अग पण मी आहे ना?’

‘थांबा जरा ते येऊस्तवर.’

‘पुन्हां तेंच! या अडाणी लोकांना काडीच्या अकला नसतात! इथं काय रडायचं वकीलानं ?’ सदाचारी स्वतःशी पण साहेबांच्या येण्याकडं डोळे

लावून बसलेल्या पट्टेवाल्याला ऐकू जाईल इतक्या मोठ्ठ्या आवाजांत उद्गारले.

'अग तूंच ना सकाळीं आली होतीस?' नंतर त्यांनीं तिला विचारलं.

'हो' म्हणतांना ती घोंटाळली 'पर मी तत सगळं सांगितलं कीं', नंतर ती म्हणाली.

'अगं कोर्टात यायला सांगितलं नव्हतं कां तुला?'

'हो पन'–तिचा अधिकच घोंटाळा उडालेला दिसत होता.

'मग काय तर? सांग आतां सारं. दावा तुझ्या सवती लावलाय ना?'

'तिनं कवा? म्या लावलाय.'

'अगं भागू मर्द सुभाना'–हातांतले ब्रीफ चाळतां चाळतां त्यांनीं तिला विचारलं तोंच 'हा. ती माझी सवत!' ती म्हणाली.

'ती तुझी सवत नि तूं तिची सवत हें सांगत बसूं नकोस मला. माहीत आहे मला सार तें. पण मला असं सांग, जमीन कोणाकडं आहे ती? तुझाकडं कां तिच्याकडं?'

'माज्याकडं. कवा? तिच्याकडं.'

'असं कसं असेल? जमीन तिच्याकडं अन तिनंच दावा केला?' त्यांनीं विचारलं तिला .

इतक्यांत गोडांबे वकील तिथं आले. सदाचाऱ्यांचं तिकडं लक्ष नव्हतं. त्यांचं पक्षकाराकडून माहिती घेणं चाललं होतं.

'अहो, हें काय चालवलयंत तुम्ही?' गोडांब्यांनीं सखदाश्चर्यानं त्यांना विचारलं.

'प्लीज डोंट इंटरप्ट मी.' असं त्रासिकपणें म्हणून पुन्हा त्यांनीं तिला विचारलं 'सारा किती आहे बाई त्या जमिनीचा?'

'अहो मिस्टर सदाचारी'–

'काय हो? तुम्हांला काय सांगायचं तें कोर्टाला सांगा कीं. मला कां त्रास देतां उगीच?' कपाळाला आठ्या घालून ते म्हणाले.

'अहो काय प्रकार चालवला आहे तुम्ही हा? धंद्याला शोभत नाहीं आपल्या हें!'

'काय झालं हो धंद्याला न शोभण्यासारखं?' गोडांब्यांवर उसळून ते म्हणाले.

'मिस्टर सदाचारी शी इज माय क्लायट'–गोडांबे.

'काय तुमचा?'

'हो हो माझा. मघापासून मी तेंच तर सांगतोय तुम्हांला. पण तुम्ही ऐकाल तर ना? विचारा बरं तिला तुझे वकील कोण तें. काय बाई तुझे वकील ते कीं मी?'

'तुमी. मी तर कवापून सांगतेय माझे वकील येऊ द्या म्हून. पण ते म्हनले मीच तुझा वकील म्हून! अरं देवा! असं व कसं केलंत तुमी?' तिनं सोनोपंतांना विचारलं.

'अॅज ए प्रोफेशनल मॅन इट इज अन्‌फेअर ऑन युअर पार्ट मिस्टर सदाचारी.'

'एव्हरीथिंग इज फेअर! अँड नथिंग अन् फेअर, इन अवर प्रोफेशन! जाऊ द्या. चुकभूल द्यावी घ्यावी. अन् फारच वाटत असलं तुम्हांला तर पुरसीस देऊन तारीख मागून घ्या पुढची. मी देतो कन्सेंट. तोंपर्यंत जाईल सारं डोक्यांतून आमच्या. पुन्हा पाटी कोरी करकरीत होऊन जाईल आमची!'

'अहो पण तारीख तरी कोणच्या सबबीवर मागून घेऊ कोर्टात पक्षकार हजर असतांना?'

'हें पहा मिस्टर, करायचं म्हटलं म्हणजे सारं कांहीं होतं. सी. जज्ज हॅज नॉट यट कम. टेल हर दॅट ही इज ऑन लीव्ह. नंतर तारखेचं कार्ड टाकलं म्हणजे संपलं! चार दोन पैशांचा प्रश्न. दॅटस् ऑल!'

पण गोडांबे थोडे विचारांत पडलेले पाहून द्या हो तुम्ही अर्ज अडजर्नमेंटचा. कांहीं होत नाहीं. तोंपर्यंत मी जरा तिकडून चक्कर मारून येतों नि मग करतों सही अर्जावर' ते म्हणाले.

'तुमचाही क्लायंट बाहेर वाट पाहातोय तुमची.'

'लेट हर स्टे देअर. मी इकडून जातों म्हणजे झालं!' असं म्हणून सदाचारी साहेब येण्याच्या आंत आपल्या पक्षकाराच्या तावडींतून निसटले.

पण ते बाहेर पडतात कीं नाहीं तोंच त्यांना टांग्यांत घेऊन आलेला पक्षकार तिथं येऊन 'आपला नंबर निघालाय; ' पुकारलंय तुम्हांला. लवकर चला' म्हणाला.

तो घाई करीत होता खरा; पण त्यांना कुठं इतक्या घाईनं जावयाचं होतं? 'येतों रे. कां घाई चालवलीयस इतकी?–' असं ते त्याला म्हणाले.

'पन साहेब खटला' –

'खटला कुठं जातोय?'

'साहेब पन–'

'साहेबही कुठं पळून जात नाहीं. काय समजलास?'

'पन खटला काढून टाकील ना साहेब?'

'मग वरचं कोर्ट काय मेलंय काय? आपण वर जाऊं' अशा तऱ्हेचीं वाटेंत बोलणीं करीत शेवटीं एकदांचे ते कसेबसें तिथं येऊन पोहोंचले. पण समक्ष येऊन पाहतात तों झालं भलतंच! वकील पक्षकार हजर नाहींत या सबबीवर दावा काढून टाकला होता!

'हं चला म्हटलं बाहेर' असं म्हणत असतां पक्षकाराच्या पाठीवर सदाचाऱ्यांनीं थाप मारली.

'काय झालं?' पक्षकारानं मोठ्या आशेनं त्यांना विचारलं.

'अरे व्हायचंय काय ?'

'तारीख दिली व्हय म्होर?'

'नाहीं. या कोर्टांतलं काम संपलं तुझं'

'आपल्यासारख झालं व्हय?'

'आ–प–ल्या सारखं कां? निमंशिमं झालं आपल्यासारखं'–

'म्हंजी कसं?'

'साहेबानं लिहिलंय ' भानगडीचं प्रकर्ण आहे हें; तेव्हां तुम्ही अपिलांत जा. '

'अपीलींत गेलं पाहिजे तर मग आतां.'

पक्षकार खट्टू झालेला पाहून ते त्याची समजूत करीत होते 'तुला सांगतों, बघ, हें असं व्हायाच हें मला ठाऊक होतं, म्हणून तर मी गेलों दुसऱ्या कामाला. तुला माहीत नाहीं. अरे या लोकांना अपील कोर्टाला काम पुरविण्यासाठीं असं करावं लागतं बाबा! आंतून त्यांना हुकूम असतात तसे. नाहींतर मग सगळ्यांच्याच दाव्याचे मनासारखे निकाल लागायला लागले खालच्या कोर्टात, तर मग वरच्या कोर्टाला काम काय उरलं? मग त्यांनीं काय माशा मारीत बसायचं तिथं? सरकारला बंद करावी लागतील ना तीं, कामं नाहींत म्हणून? त्यासाठीं ही योजना आहे, समजलास? तेव्हां असं हें चालायचंच. हं चल आटोप टांगा आण.'

'पन मला इकडं ठेसनावर जायाचंय.'

'बरं तूं येऊ नकोस; पण मला तरी रुपया देशील कीं नाहीं टांग्याचा?'

'पैसे नाहींत ना आतां.'

'अरे बॅरिस्टरनं चालवला नसता, असा दावा चालवला तुझा; नि तूं टांग्याच्या पैशाकरता खळखळ करतोस? हं काढ काढ पैसे खिशांतून. अरे, अजून किती तरी खर्च करावा लागणार आहे तुला. एवढ्यानं काय झालंय?'

सदाचारी अगदी खनपटीलाच बसल्यामुळं त्या पक्षकाराला कणवटीचा रुपया काढून द्यावा लागला शेवटीं

'रात्रीं घरी ये म्हणजें ठरवू काय करायचे तें पुढं,' खिशांत पैसे टाकींत असता त्यांनी त्याला मधाचं बोट लावलं नि त्याच्यापासून झटकले.

आणि याच्या आधीच कांहीं वेळ त्या वस्तादानं कोर्टाच्या आवारांत गुंडो धोंडोला गांठलं होतं. 'अहो वकील तर म्हणत होते कीं हें काम होत नाहीं नि त्यांनीं उगीच तुम्हांला नादीं लावलं म्हणून–' तो म्हणाला।

'तें कालचं पोर! त्याला काय कायद्याचं ज्ञान आहे–?' धोंडोपन्त

'पण त्यालाच ना तुम्हीं इतके दिवस कायदेपंडीत ठरवलं होतं?'–वस्ताद

'हो, त्यावेळी वाटलं होतं तरतरीत दिसतोय माणूस, तेंव्हां कांहीं तरी कळत असेल त्याला.'

' अन् ते तर म्हणत होते, मला अवघे दोन रुपयें मिळाले म्हणून?'

' धडधडीत खोट बोलतोय तो. मी स्वत: पंधरा रुपये दिले त्याला.'

' अन् बाकीचे ?'

' बाकीचे तर तुमच्याच देखत वाटून टाकले'

' तेंही खोटं आहे. कारण मी आजच जाऊन, माझ्या देखत ज्यांच्या ज्यांच्या हातांवर तुम्ही त्यावेळीं पैसे ठेवले होते त्या साऱ्यांची गांठ घेतली. तर कांहीं म्हणाले ते पैसे ते कांहीं वेळानं घेऊन गेले. तर कोणी म्हणाले मागच्या येण्यापोटीं त्यांनी ते आम्हांला दिले. तुमचं कामही माहीत नाहीं नि तुम्हीही माहीत नाहीं आम्हांला.'

' असं कसं होईल ? आपण जाऊन उद्या रुजवात घालू.'

' बरं इतके पैसे खर्च केलेत, तसे ते कागदपत्र तरी कुठं आहेत? '

' पडले असतील वकीलाकडं ' बेपर्वाईनं धोडोपंत उद्गारले.

' पण मला ते हवे होते'

' आणा जरूर असली तर तुम्हांला. आम्हांला माहीत नाहीं.'

' असं म्हणून भागायचं नाहीं. कारण त्यांच्याकडं कागदपत्र मुळींच नाहींत. तसंच कोर्टातूनही तुम्ही नकला बिकला कांहीं एक काढल्या नाहींत, अस मला खात्रीपूर्वक समजलं आहे.'

' बरं झालं समजलं तर'

' बरं मग आतां माझ्या पैशाची वाट ?'

' आहेत कोणाजवळ तुमचे पैसे? केव्हांच खर्च होऊन गेले ते.'

' पंत असं म्हणून भागायचं नाहीं ' शांतपणें वस्ताद म्हणाला,

' अहो, आडमाप कुस्तीगीर, नाहीं तर तुम्ही काय कराल हो ?' एवढा वेळ गप्प बसलेल्या गुण्डयानं मध्यें तोंड घातलं

' हें पाहिलंस कां ?' असं म्हणत असता वस्तादनं त्याला अस्तन्या सारून ठोसा दाखविला.

' जाऊ द्या हो वस्ताद, माझ्याकडं लक्ष द्या तुम्ही '-धोडोपंत

' मग हें कुत्रं आवरा पाहूं आधीं'

‘ ए वस्तादा! ’

‘ नाकाड फोडून टाकील कमी जास्त बोलशील तर!’

‘ काय, मोगलाई लागलीय काय इथं ?’

‘ सांगतो तुला थांब.’ ‘ असं गुंड्याला म्हणून नंतर त्यानं ‘बरं काय हो माझे पैसे देता ना परत ?’ अस धोंडोपंताला विचारलं.

‘ पैसे नाहींत एकदा सांगितलं ना ’?

‘ असं ?’ असं म्हणून वस्ताद मिश्किलपणें किंचित हंसला. त्याचं तें हंसणं दोघांनाही थोडं भेसुरच वाटल आणि म्हणून ते प्रसंगीं एकाला दुसरा आधार म्हणून दूर होते ते एकमेकांजवळ आलें. त्या बरोबर ‘ हं काढा पैसे मुकाट्यानं ’ असं म्हणत त्यानं दोन्ही हातांनीं दोघांच्या मानगुटी धरल्या.

‘ पोलीस. पोलीस ’ गुंड्या ओरडायला लागला.

‘चुप. जास्त कमी गडबड करशील तर गळे दाबून खून करीन! कधीं सोडणार नाहीं. मुकाट्यानं पैसे काढा. त्याशिवाय सुटका नाहीं ’ आपल्या माना त्यांच्या कचाट्यांतून सोडवून घेण्यासाठीं ते दोघं धडपड करीत असतां वस्ताद म्हणाला.

धोंडोपंतांचा नाईलाज झाला. खिशांतून पैसे काढून त्यांनीं त्यांतल्या दहा दहाच्या नोटा वस्तादाच्या पुढं करीत म्हटलं ‘हं. घ्या हे तुमचे पैसे.’ धोंडोपंत पैसे मोजीत असतां ते किती आहेत हें वस्तादानं बघितलं होतं. ‘घाला माझ्या जाकीटाच्या खिशांत’ तो म्हणाला. त्याप्रमाणं धोंडोपंतान केलं तरी त्याची मानगुटी अजून सोडलीच नव्हती वस्तादानं. ‘अहो आतां सोडा कीं तो म्हणाला. आणि ‘ तसा कसा सोडतोय तुम्हांला? ‘त्याचं तें बोलणं ऐकून ‘ मग आता काय करणार? ’ भीतीनं धोंडोपंतानं विचारलं.

‘अहो, असं काय करता?’–गुंड्या.

‘कसं करतों? आं? कसं करतों?’ त्यांची टाळकीं एकमेकावर जोरानं आदळीत असतां वस्ताद म्हणाला ‘तुमच्या आयला लावला x x भडव्यानो असले धंदे करून पोटं भरतां त्यापरीस कांटें कां भरीत नाहीं पोटांत ? ’ असं म्हणत असतां तिरस्काराच्या दृष्टीनं त्यानं एकदां त्यांच्याकडं बघितलं आणि नंतर त्यांना सोडून दिलं.

'सुटलों भडव्याच्या तावडींतून!' गुंड्या म्हणाला.

'वस्ताद आहे लेकाचा!' डोक्यांच्या त्या आपटाआपटीनं धोंडोपंतांची टोपी खाली पडली होती ती उचलून डोक्याला घालीत असतां तो म्हणाला 'असलं गिऱ्हाईक आणीत जाऊ नकोस बुवा इथून पुढं.'

'मग कसलं आणू?' असं गुंड्यानं विचारलं खरं; पण यावेळीं त्याचं लक्ष तिथं होतं कुठं? ते सदाचारी, त्यांचा पक्षकार, त्यांनीं त्याला सोडून जाणं, इकडं होतं. त्यामुळं ते त्याला सोडून जातांच गुंड्या झपाझप पावलं टाकीत तिकडं गेला नि त्यानं त्याला गाठलं? आणि 'काय पाटील काय म्हणत होता तो डुल्या मारूती?' त्याला विचारलं. पण त्याचं ते बोलणं त्या गांवढळाला समजलं नाहीं. त्याचा तो गोंधळ उडालेला पाहून 'अहो, म्हणजे तो वकील? काय म्हणत होता तो? काय झालं तुमच्या दाव्याचं?'

'काम फार भानगडीचं आहे म्हणाले ते. तवा इथं आमच्यासारखं झालं निमं शिमं. बाकीच्यासाठीं अपीलींत जायाला होवं म्हणत होते ते.'

अहो, तो काय सांगतोय तुमच्यासारखं झालं म्हणून! त्याचं ढुंगणं हाललं तर ना जागचं? दावा काढून टाकला तो हजर नव्हता म्हणून! अहो! तो काय वकील आहे? का त्याला कांहीं अक्कल तरी आहे? तुम्हां लोकांना माहीत नसत. कोणी तरी वकील देऊन बसता तुम्ही. बरं आमच्या सारखीं माहीतगार माणसं अष्टोप्रहर तुमच्या सेवेला इथं आहोत तर तुम्हां लोकांना आम्हांला विचारायची बुद्धि होत नाहीं. इथं कोण चांगला? कोण वाईट? काय बरं माहीत असणार तुम्हांला? म्हणून आमच्याकडं आलात म्हणजे लायक माणसाचीच गांठ घालून देतों आम्ही. बरं आमच्या मार्फत गेल्यानं दोन पैशाची बचतही होते तुमची. पण तुम्हां लोकांना हें पटेल तेव्हां ना? मग काय यायाचंय कां आमच्याकडं? शिस्तशीर करून देऊ तुमचं काम, कीं पाहात राहा नुसतं!' वगैरे वगैरे बोलून त्यानं त्या खेडवळाला गटवलं आणि रात्रीं दुकानांत भेटतों म्हणून त्याच्याकडून आश्वासन घेतलं!

: ६ :

जुन्या दप्तरदाराची बदली होऊन नवा दप्तरदार येणार होता; त्यामुळं दप्तर कचेरींतल्या लोकांना स्वराज्य मिळालं होतं. त्याप्रमाणं कांहींजण गप्पाष्टकांत दंग होऊन गेलें होते; कोणी पुढल्या डेस्कावर तंगड्या टाकून अस्ताव्यस्त पसरले होते; कोणाचं धुम्रपान चाललं होतं तर कित्येकजण पानतंबाखुचे बारावर बार भरीत होते; इतक्यांत नुकतेच बदली कारकून म्हणून नेमलेले शामराव घैसार वर्तमानपत्र वाचीत आंत आले.

येतांच त्यांनीं आपल्या डाव्या हातांतील त्या पत्रांत आलेली एक बातमी मंडळींना कळविण्यासाठीं उजवा हात त्या पत्रावर जोरांत मारून प्रश्न केला 'यांतली बातमी वाचलीत कां आजची?'

त्यांचे ते शब्द कानावर येतांच सर्व मंडळींनीं आपापले कान टवकारून प्रश्नार्थक चेहरे केले.

'यापुढं लांचलुचपतीवर करडी नजर ठेवण्यांत येऊन एकाद्या सरकारी नोकरानं पैसे खाल्ले असं उघडकीला आलं तर त्याला कडक शासन केलं जाईल, असं यांत म्हटलं आहे' शामरावांनीं बातमीचा सारांश सांगितला.

तें ऐकतांच एवढा वेळ अस्ताव्यस्त पडलेले तात्या ताडकन उठून बसत म्हणाले, 'अहो यांत नवीन असं काय सांगितलंत तुम्ही?' त्यावेळीं त्यांनीं पुढील डेस्कावर आपला उजवा हात इतक्या जोरानं आपटला कीं तें बघणाराला त्यांच्या त्या विधानांतला जोर पुरेपूर कळून आला!

आणि तें पाहूनच कीं काय बापूंनीं हातांतलं विडीचं थोटुक फेकून दिलं आणि ते हातवारे करीत तुच्छता दर्शक स्वरांत म्हणाले 'अहो कैकजणांनीं आजवर प्रयत्न केले आहेत हे! पण म्हणावं कारकून म्हणजे रोजंदारीचे मजूर नाहींत! डोकीं असतात त्यांना!'

‘ पण मी म्हणतों पैसे खातंच कोण ? काय हो बापू ?’ तोंडातली पिचकारी तिथंच कडेला रद्दी कागदांच्या ढिगावर टाकून तोंड मोकळे करुन मिष्कीलपणें हंसत अण्णा म्हणाले; आणि त्यावर बापूंनीं ‘ खर आहे ’ असं म्हणतांच ‘ झालं तर मग ’ असं म्हणून त्यांनींहि डेस्कावर हात आपटला.

ते आणखीहि कांहीं बोलणार होते; पण त्यांचं नांव उच्चारीत दप्तर कचेरीचा पट्टेवाला आंत आला. त्याच्या मागोमागच एक कुणबाऊ पोषाख केलेला माणूस होता. त्याला पाहून ‘ याचंच आपल्याकडं काम असलं पाहिजे’ असा चटकन अण्णांनीं तर्क केला. आणि आतां भोअनी कशी काय होतं याचा ते मनांत विचार करीत मागील तक्क्याशीं कलंडले.

शिपायानं त्या माणसाला त्यांच्याजवळ सोडून तो चालता झाला; आणि त्यानं आण्णांच्या जवळ आसन ठोकलं.

‘ कोन गांवचं पाटील’ ? त्यांनीं धेडगुजरी भाषेंत त्याला प्रश्न केला.

‘ मी व्हयं ? किकवीचा.’

‘ अस्सं. बोला काय हुकूम आहे ?’

‘ हुकूम कसचा अन्नासाहेब? एका कामांतल्या नकला काढायच्या व्हत्या. तवा आमच्या गांवच्या कुळकर्ण्यानं सांगितलं आपल्यासनी भेटाया. म्हनले ते आमचे मामेभाऊ हायती. माजं नांव सांग. ते तुजं काम झट्दिशीं करत्याल.’

‘ बरं बरं. आमच्या मोरोपंतानं सांगितलं होय? अस्सं. बरं मग आणखीहि कांहीं सांगितलं असेल ना त्यानं ?’ असं म्हणत अर्थपूर्ण दृष्टीनं त्याच्याकडं पाहून ते हंसले.

त्यांच्या बोलण्याचा भाव त्याच्या ध्यानांत येऊन तोही हंसत हंसत म्हणाला ‘ सांगितलं ना त्यांनीं कीं पानसुपारी द्यावी लागल म्हनून.’

‘हं मग? मुद्याचं सोडूनच दिलं होतंत तुम्ही?’ असं म्हणत असता अण्णांनीं पुन्हां हस्तिदंती दाखविली. ‘ आतां बोला, कसल्या हव्या आहेत नकला तुम्हांला?’ असं म्हणत असतां कागद पेन्सिल घेऊन तो सांगेल तो मजकूर टिपून घेण्यासाठीं त्यांनीं अस्तन्या सारल्या.

‘ गंज जाळली म्हून फौजदारी झाली होती गेल्या शिमग्यांत–’

'कोणावर? तुझ्यावर?' असें आश्चर्योद्‌गार काढून आण्णा ताडकन उठून बसले; एकदां त्यांनीं त्याच्याकडं निरखून बघितलं; आपला चष्मा लावला; आणि पुन्हां त्यांनीं त्यांतून त्याचं आपादमस्तक निरीक्षण करीत म्हटलं 'थोडें सरकून बैस कीं. सरकारी कागदपत्रं पडलेलीं असतात आमच्या भोंवताली.'

तें ऐकून तोही थोडा सरकून बसला; आणि नंतर त्यांनीं मागील तक्यावर पुन्हा अंग टाकीत गंभीरपणें म्हटलं 'बरं पुढं ?'

'पुढं अपिलींत मला सोडून दिलं.'

'अस्सं.'

'त्याच्या निकालाच्या नकला काढायच्या हायती'

'समजलं. बरं तुझं नांव काय आहे म्हणालास?'

'केसू नामा रिसबूड'

'अन् गंज कोणाची जाळली होतोस तूं?'

'मी? अन् कवा?'

'नाहीं म्हणजे हा जाळपोळीचा खटला कुणी भरला होता तुझ्यावर?'

केसूनं त्याचंहि नांव सांगितलं.

'बरं खटला केव्हां भरला होता?'

'गेल्या पाडव्याच्या आंत भाइर'

'अनं निकाल केव्हां झाला?'

'झाला कीं असा वैख सरता सरता.'

'बरं अपीलाचा निकाल केव्हां झाला?'

केसुनं तेंही अजमासानं सांगितलं.

तो सांगत होता ती ती माहिती आण्णा इकडं पेन्सिलीनं टिपून घेत होते. जरूर तेवढं लिहून होताच 'हं काढ एक रुपया' असं म्हणत ते आपल्या उजव्या हाताची बोटं चाळवूं लागले.

'देतों ना; तुम्ही काम तर करा'

तो पैशाची आळंटाळं करतो आहे असं पाहून ते कुऱ्ह्यांतच उद्‌गारले, 'एवढ्या कागदाच्या ढिगांतून तुझे कागद शोधून काढायला तो कारकून

काय तुझ्या बापाचा नोकर आहे? त्याच्या हातावर नको दक्षिणा ठेवायला तुला ?'

'तसं कुटं म्हनतों मी?' असं म्हणत त्यानं खिशांत हात घातला. बिचाऱ्याला काय कल्पना कीं त्यानं दिलेल्या माहितीनंतर त्याचे कागद सांपडायला तसे फारच थोडे श्रम पडणार होते ते?

आपल्या पसरलेल्या हातावर आठ आणेच पडलेले पाहून 'हं. आणखी इतकेच हवेत. काढ. काढ.' असं म्हणत अण्णांनीं पुन्हा हाताची चाळवा-चाळव चालवली.

'पन'

'पण नको नि बीण नको; पैसे काढ आधीं.'

'अन्नासाहेब, गरीबाकडं पवा कीं जरा; कागद द्याया इतकं कशाला होवं ?'

'तें तुला नाहीं कळायचं. मी सांगतों तें ऐक आपला मुकाटचानं' ते म्हणाले.

शेंवटी नाइलाजानं त्यानं आणखी आठ आणे काढून त्यांच्या हातावर ठेवले.

रुपया हस्तगत होतांच अण्णा अस्तन्या सारून आणि आपलं आयुध- लेखणी – कानावर ठेवून तुंदील तनु हालवीत त्या खोलीबाहेर पडले; आणखी कांहीं वेळ ऑफीसमध्यें इकडून तिकडून गिरक्या मारून पुन्हां आपल्या जागेवर आले. 'फार त्रास झाला बुवा तुझा नंबर सांपडायला' असं म्हणत त्यांनीं हातांत आणलेले केसुचे कागद डेस्कावर उभ्यांनंच टाकले; आणि नंतर त्यांनीं पुन्हां तक्याशी अंग टाकलें.

'बरं आतां नकला करायला द्यायाच्यात ना? त्याची व्यवस्था?'

'त्याला खर्च काय येईल?'

'सरकारी फी होईल अजमासें दोन साडेतीन रुपयें; अन् अवांतर खर्च तितकाच येईल.' कागद चाळता चाळता अण्णा म्हणाले.

खर्चाचा तो आंकडा ऐकून केसू हादरलाच ! पण काम तर महत्वाचं आहे; तेव्हां काय पडेल तो खर्च केला पाहिजे' असं मनाशीं ठरवून त्यानं

मोठ्या कष्टानं आपली नाईलाजाची संमति दिली; आणि अशारीतीनं आण्णांचा हाही सौदा पटून त्याचा विसारही त्यांच्या हातांत पडला; त्याबरोबर लगेच त्यांनीं केसुच्या कामाची व्यवस्था लावली.

बऱ्याच वेळानंतर त्याचं काम होत आलं, तसं त्याला बाहेर बोलावून घेऊन ' बरं आतां माझी पानसुपारी?' म्हणून पुन्हां त्यांनीं त्याच्यापुढं हात पसरले.

' काय द्याया होवं?' अजीजीनं त्यानं प्रश्न केला. कारण त्याच्याजवळचे सारे पैसे जवळजवळ खलास झाले होते.

' दे काय देशील तें ' असं ते मोठ्या तोंडानं म्हणाले खरं; पण त्यानं पावली हातावर ठेवतांच ' अरे, पावलीला इथं पट्टेवाला देखील शिवत नाहीं! ' असं म्हणत ती त्यांनीं दूर भिरकावून दिली.

त्यानं ती पावली आणून तो पुन्हां त्यांच्यापुढं करीत गयावया करूं लागला. ' हें पघा अन्नासाहेब, म्होरल्यावक्तीं मी आलो म्हंजी आनखी आनीन पघा, पन आता–'

' मग म्होरल्यावक्तींच नकला बी ने कीं ' त्याचं बोलणं पुरं ऐकूनहां न घतां आण्णा कुत्सितपणें उद्‌गारले.

' तसं कसं बरं? लई निकडीचं काम हाय म्हून तर आलों इकल्या तांतडीनं.'

' अरे मग काम तांतडीनं व्हायाला हवं तर पैसा नको खर्च करायला? मी सारा दिवस मोडला तुझ्यासाठीं नि चार आण्यांच्या पसुड्या ठेवतोस माझ्या हातावर?'

' लई उपकार हायतो; पन या वक्तो सोडा मला. तुमच्या पाया पडतों पघा.'

' तें कांहीं नाहीं; मला एक रुपया तरी निदान तूं दिलाच पाहिजेस, तरच तुझं काम होईल आज.'

' पर काम तर तयार हाय ना ?'

तें ऐकतांच अण्णा पेटले. 'बघतों ना कागद कसे मिळतात तें? रुपया दिलास तर ठीक नाहींतर बोंबलत जावं लागेल तुला !' असं म्हणत

असतां आण्णांनीं तोंडावर हात ठेवून शब्दाबरोबरच कृतीनंही आपला भाव दर्शविला.

वास्तविक यावेळीं या ना त्या स्वरूपांत केसुचे दोन तीन रुपये तरी त्यांच्या खिशांत पडले होते; पण तेवढयावर त्यांचं समाधान नव्हतं. त्यामुळं 'बघतों ना कसे कागद मिळतात तें!' अशी पुन्हां भीष्म प्रतिज्ञा करून ते तिथून निघून चालते झाले; आणि केसू विषण्ण मनस्थितींत शून्य दृष्टीनं बघत उभा राहिला. इतक्यांत आण्णांच्याबद्दल असूयाबुद्धीनं पेटलेले बापू आपण सहज बाहेर आलों असं दर्शवीत त्याच्याजवळूच गेले आणि म्हणाले 'काय पाटील, झालं कां काम तुमचं?' आणि मानेनं त्यानं नकार दर्शवितांच ते हळूहळू त्याच्या कानांत आण्णाबद्दलचं वीष ओकूं लागले.

'तू तक्रार कर वरती. म्हणावं काम झालं असून देत नाहींत' शेवटीं त्यांनीं त्याला सल्ला दिला. भोळा बिचारा केसू! त्याला तो सल्ला पटला. तसं ते हळूच त्याला म्हणाले 'त्या पलीकडच्या बाजूला लिहिणारा माणूस बसला आहे. त्याच्याकडून आण अर्ज लिहून' असं म्हणून त्यांनीं त्या अर्जांत नमूद करण्यासाठीं आण्णांचं नांवही त्याला सांगितलं.

'अशानं तरी आपलं काम होईल' अशा वेड्या आशेनं केसू अर्ज लिहून आणण्यासाठीं तिकडं गेला; आणि आतां आण्णाविरुद्ध चांगलीच आग भडकणार म्हणून मनांतले मनांत समाधानाचे मांडे खात बापू आपल्या जागेवर जाऊन बसले. ही बातमी अगदीं गुप्त ठेवून खरोखरीची आग भडकलेली बघावी आणि आण्णांचा नक्षा चांगलाच उतरावा अशी बापूंची मूळची मनीषा. पण त्यांची विघ्नसंतोषी वृत्ति थोड्यांच वेळांत मनांतले मनांत दबली जाणं अशक्य झालं तेव्हां त्या खोलींतले दुढ्ढाचारी जे तात्या त्यांच्या कानावर त्यांनीं ती बातमी घातली. अर्थात यावेळीं 'आपण यापासून अगदीं अलिप्त आहोंत' हें दाखवण्याची त्यांनीं दक्षता घेतली होती, हें सांगण्याची आवश्यकता नाहींच.

तें ऐकतांच घाबरल्यासारखं दाखवून तात्या म्हणाले, 'अहो, यानं भलतंच होईल ना? त्याच्यापेक्षां तुम्ही आपलं असं करा; म्हणजे साऱ्यांनाच दोन पैसे मिळवून आपसांतले आपसांत सारं प्रकरण मिटेल' असं म्हणून बापूच्या कानाशीं त्यांनीं बराच वेळ कुजबूज केली.

शेवटीं बापूंना त्यांचा सल्ला पटला. तसं त्यांनी आपली पगडी फिरवली ते आण्णांच्या जवळ गेले आणि त्यांना सांगू लागले, ' तो तुम्हांला हात दाखवीत होता नाहीं कां? आतां बघाल थोड्याच वेळांत त्याची कशी सोळा आणे जिरते तें ' असा प्रस्ताव करून तात्यांनीं सांगितलेली युक्ति त्यांनीं त्यांच्या कानांत सांगितली आणि आपले बुडणारे पैसे वसूल होणार या आशेनं 'तरी बापू आहेत आमचे!' असं म्हणून आण्णांनीं त्यांच्या डोकेबाजपणाची प्रशंसा केली.

बापू तिथून निघाले आणि शेजारच्या खोलींत बसलेल्या शामरावांचेकडे गेले. ते यावेळीं खुर्चीपुढं उभे राहून टेबलावरील मिसली चाळण्यांत गर्क होते. बापुंनीं आपल्या आगमनाचा हेतू कळवला आणि नंतर नाटक कसं रंगवायचं तेंही सांगितलं.

शामरावांचा या खात्याशीं नुकताच कुठं संबंध आलेला होता. त्यामुळं इथल्या वातावरणाशीं ते कुठल्याच बाबतींत निगडित झाले नव्हते. तसेंच त्यांच्या सद्भावनाही नाहींशा झाल्या नव्हत्या. त्यामुळं त्यांना ही सारी कारवाई पाहून प्रथम कसंसंच वाटलं. पण कां कीं, कोण जाणें, ' ठीक आहे. बघतों मी ' असं म्हणून त्यांनीं बापुंच्या कृतीला शेवटीं संमति दिली.

नंतर बापू पट्टेवाल्याच्या कानाशीं लागले.

शेवटीं सारा बार भरून होतांच ते आपल्या जागेवर जाऊन बसले!

थोड्याच वेळांत ' तुला साहेबांच्याकडं अर्ज द्यायाचा आहे ना? ' असं म्हणून पट्टेवाल्यानं केसुला शामरावांचे खोलींत आणून सोडलें.

त्यांचा रुबाबदार चेहरा आणि अपटुडेट पोषाख, तसंच टेबल, खुर्च्या इत्यादि तिथला थाट पाहून केसुनं त्यांना नम्र भावानं मुजरा करून अर्ज टेबलावर ठेवला आणि थोडक्यांत आपली हकीकत सांगितली.

' बरंय् मी कामांत आहे. बैस थोडा मग मी बोलावून घेईन ' असं सांगून शामरावांनीं त्याला खोलीबाहेर जाण्यास सांगितलं.

त्यांच्या आज्ञेप्रमाणं तो बाहेर आला. आतां आपलं काम निश्चित होणार याची त्याला खात्री होऊन चुकली. तो गांवाहून आला तो थेट कचेरींतच आला होता. तेव्हां हें काम हातांत पडतांच गांवांत जाऊन त्याला बायकोला चोळीचा खण, पोरांना कापड, खाऊ वगैरे वगैरे बराच

बाजार करायचा होता; आणि त्यासाठीं त्यानं अगोदरपासूनच एक दहा रुपयांची नोट अगदीं खोल खोल अशी ठेवून दिली होती. ती जागचे जागीं सुरक्षित आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं यावेळीं त्यानं खिशांत हात घातला होता, आणि मनांत पुढील बाजार रहाटासंबंधीं योजना चालल्या होत्या, इतक्यांत तात्या गंभीर चेहरा करून त्याच्याजवळ आले आणि हलक्या आवाजांत त्याला सांगू लागले 'अरे वेडचा, हें काय भलतंच करून बसलास ? मी इतके इतके पैसे दिले नि तें आणखी मागत होते' असं लिहिलंस अर्जांत ! तुला ठाऊक नाहीं वाटतं कीं लाच घेणारा इतकाच तो देणाराहि दोषी ठरतो तें? त्यांतून तो पडला कारकून; त्याला साहेब कसंही वाचवतील. पण तुला इथंच पडावं लागेल हातकड्या घालून! '

केसुला हा साराच प्रकार अनपेक्षित होता. आपण आलों कोणच्या आशेनं आणि हें होतें आहे काय! याची कल्पना त्याच्या मनांत येतांच तो अत्यंत घाबरून गेला, आणि मग 'मी आतां काय करूं हो?' म्हणून त्यांच्याजवळ गयावया करूं लागला.

'मी काय सांगू बुवा! तुझा तू बघ' असं म्हणून ते तिथून झटकले. त्यांचे केसुजवळ येण्याचं एवढंच काम होतं!

आतां पुढं काय करावं?' या विवंचनेंत तो पडला असतांच पट्टेवाला तिथं आला आणि त्याच्या कानाशीं लागून म्हणाला 'या म्हातारबुवांचं आमच्या साहेबांजवळ फार वजन आहे, तेव्हां तुझ्याजवळ काय असल नसंल तें काढ नि त्यांच्या हवाली करून पाय धर त्यांचे. 'वांचवा' म्हणावं मला यांतून !' म्हणजे ते साहेबांच्याजवळ रदबदली करून अर्ज फाडून टाकतील. नाहीं तर इथल्या इथं बेडचा पडतील बघ.' त्यानं केसूला हा जो फुकट सल्ला दिला तो खरोखरच फुकटचा होता कां? नाहीं. प्राप्तींत त्याचाहि वाटा होता. एरवीं या जगांत –निदान त्या जगांत तरी– फुकट कोण कोणाकरितां काय करतो ?

केसूनं भीत भीत खिशांतून ती दहा रुपयांची नोट काढीत म्हटलं 'काय आहे नाहीं तें एवढंच आहे हो! हें द्या त्यांच्याजवळ अन्–' पुढं त्याच्यानं बोलवेना, इतकं त्याला चाललेल्या प्रकाराबद्दल दुःख होत होतं. पण तिथल्या कोणालाच त्याचं काय होय ?

पट्टेवाल्यानं ते पैसे तात्यांच्याजवळ दिले आणि त्यांनीं ज्याच्या त्यांच्या कर्तबगारी प्रमाणं त्यांची वाटणी करण्याचं काम शामरावांच्याकडं सोंपवून ते पैसे त्यांच्या स्वाधीन केले.

तोंपर्यंत इकडं केसुचं काम झालं होतं.

तो जड पावलांनीं तिथून निघून गेला होता; इतक्यांत पट्टेवाल्यानं त्याला पुन्हां बोलावलं; आणि शामरावांच्या खोलींत आणून सोडलं.

'जवळ होतं नव्हतं तें जाऊन आणखी पुन्हां काय होतं आहे? ' अशा सचिंत मुद्रेनं तो त्यांच्याकडं बघत होता, इतक्यांत शामरावांनीं त्याला प्रश्न केला 'काय रे झालं कां तुझं काम ? '

'होय साहेब,' हें विचारण्यापुरतंच आपल्याला बोलावलं असेल असा विचार मनांत येऊन केसूचा जीव खालीं पडला. त्यानं विचारलं 'जाऊं साहेब?'

'हें घे' असं म्हणत शामरावांनीं त्याची नोट त्याच्याकडं फेकीत म्हटलं 'जा आतां '

केसुला शामरावांनीं बोलावलं त्याच वेळीं तात्या बापू प्रभृतींना त्यांच्या कृतीची शंका आली होती, म्हणून ते सारेजण काकदृष्टीनं त्यांच्याकडं त्यांच्या खोलीच्या दाराशीं उभे राहून बघत होते; आणि केसुनं शामरावांना कृतज्ञतेनं रामराम करून जसं त्यांच्या खोलीबाहेर पाऊल टाकलं तसं ही मंडळी त्यांच्या टेबलाजवळ येऊन आंतले आंत संतापाचे कढ दाबीत म्हणाली ' काय केलंत तुम्ही हें?'

'शरम वाटायला हवी होती तुम्हांला तुमच्या कृतीची! तें उलट मलाच विचारतां तुम्ही काय केलंत म्हणून?' शामराव संतापांत उद्गारले. 'इतक्या क्षुल्लक गोष्टीकरतां – केवळ एक रुपयासाठीं – दुसऱ्यावर वाटेल तें संकट आणायला अण्णा तुम्ही मागं पुढं पहात नाहीं! आणि तुम्ही सारे त्यांना मदत करता! यापेक्षां माणुसकीचा खून तो आणखी काय करायला हवाय?'

'नवीन आहांत अजून तुम्ही! तेव्हां इतक्यांत नाहीं कळायचं तुम्हांला तें!' असं म्हणत बुढ्ढे जवान तात्या निराशेनं तेथून परतले.

आण्णा आपल्या आसनाकडं जाता जाता कुत्सितपणें पुटपुटले ' बी. ए. आहेत झालं !'

संग्रहालय, अनुक्रम ३००५३ विभाग वा.वा. क्रमांक २२२३ नों. दि. ११/११/५९

'हंः अहो म्हणजेच बेअकली आहेत ! ' बापुंनी तुच्छतेनं बोलून बी. ए. या पदवीचं स्पष्टीकरण केलं. आणि शामरावांचं लक्ष त्या साऱ्या बोलण्याकडंच असल्यामुळं वरील उद्गार त्यांच्या कानावर येतांच 'चालायचंच ' अशा अर्थी ते फक्त 'हंः' करून गालांतले गालांत किंचित् हंसले.

**: ७ :**

नवीन दप्तरदार येत होते आणि जुने जात होते; याप्रमाणं आमच्या आयुष्याचे दिवस चालले होते. उडदामाजी काळे गोरे काय निवडावे? याप्रमाणं आमच्या लेखी सगळे सारखेच ठरायचे! साप काय, नाग काय किंवा फुरसं काय, जात वेगळी असली तरी एकजात सगळे प्राणघेऊ प्राणी ! त्याप्रमाणं मागं नानासाहेब गेले नि त्या ठिकाणीं मामासाहेब आले. आणि आतां मामासाहेब जाऊन रावसाहेब आले तरी–हो मी लिहिणार होतों आम्हांला ते सारखेच म्हणून ! पण चूक झाली असती ती माझी! कारण तीं विषं परिचयांतं पचवू शकलों आम्ही; पण हें हलाहल पचवणं फार कठीण गेलं साऱ्यानांच! एक एक पापग्रह राशीला आला तर माणसाला हैराण करतो तो! मग सारेच पापग्रह एकाद्याच्या राशीला येऊन बसले तर काय गत होईल त्या बिचाऱ्याची ? पण ते सारे रावसाहेबांच्या रूपानं आमच्या राशीला आले होते ! खरोखरच ते साऱ्या पापाग्रहांचा अर्क होते ! शनीप्रमाणं ते अंतर्बाह्य काळे होते. सतापले म्हणजे मंगळाप्रमाणं लाल होत असत. ज्याच्यावर त्यांची वक्रदृष्टी होई त्याला रवीप्रमाणं नुसतं भाजून काढीत असत आणि राहूसारखे त्यांच्या तावडींत सांपडलेल्यांचा ग्रास घेणारे होते ते!

हे राजेश्री तालुका कोर्टांतून डिस्ट्रिक्ट कोर्टांत जें आले तेंच मुळीं 'कर्तबगार करडा अमलदार!' वगैरे वगैरे बिरुदावलि धारण करून वाजत

गाजत आले! पण त्याच वेळीं असा एक आंतला आवाज कानावर येत होता कीं, त्यांनीं तपासणीचेवेळीं कोर्टातल्या कारकून मंडळीवर सक्तीचा तपासणी कर बसवून तपासणी पार्टीची उत्तम सरबराई केली! त्यांतल्या त्यांत आण्णासाहेबांचा फारच उत्तम बंदोबस्त ठेवला होता, म्हणून बदलीच्या स्वरूपांतलं हें पारितोषिक त्यांच्या पदरांत पडलं होतं. तें खरं असो, खोटं असो एवढी गोष्ट खरी कीं आण्णासाहेबरूपी शंकरानं या भस्मासुराला वर देऊन त्याला वर आणला; आणि त्या बळावर त्यानं कहर करून सोडला अगदीं !

सालावादप्रमाणं सुवासिनींचं चैत्रागौरीचं हळदीकुंकू व्हायाचंच त्याप्रमाणं आमच्या खिशाला खार लावून जुन्याच्या बोळवणीचे आणि नव्याच्या आगमनाचे समारंभ घडून यावयाचेच. तसं या ी वेळीं झालं. कोणाचीही इच्छा नसतांना मामासाहेब आणि रावसाहेब या दोघांचाहि स त्कार करावा लागला आम्हांला ! या महाराजांचा फार पूर्वींपासून परिचय ोता मला मी नोकरीला लागलों त्यावेळीं हे नुसते मि. अमुक अमुक म्हणून ओळखले जात. त्यावेळीं त्यांचा आतांच्या सारखा रुबाब नव्हता आणि त्यांनीं तसा तो दाखवला असतां तरी त्यावेळीं त्याला कोणी महत्त्वही दिलं नसतं. त्याच वेळीं त्यांनीं एक महत्त्वाचा कागद हरवला आणि 'जे केलें बहुपाप कर्म इतरिं' या न्यायानं त्यांनीं ते आमच्यावर ढकललं! पुढं तो सांपडला हे आमचं भाग्य! नाहींतर त्याचवेळीं आमची नोकरी जायाची! नंतर त्यांचा माझा दुसऱ्यानं संबंध आला तो ते शिरस्तेदार आणि आम्ही त्यांच्या हाताखालचे कारकून या नात्यानं. त्यावेळीं ते 'राव' होते. म्हणून त्यांना विशेषसा भाव नव्हता. त्यामुळें तेव्हां जरी त्यांनीं आम्हांला त्रास दिला असला तरी त्याची धास्ती वाटण्याइतका अधिकार नव्हता त्यांना त्यावेळीं! तेव्हां ते गृहस्थ मला ओळखीत नव्हते असं कसं होईल? पण आतां ते साहेब झाले होते ना? जो तो 'रावसाहेब' 'रावसाहेब' करायचा मग आतां आपणहून ओळख कशी द्यायाची त्यांनीं ? त्याप्रमाणं त्यांनीं जागेचा चार्ज घेऊन ते आपल्या खुर्चीवर येऊन बसल्यानंतर कामानिमित्त मी दोनतीन वेळां त्यांच्या समोरून गेलों पण त्यांनी त्या त्या वेळीं माझ्याकडं पाहून न पाहिल्यासारखं दाखवलं. शेवटीं मी त्यांच्यासमोर जाऊन

त्यांना नमस्कार केला पण त्यांनीं शिष्ठाचाराप्रमाणं उलट नमस्कार न करतां 'तुम्ही इथं आहात कां?' एवढंच बोलून आपण कामांत अगदीं गढून गेलो आहोंत असें मला दाखवण्यासाठीं पुन्हां खालीं डोकं घातलं आपलं !

रावसाहेब हे दुय्यम अधिकारी असले तरी कनिष्ठावर हुकमत कशी गाजवायची आणि त्याबरोबरच वरिष्ठांना खूष कसं करायचं हें तंत्र त्यांना चांगल साधलं होतं.त्याच्या बळावर त्यांनीं मी मी म्हणणारांना पाणी पाजलं होतं. तसंच कित्येकांना खडे चारले होते त्यांनीं ! प्रतिस्पर्धी सम न पाहून त्याच्याशीं हवेतसे डावपेंच खेळावेत-नव्हे या व्यवहारी जगांत कर्तबगारीचं लक्षण ठरतं तें. पण गरीब बिचाऱ्या मुंग्यावर पाय देऊन चिरडून टाकायच्या त्या ! यांत कसला पुरुषार्थ? नि कसली बहादुरी? पण त्यांची सारी कर्तबगारी अशाच कामीं खर्ची पडत असे! -साऱ्याच दप्तरदारांच्या हाताखालीं उमेदवार गुलामाचं जिणं कंठीत असले तरीते आम्हांला तसं तोंडावर बोलून उघड उघड पाणउतारा तरी करीत नसत. पण हे गृहस्थ नेहमीं कोणाजवळही म्हणत ' माझ्या हाताखाली इतकी इतकी माणसं आहेत; नि मी त्यांचा हवा तसा उपयोग करून घेऊ शकतो. कुणीहि कारकुनानं म्हणावं मला इतके उमेदवार मदतीला द्या. ' पाच मिनिटांत मी हजर करतों त्यांना त्यांच्यापुढं !' बरं कुणी म्हणालाच त्यांना 'अहो, आपण त्यांच्या पोटाला घालीत नाहीं, तर त्यांना फुकट राबवून घेण्याचा काय अधिकार आहे आपल्याला?' तर त्या राजेश्रींनीं म्हणावं 'एकाद्यानं विधवेला वस्तीला जागा दिली म्हणजे तिच्या पोटाचीहि जबाबदारी पडते काय त्याच्यावर ? तिनं मिळालं तर खावं; नाहींतर उपाशी राहावं. पण म्हणून तिला जागा दिल्याचा मोबदला घेतल्याशिवाय तो सोडील कीं काय तिला ? '

ते बोलायला लागले म्हणजे तोंडाला फेस येईपर्यंत बोलत! खायाला लागले म्हणजे पोट फुटेपर्यंत खायाचे! आणि आमच्या सारख्याकडून कामं करून घ्यायाला लागले म्हणजे रक्त ओकेपर्यंत काम करून घ्यायाचे ते! असं एकंदरीत सगळंच आगळं होतं त्यांचं!

त्यांचे नेहमीं दोन पोषाख असत. बाहेरचा पांढरा आणि ऑफीसांतला काळा! काळा पोषाख त्यांच्या ऑफीसांतल्या कृष्ण कृत्याचं द्योतक होता तर पांढरा पोषाख सारं करून सवरून नामानिराळेपणा दाखवणाऱ्या ढोंगीपणाचं निदर्शक होता. पण त्यामुळंच कळकट काळ्या शरीराकडं बघणं माणसाला सुसह्य तरी होत असे. आतां त्यांच्या त्या काळ्या कुळकुळीत शरीरामुळंच ते लांब असतांना ते कपडे हवेवर तरंगत तर येत नाहींत ना ? असा दुरून पाहाणाऱ्याला संभ्रम निर्माण होत असे ही गोष्ट वेगळी!

आमच्याकडं हे महाराज आल्यानंतर लवकरच संक्रांतीचा सण आला होता, तें निमित्त साधून त्यांनीं तिळगूळ समारंभ केला. त्यांत प्रेम नव्हतं; जिव्हाळा नव्हता; तर आम्हा लोकांना स्वतःच्या अधिकाराची जाणीव आणि आम्हांला तंबी द्यायची होती त्यांना. कारण त्यांनीं समारंभाचं स्थळ योजलं ते घराऐवजीं ऑफीस आणि वर्षांतून निदान त्या दिवशीं तरी गोड बोलावं माणसानं त्याऐवजीं ते बोलले अत्यंत कडू! बरं सभेंत वक्त्यानं उभं राहून बोलावं असा शिष्ठाचार आहे. आणि इतकी साधी गोष्ट त्यांना माहिती नसेल असं कसं म्हणावं? पण ते जे काय बोलले तें बसून. मला वाटतं आपल्यापुढं जे लोक उभं राहून अदबीनं बोलायचे त्यांच्याच पुढं ते बसलेले असता आपण उभं राहून बोलायचं हें कमीपणाचं वाटलं असावं त्यांना !

'आज गोड बोलायचा दिवस' त्यांनीं आपल्या वक्तव्याला सुरवात केली 'पण तुमच्या आमच्यामध्यें कांहीं स्नेहाचं नातं नाहीं. तें आहे अधिकारी नोकराचं! तेव्हां ज्याला यशस्वीपणें आपली कारकीर्द गाजवायची आहे त्याला गोड बोलून भागायचं नाहीं; आणि म्हणूनच मीहि या प्रसंगीं गोड बोलणार नाहीं. त्यासाठीं मी बोलावलंही नाहीं. माझं आतां होणारं बोलणं ऐकून आपल्यावर ही संक्रांतच बसली असं जर कुणी म्हणालां तरी मला त्याचं कांहीं वाटणार नाहीं. तुमच्याकडून बरं म्हणवून घेणं हा माझा उद्देश नसून आपली कारकीर्द यशस्वी करून दाखवणं हा आहे. तसंच मला

तुमचीं मनं सांभाळायचीं नसून माझी नोकरी सांभाळायची आहे. तेव्हां मला माझ्या विषयींच्या तुमच्या बऱ्या वाईट मताची क्षिती वाटत नसून कोर्टाचं काम कसं होतंय् एवढंच मी पाहाणार! आणि त्यासाठीं कोणाला कठोर बोलावं लागलं तरी बोलणार ! त्यापायीं कोणाचीं मन दुखावलीं गेलीं तरी त्याची मला यत्किंचितही पर्वा नाहीं. तेव्हा या प्रसंगीं तुम्हा मंडळींना मला सांगायचं इतकंच कीं, ऑफीसरच्या कांही गोष्टी तुम्हांला पटल्या नाहींत तरी त्याच्याविषयीं तुम्हांला आदर दाखविला पाहिजे. तसंच आमचं वागणं अन्यायाचं वाटलं तरी त्यापुढं तुम्ही मुकाट-पणीं मान तुकवली पाहिजे. यत्किंचितही न कुरकुरतां अगदीं बिनबोभाट त्या गोष्टी झाल्या पाहिजेत. इतर वेळीं आम्ही तुमच्यांतले असलों तरी आम्ही खुर्चीवर बसल्या नंतर गादीचा मान राखला पाहिजे तुम्ही! ऑफीस म्हणजे लोकशाही कारभार नव्हे. तेव्हां सरकारी कामं व्यवस्थित व्हायाला हवीं असतील तर तीं गोडींत कधीच व्हायाचीं नाहींत. तिथं जुलूम जबरदस्ती होणं अपरिहार्य आहे! तुम्हांला सुख होतंय कां दुःख होतंय्? तुम्ही उपाशी आहांत कीं भरल्या पोटीं आहांत? हें बघायचं आम्हांला कांहीं एक कारण नाहीं. इथं ज्यांना जुलूम जबरदस्ती वाटत असेल त्यांनीं खुशाल इथून चालतं व्हावं! त्यांच्या जागीं दुसरीं माणसं येतील. माणसावाचून सरकारी कामाचा गाडा कधींच आडत नसतो. माणसाकडून तो ओढला गेला नाहीं तर जनावराकडून ओढू. म्हणजे काय? तुम्ही शहाणे असाल तर तुमच्या ठिकाणीं मूर्ख येतील, त्यांच्याकडून आम्ही कामं करून घेऊं. नाहीं तरी या कामाला शहाणीं माणसं नकोच आहेत आम्हांला. बोजे उचलायला घोड्यांपेक्षा गाढवंच जास्त लायक ठरतात! इथं कांहीं शहाणीं माणसं आहेत. ( माझ्याकडं दृष्टीक्षेप करून) त्यांना उद्देशून मी हें बोलत आहें. हवें तर आतांच मी म्हटल्याप्रमाणं त्यांनीं इथून खुशाल जावं, नाहींतर मुकाटपणें इथं काम करावं. आणि त्यांनीं केलं नाहीं तर मी करून घेईन त्यांच्याकडून! मग तीं गोडींत करा नाहींतर धुसफुसत करा. तसंच तीं झाल्यावर मग आम्हांला शिव्या द्या नाहीतर ओव्या गा.'

असें बोलल्यानंतर त्यांनीं दिलेला तिळगूळ कोणाला गोड लागणार?

त्यानंतर लवकरच त्यांनीं आमच्याकडून सक्तीनं वर्गणी वसूल करून दप्तर कचेरीतर्फे श्रीखंडपुरीच्या जेवणाचा बेत केला होता. त्यावेळीं त्यांनीं आण्णासाहेबांची काय बडदास्त ठेवली होती म्हणतां,बोलायची सोय नाहीं! दप्तरं बांधण्यासाठीं आणलेल्या मांजरपाटाच्या ताग्याच्या त्यांच्यासाठीं त्यांच्या ऑफीसपासून दप्तर कचेरीपर्यंत पायघड्या घातल्या होत्या. तसंच अत्तर, गुलाब, उदबत्त्या, रांगोळ्या नुसता थाट करून सोडला होता! त्यांना खूष करून पुढची जागा पटकावायची होती ना त्यांना? त्यासाठीं एवढं हवंच! आमच्या पैशांत बाकीच्या कारकून मंडळींनाही व्याही भोजन मिळालं. पैसे देणारांची कोण पर्वा करतो? त्यांना मिळालं, मिळालं; नाहीं, नाहीं; असाच प्रकार झाला.

त्या मेजवानीचं सार्थक झालं! कारण यानंतर लवकरच त्यांना फर्स्ट क्लास कोर्टाच्या क्लार्क ऑफ दी कोर्टची जागा बहाल केली गेली! आम्हांला ती वार्ता ऐकून आनंद कां, परमानंद झाला! त्यांना बढती मिळाली म्हणून नव्हे; तर आमची पीडा टळली म्हणून! कारण ते जज्ज झाले असते किंवा फरास झाले असते तरी दोहोंचही शुभाशुभ सारखंच होतं आम्हांला!

त्यानंतर सत्कारसमारंभ! हार, तुरे, अत्तर, गुलाब, पानसुपारी, जेवणावळी! पुन्हां सारा तोच थाट! आणि त्या जेवणावळीच्या मोबदल्यांत त्यांच्यावर स्तुतिसुमनं उधळलीं! ज्याच्या अरेरावी वृत्तीला लोक कंटाळून गेले होते त्याच्यावरच इतका स्तुतीचा वर्षाव होतो कसा, याचं मोठं कोडं पडलं मला! असो. आमच्याकडून ते गेल्यामुळं आम्हांला आनंद झाला खरा; पण आमचा तो आनंद फारच अल्पजीवी ठरला! कारण त्यानंतर त्यांनीं आम्हांला दोन हुषार उमेदवार द्या म्हणून आण्णासाहेबांजवळ मागणी करून ज्यांचीं नांवें सुचवलीं त्यांत मी आणि वाकडे हीं दोन नांवं होतीं. बाह्यता जरी हुषार म्हणून आमचीं नांवं सुचविलीं गेलीं असलीं तरी त्यांत अंतस्थ हेतू वेगळाच होता त्यांचा; आणि तो म्हणजे वाकड्यांचा

हरकामीं उपयोग व्हायाचा. शिवाय कुठं कोण काय बोल-तोय् आपल्याविषयीं याची बित्तंमबातमीही लागायची त्यांच्या-कडून; म्हणून ते; आणि आमचा चांगलाच कांटा काढा-यचा म्हणून आम्ही!

पण काळ जातो तशी परिस्थितीही नकळत पालटत असते तसंच स्वार्थावर आधारलेली माणसाचीं मतंही केव्हां पालटतील त्याचा नियम नसतो. त्याप्रमाणं रावसाहेबांनीं आण्णासाहेबांना खूष करण्यासाठीं मेज-वान्या केल्या. आणि आण्णासाहेबांनी त्याच्या मोबदल्यांत 'अमलदार असावा तर असा असावा' म्हणून चार लोकांत त्यांची पाठ थोपटली. आणखी त्यावरून बाह्यतः त्यांची दोस्ती आहे असा जरी जगाला भास झाला असलो तरी तो सारा देखावाच होता आणि अंदरकी बात वेगळीच होती हें पुढं दिसून आलं.

रावसाहेबांना कटीशूलाचो व्यथा दांडगी असल्यामुळं अज्ञानांच्या इस्टेटींची व्यवस्था पाहण्याचं काम आपल्याकडं आलं असतां त्या इस्टेटींच्या वहिवाटीबरोबरच अज्ञानांच्या तरण्याताठ्या मातांच्या-वरही देखरेख करण्याचं काम आपल्याकडं येईल आणि त्यानिमित्तानं त्यांच्याकडं आपली जा ये सुरू झाली म्हणजे सहजासहजी आपलं इच्छित साधेल; असा हेतू मनांत बाळगून त्यांनीं अण्णासाहेबांचेजवळ त्या जागेची मागणी केली होती. पण रावसाहेब या बाबतींत कसं गुणी बाळ आहे याची आण्णासाहेबांना पुरेपूर खात्री असल्यामुळं त्यांच्यामुळं पुढं मागं त्यांना (आण्णासाहेबांना) कमीपणा येऊ नये म्हणून त्यांची त्या जागेबद्दल शिफारस न करतां ती दुसऱ्याच माणसाची केली; आणखी त्या जागेपेक्षां ही जागा देण्यांत मी तुमचा जास्त फायदा करून दिला असं त्यांना सांगून ती जागा त्यांना देऊन त्यांना जे सतत काळजी करीत बसावं लागलं असत त्या बाबतींत ते निर्धास्त झाले.

रावसाहेबांच्या हें जसं ध्यानांत आलें तसं आण्णासाहेबांच्या करता आपण इतके दिवस जें केलं त्याच्या मोबदल्यांत त्यांनीं आपला कांहींही फायदा करून दिला नाहीं. आपण केलं तें सारं वाया गेलं! या माणसाला

याची यत्किंचितही जाणीव नाहीं असं वाटल्यामुळं त्यांच्यावर तें मनांतले मनांत खूपच चिडले आणि शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं ते उघड उघड त्यांना शिव्या द्यायाला लागले; आणखी वाकड्यासारखी माणसं त्यांच्या पदरी असल्यामुळं साहजीकच त्या आण्णासाहेबांच्या कानावर जाऊ लागल्या. पण ते त्यांच्याबद्दल साहेबांच्याजवळ शिफारस करून बसले होते; त्यामुळं आतां त्यांच्याच बद्दल कांहीं विरुद्ध बोलायचं म्हणजे आ.प-ल्याच शद्बाला बाध येतो असं वाटून मुकाटपणें तें सारं सहन करीत होते ते.

हवं असलेलं माणसाला मिळत नाहीं म्हणतात. त्यामुळं दुःख आणि दुःखाच्या पोटीं उपरति होते. ज्याची आत्मोन्नति व्हायाची असेल त्याच्या बाबतींत तें खरं असेल कदाचित; पण अधःपतित माणसाला हवं असलेलं मिळतं असं दिसतं.तसं न होईल तर मग त्याचा अधिकाधिक अधःपात कसा व्हायाचा ? रावसाहेबांच्या बाबतींत असंच झालं. आमच्या ऑफीसमध्यें सौ. द्रवीड या नांवाची बाई पोस्ट खात्यांतून आली होती. बाई तरुण होती. तिला मोकळेपणें बोलायलाही हवं असे पुरुष मंडळींशीं; त्यामुळं रावसाहेबांच्या मनांत भरली ती. या ना त्या निमित्तानं दिवसाकांठीं दहा पांचवेळां तरी त्यांनीं तिला आपल्या टेबलाजवळ बोलावून घ्यावं व कांहीं तरी इकडचं तिकडचं बोलत बसावं तिच्याशीं. पण त्यांचं टेबल सार्वजनिक ठिकाणीं असल्यामुळं त्यांना तिच्याशीं तिथं अगदीं मोकळेपणें बोलता येत नसे. या अडचणींतून सुटका करून घेण्यासाठीं एका लहान खोलींत त्यांनीं आपली बसण्याची व्यवस्था केली. आणि तिथें एके दिवशीं संध्याकाळीं पक्षकार – वकीलांची वर्दळ थांबली असं पाहून त्यांनीं तिला बोलावून घेतलं.

‘कां हो, पुरुष कारकुनाप्रमाणं तुम्हो कोणाजवळ चहापाणी, पान–सुपारी मागता कधीं?’ त्यांच्या टेबलाशीं ती येतांच त्यांनीं तिला आपल्या अधिकाराच्या तोऱ्यांत विचारलं.

‘नाहीं बुवा. मी कधींच कोणाजवळ कांहीं मागत नाहीं.’

‘मग हा अर्ज कसा आला आहे तुमच्या विरुद्ध?’

‘कोणाचा आहे बघू.’

'निनावी अर्ज बघून काय कळणार तुम्हांला कोणाचा आहे तो तें? पण ज्या कोणाजवळ तुम्ही कांहीं मागितलं असेल त्यानंच तो केला असला पाहिजे हें उघड आहे.'

'मला दाखवता कां तो जरा? अक्षरावरून ओळखेल कदाचित मला कोणी केला असेल तो तें. मला वाटतं बहुत करून सोमण वकीलांच्या कारकुनाचा असावा तो.' सांकेतिक दृष्टी करून ती म्हणाली.' काल तो मला म्हणत होता कागद दाखवा म्हणून. नि मी त्या वेळीं कामांत असल्यामुळं त्याला वेळ नाहीं मला आतां. उद्या या' म्हटलं होतं. त्यावरून त्याची माझी थोडी बोलाचाली झाली होती खरी. त्याचा कुसूर काढण्यासाठीं त्यानं अर्ज करणं शक्य आहे.'

'तोच असल्यास आपण बोलावून घेऊ त्याला.'

'पाठवता कां मग त्याला बोलावणं? मीच विचारतें आपल्या समक्ष त्याला कीं, 'बाबा, मी तुला केव्हां काय मागितलं म्हणून? हें लोक कोणाबद्दलही कांहींहीं उठवतात म्हणजे काय?' पण तो जर असं कांहीं म्हणाला असेल तर तें खरं नव्हे. अगदीं खरं नाहीं तें.'

'तें तर मलाही वाटतंय् हो. नव्हे तुमच्याविषयीं माझी खात्री आहे तशी पण'—

'आपण कशाला संशयांत पडता? मी त्याला तुमच्यासमक्ष आणून हजेरी घेतें चांगली.'

'तसं नको. त्यानं तो डिवचला जाईल अन् उगीच दात धरील तुमच्यावर'

'माझ्यावर दात धरून तो काय करणार आहे माझं? मला त्याची थोडीच नोकरी करायची आहे?'

'तें खरं हो. पण साहेबांना भेटून कांहींतरी वेडंवाकडं सांगायचा तो. त्यापेक्षा मीच त्याची चांगली हजेरी घेतो तुमच्या समक्ष.'

'चालेल. मग केव्हां बोलावून घेता ?'

'इथं नको. कारण असं जें मुळांतच नाहीं त्याचा उगीचच चार लोकांना संशय यायाचा. त्याच्या तुमच्यातल्या बोलाचालीनं. त्यापेक्षां उद्यां सकाळीं त्याला घरींच बोलावतों. तुम्हीं त्यावेळीं या.'

'ठीक आहे. मग केव्हां येऊ मी?'

'या अशा सकाळीं आठ साडे आठचे सुमाराला.'

आणि ठरल्याप्रमाणं सौ. द्रवीड ज्यावेळीं रावसाहेबांच्याकडं आल्या, त्यावेळीं त्यांच्या पुढच्या खोलींत एक चौदा पंधरा वर्षांची मुलगी अभ्यास करीत बसली आणि तिच्या मागच्या रावसाहेबांच्या बैठकीच्या खोलींत त्यांचा आठ दहा वर्षांचा मुलगा आपल्या भोंवती वह्या पुस्तकांचा पसारा घालून अभ्यासाशिवाय इतर उद्योग करीत असता ते त्याला 'काटर्या, मी केव्हांचा सांगतोय् ना तुला जा इथून म्हणून? उठतोस कीं नाहीं? नाहींतर देतों भिरकावून सारीं पुस्तकं खिडकींतून खालीं!' असं म्हणत असतां ते त्याच्या दंडाला धरून बाहेर काढीत असलेले असं तिला दिसून आलं. तो सारा प्रकार पाहून ते जरी तिला 'या ना आंत' असं म्हणाले तरी त्या खोलीत आपण प्रवेश करावा कीं नाहीं असा क्षणभर तिला प्रश्न पडला. पण तितक्यांत त्या मुलानं घाईनं सारं आवरून तो खोलीबाहेर पडला आणि 'उगीच काटर्यानं पसारा करून ठेवला होता इथं, म्हणून बाहेर बसायला सांगितलं त्याला' असं म्हणून पुन्हा त्यांनीं तिला आंत येऊन बसायला सांगितलं. रावसाहेबांची बैठकीची खोली उत्तमोत्तम फर्निचरनं नेहमींच सुसज्जित असे. पण आज ती विशेष रीतीनं शृंगारली होती. मग द्रविडांचं आगमन होणार होतं म्हणून कीं काय कोण जाणें?

सौ. द्रवीड खुर्चीवर जाऊन बसल्यानंतर आणखी कुणीतरी येणार आहे नि त्याची आपण वाट बघत आहोत असा रावसाहेबांनीं प्रथम कांहीं वेळ अभिनय केला आणि नंतर एकदम उठून त्यांनीं दार लोटून घेतलं. द्रवीड त्या घटनेनं भीतिग्रस्त मनःस्थितींत असतांच त्यांनीं तिच्या खांद्यावर हात टाकला. तसं चमकून चटकन ती उभी राहिली.

'बसा बसा. एवढं काय झालंय त्यांत?' हंसत हंसत ते म्हणाले, त्यावेळीं त्यांची मादक दृष्टि तिच्या चर्येवर खिळून राहिली होती.

'काय चालवलंय तुम्ही हें ? मी विवाहित आहे नि घरीं मला कोणी-तरी विचारणारं आहे' ती म्हणाली.

'विचारणाऱ्यानं विचारलं तरी आपण सगळं सांगितलंच पाहिजे असं थोडंच आहे? पण मी म्हणतों त्यांना हें कळेल तेव्हां ना ? इथं कोण सांगायला बसलंय त्यांना?' निर्लज्यपणें ते म्हणाले.

'असं बोलायला कांहीं वाटतं कां हो तुम्हांला?' आपली तीक्ष्ण दृष्टि त्यांच्यावर रोखून तिनें त्यांना विचारलं.

'कांहीं म्हणजे काय लाजच ना?' हंसत हंसत ते बोलत होते 'ती केव्हांच सोडलीय् मी तुमच्यासाठीं. तशीच तुम्हीही सोडा ना. अन् मी म्हणतों तुमच्या मिस्टरजवळ तरी ती सोडलीच आहे ना? मग इथंही ती सोडायला काय हरकत आहे?'

'हं दूर व्हा. खबरदार पुन्हां अंगाला हात लावाल तर!' ते अंग-चटीला जाण्यासाठीं तिच्याशीं लगट करीत असतां सौ. द्रवीड त्यांना दरडावून म्हणाली आणि संतापांतच चटकन दार उघडून चपळतेनं ती तिथून बाहेर पडली.

ती त्यांच्या तावडीतून निसटली खरी; पण तिच्या क्षणीक सहवासानं त्यांच्यामध्यें उन्मादाचा संचार झाला होता आणि त्याला कोणीतरी बळी पडल्यावाचून तो शमणं अशक्य होतं. त्यामुळं त्यांनीं शेजारच्या खोलींत अभ्यास करीत बसलेल्या त्या मुलीलाच आंत ओढलं आणि दाराला आंतून कडी लावून घेतली.

त्यांच्या त्या मुलाला हा काय प्रकार चाललाय् याची कांहींच कल्पना नसल्यामुळं तो त्या दाराच्या फटींतून आंत काय चाललंय तें बघत होता. इतक्यांत रावसाहेबांची पत्नी बाहेरून आली, तिला क्षणार्धांत सारी कल्पना आली. तिनं त्याच्या पाठींत एक चांगलाच धपाटा धातला आणि त्याच-बरोबर दारावर थाप मारली.

'कोण आहे?' ते आंतून ओरडले.

'दार उघडा आधीं. मग सांगते कोण आहे ते!' त्यांची पत्नी बाहेरून ओरडून म्हणाली आणि त्याचवेळीं दार ठोठावण्याचा तिचा सपाटा चाल-लाच होता.

'उघडीत नाहीं दार'.

'आधीं दार उघडा म्हणते ना. नाहींतर ओरडून सारे शेजारी पाजारी जमा करीन. कध्धी सोडायची नाही. म्हणून म्हणते अधिक शोभा व्हायाला नको असेल तर दार उघडा.'

इतकें झाल्यानंतर त्यांना दार उघडणं भागच पडलं. तें उघडलं जातांच झाल्याप्रकारानं शरमून गेलेली ती पोर अधोवदन स्थितींत बाहेर पडून तिथून निघून गेली.

'पोराला बाहेर बसवून काय हा प्रकार चालवला होता तुम्ही निर्लज्जासारखा? तें पोर फटींतून बघत होत. कसा आदर वाटायचा त्याला वडिलाविषयीं तुमचीं अशीं थेरं बघितल्यानंतर? अन् ती परक्याची पोर. विश्वासानं म्हणून शिकायला ठेवली इथं नि तिच्याशीच चावटपणा चालवला होता तुम्ही? लाज वाटते कां कांहीं? मनाची नाहीं निदान जनाची तरी ठेवावी कीं नाही? शेण घालतील ना लोक त्यांना हें कळलं तर? अन् या प्रकारानं कशी आग लागेल नि तुम्ही किती होरपळले जाल कल्पना आहे तुम्हांला? फौजदार आहेत म्हटलं तिचे वडील! हातकड्या पडायला वेळ लागायचा नाहीं!'

'अग जाग! मीही कांहीं लुंगासुंगा नाहीं समजलीस ना? असे फौजदार जमादार नांगी टाकलेल्या विंचवासारखे खालीं माना घालून हिंडत असतात सेशन कोर्टांत! समजलीस ना?' उसनं अवसान आणून रावसाहेब म्हणाले.

'कळला तुमचा पुरषार्थ!' इतकं बोलून त्यांची पत्नी आंत गेली आणि ते बाहेरच्या खोलींत आले.

त्यांच्या या साऱ्या उपद्व्यापांत मला बोलावल्याचं ते पार विसरूनच गेले होते. पण मला समोर पाहातांच कांहींतरी बोलायला हवं म्हणूनच त्यांनीं मला प्रश्न केला 'काय हो या बाबतींत तुमचं काम म्हणणं आहे?'

'कुठली बाब तें कळल्याशिवाय मी काय बोलू?'

'मी म्हणतोंय् ना या बाबतींत म्हणून?' दरडावून ते पुन्हां म्हणाले.

त्यांचं बोलणं, वागणं त्यावेळची चर्या वगैरे वगैरे सारे प्रकार त्यांच्या मनावरचा ताबा सुटल्याचं स्पष्टपणें दर्शवित होते. त्यांच्या डोक्यांत तोच विषय घोळत असल्यामुळं त्यांनीं प्रश्न केला ' कां हो समाजांत ही जी अशांतता माजते ती केवळ कनक आणि कांता यामुळंच! खरं कीं नाहीं?'

'त्यावर मी मानेनं होकार दिला.

' मग हीं दोन्हीही कारणं नाहींशी झालीं—संपत्तीची समान वाटणी करून किंवा अशाच कांहींतरी साधनानं तिच्याबद्दलची अभिलाषवृत्ति कमी करून टाकली; नि हें शीलाचं नसतं अवडंबर माजवलं आहे समाजानं ती भानगडच काढून टाकली; तर मग समाजांत शांतता नांदायला काय हरकत आहे? समाज मग गुण्यागोविंदानं राहूं लागेल. वैरं थांबतील. परस्परांत बंधुभाव नांदेल. मग खून होणार नाहींत. खटले होणार नाहींत. सरकारला संरक्षणासाठीं पोलीस ठेवावे लागणार नाहींत. आणि तो पैसा सरकारला समाजोन्नतीच्या कारणीं लावता आल्यामुळं समाजाची भरभराट झपाटच्यानं होईल! खरं कीं नाहीं?'

' आतां काय उत्तर द्यायाचं रावसाहेब याचं? कारण असं पहा—हीं कारणं नसतांना सुद्धां एकाबद्दल दुसऱ्याचं मत बरं असतच असं नव्हे. उदाहरणार्थ—तुमचं माझ्याबद्दल कुठं चांगलं मत आहे? बरं त्याला कारण म्हणावं तर – या दोहोपैकीं कुठलंच नाहीं, हें आपणही कबूल कराल. तेव्हां माणसामाणसांत बरा किंवा वाईट भाव नांदणं हें तुम्ही सांगितलेल्या दोन कारणांत नसून माणसाच्या मनोवृत्तींत आहे हें उघड आहे. बरं दुसरं असं कीं, घटकाभर तुम्ही म्हणता त्याप्रमाणं झालं—संपत्तीची अभिलाषा आणि शीलाची भानगड निघून गेली तर मग आणखी उन्नति आणि भर–भराट ती काय व्हायाची राहिली समाजाची? पण मुळांतच हें कठीण आहे!'

' कां? कठीण काय आहे त्यांत?'

' आज हजारो वर्षांपासून याच्या मुळाशीं ज्या स्वामित्वाच्या भावना-निगडीत झाल्या आहेत त्या नाहींशा कशा व्हायाच्या, अशा एकट्या दुकट्याच्या विचारानं? बरं त्या एकट्या दुकट्याची देखील विचारापलीकडं मजल जातच नाहीं. अशी कृति करायची कोणाची तयारी आहे? मला पैसा नको म्हणणारे आणि माझ्या बायका मुली सार्वजनिक आहेत कोणीही हवा तसा त्यांचा उपयोग करावा असं सांगणारे कितीजण निघतील ? या बाबतींत विशेषतः दुसऱ्यानं हें करावं नि मी त्याचा फायदा घ्यावा याच मनोवृत्तीचे सारेजण आढळतात! मग तुम्ही म्हणतां त्याप्रमाणं व्हावं कसं?'

'पण मी म्हणतों, साऱ्यांनींच अशा उदार मनोवृत्तीचं असायला काय हरकत आहे? आपल्या मुलानं कोणाशीं मैत्री करावी; आणि त्याच्यासाठीं किती झीज सोसावी, याचा विचार करतों कां आपण कधीं? त्याचप्रमाणं एकादीच्या नवऱ्यानं अशाच दुसऱ्या कोणाच्या बायकोच्या उपयोगी पडलं तर त्यांत समाजाचं काय नुकसानं आहे? नि त्या व्यक्तीचं तरी काय नुकसान आहे प्रत्यक्ष तसं?'

'एवढ्यावरच भागत नाहीं रावसाहेब तें. त्यांच्यापासून होणाऱ्या संततीला जन्मभर पोसण्याचा भार पडतो शिरावर! त्याचं काय?'

'त्याचं काय असायचंय? आपल्यावर जसा दुसऱ्या कोणाच्या तरी मुलाचा भार पडेल तसाच तो दुसऱ्या कोणावर तरी आपल्या प्रजेचा पडेल !'

'तिथं मायेचं आकर्षण पाहिजे. नाहींतर उगीच अशा प्रजेची, पालन पोषणाची, कपडचालत्याची, शिक्षणाची जन्माची जबाबदारी कोण घेईल सुखासुखी?'

'पण ममत्व आलं कीं बंधन आलंच. आपल्या या योजनेमुळं ममत्व नाहीं त्यामुळं बंधनही नाहीं. माणसानं आपलीं वैयक्तिक सुखं सांभाळून जितकं या प्रजेच्या उपयोगी पडता येईल तितका तो उपयोगी पडला कीं संपली त्याची जबाबदारी!'

'बेजबाबदार माणसं सध्याही असंच करतात कीं! त्यांच्यासाठीं सारी समाजरचनाच बदलायला पाहिजे असं नाहीं.' मी हंसत हंसत म्हणालों.

आणि आमचीं हीं बोलणीं चालली असतांच तिथं वाकडयाचं आगमन झालं.

रावसाहेबांनीं त्यांना पाहिलं मात्र त्याबरोबर लगेच त्यांचा नूर पालटला!

'या. तुमचीच वाट पहात होतो एवढा वेळ!' त्यांची ही सलामी फारशी कांहीं शुभदायक वाटली नाहीं मला. वाटलं बहुधा हे आतां वाकडयांची चांगलीच हजेरी घेणार. तेव्हां त्या प्रसंगीं आपण इथं नसणं

बरं. कारण सम व्यवसायी माणसा देखत झालेला अपमान माणसाला फार जाणवतो. म्हणून मी जाण्यासाठी उठलों. तें पाहून ते म्हणाले ' बसा हो. यांची हजरी तुमच्या देखतच घेतों चांगली; म्हणजें कळेल काय लायकीचे गृहस्थ आहेत हे, तें! काय, महाराज, कोणाकोणाचीं दारं पुजून आलात?'

' रावसाहेब, खरं सांगतों. चहा घेतला नि बाहेर पडलों तें थेट तुमच्या कडच आलों बघा.'

' तुमच्या खरं सांगण्यावर माझा चांगला विश्वास आहे हो! बोला खुशाल खोटं बोला. अरे, कुठं पापं फेडाल हीं? पोराची शपथ घेऊन सांगता कां त्या आण्याकडं आतां गेलों नव्हतों म्हणून? निमकहराम!'

' खरंच रावसाहेब, खोटं वाटेल तुम्हांला – पण खरं खरं सांगतों, आतांशी मी त्यांच्याकडं जात नसतों.'

' मग त्या हलकटाला इथं मी जें जें बोलतों तें तें इत्थंभूत कसं कळतं? कोणीतरी सांगितल्याशिवाय कां? '

' तें मी काय सांगू?'

' मग कोण तुमचा बाप सांगायला येणार आहे इथं?'

' ते कशाला येतील बिचारे! मरून स्वर्गी सोन्याचे झाले ते!'

' ते झाले असतील सोन्याचे! पण तुमच्यासारख्या दगडाला ठेवलाय ना त्यांनीं मागं आमचीं टाळकी फोडायला! कशाला जन्माला आलात तुम्ही?'

' साहेब, हे मला कसं विचारता ? जन्माला येण्यांत माझा काय दोष बरं?'

' एवढं कळतंय तर म्हणायचं तुम्हांला?'

' तर हो. मुलं बाळं आहेत ना मला?'

' मुलं काय, कुत्र्याला सुद्धां होतात! त्याला अंगीं शहाणपणच लागतं असं नाहीं!'

' विनाकारण साप साप म्हणून भुई धोपटता रावसाहेब तुम्ही!'

' मला काय वेड लागलंय काय तसं करायला? आपण हलकटपणा करायचा नि दुसरे बोलले त्याबद्दल म्हणजे वर गहजब चालवलाय म्हणायचं'

' कोण हलकट?'

‘ तुम्ही हलकट! तुमचा तो आण्या हलकट! आतां हें त्याला जाऊन सांगा!’

‘ सांगतों! (जणू काय त्यांनीं ती आज्ञा केली आहे आणि आपण ती शिरसावद्य मानतों अशा आविर्भावांत मोठ्या आवाजांत वाकडे म्हणाले.

‘ आमचं वाटोळं करा!’ म्हणा–‘ करतों! ’

‘ त्यावर छे! छे!’ म्हणत तोंडांत मारून घेऊन नि जिभेला चिमटा घेत असतां ‘ असं कसं होईल रावसाहेब?’ वाकडे म्हणाले.

‘ मग खुशाल सांगतों म्हणता! या लावालावीबद्दल कांहीं वाटत नाहीं तुम्हांला?’

‘ पण सांगा म्हटलेलं सांगायचं नाहीं. नको सांगू म्हटलेलं सांगायचं हें काय कळतंय् बरं मला?’

‘ अरेरे! किती साळसूद तुम्ही? आतां किती दिवस उरले आहेत तुमचे?’

‘ संपतंच आहे साहेब लवकरच आतां! ’

‘ जा एकदाचे! उपकार होतील कोर्टावर! ’

‘ पण साहेब, मी असं केलंय तरी काय तुमचं?’

‘ तर मग त्या हलकटाकडं जाऊन माझ्या नांवानं बोंब कुणी मारली?’

‘ कमाल झाली! मी कशाला बोंब मारायला जाऊ तुमच्या नांवानं त्यांच्या तिथं?’

‘ शद्बाचा अर्थहीं आतां कळेनासा झाला कां तुम्हांला ? बोंब म्हणजे प्रत्यक्ष बोंबलायचं नाहीं. त्याच्यासाठीं आहेत देवाच्या दयेनं पोरं मला! मो बोललों तें सारं सांगितलंत म्हणतों मी तुम्ही तिकडं.’

‘ छे, छे. असं कसं करीन मी?’

‘ मग कसं कराल ? तुम्हांला कांहीं आज ओळखीत नाहीं मी. समजलात ना ?’

‘ रावसाहेब, माझ्याविषयीं भलता ग्रह करून घेतलात तुम्ही! अहो, मी असं कसं सांगेन त्यांना? माझे असे कोण लागून गेले आहेत ते?’

‘ मग कशाला जाता तडफडायला तिकडं? काय हो, आणखी काय काय सांगतो तो लोकांजवळ माझ्याविषयीं?’

'परवा नाझर कचेरींतला जुना माल काढून टाकतांना बराच माल मिळाला म्हणे तुम्हांला'

'कोण म्हणतो साला असं? साफ खोटं आहे तें. अन् मिळाला असेल म्हणतो मी. पण त्यांत तुमच्या बापाचं काय गेलं?'

'तसंच ते परवा हजारा हजाराचे पांच शेअर्स एकदम कसे घेतले हो तुम्ही?'

'चोरून आणले पैसे! पण तुम्हांला या उठाठेवी सांगितल्या आहेत कुणी?'

'असं ते म्हणत होते हो. नाहींतर मला काय करायचंय तुम्ही काय करतां त्याच्याशीं?'

'तसे तुम्ही साळसूद आहांत हो! फक्त इकडचं तिकडे सांगून आगलावे-पणा करतां इतकंच!'

'मी काय आग लावली बरं रावसाहेब?'

'तर मग सांगा बरं, मी परवा सहज पोटांतलं म्हणून त्या शेअर्सबद्दल बोलून गेलों तुमच्याजवळ, ते त्याला कसं हो कळलं?'

'तें मी काय सांगू? त्यांना काय सांगणारे नसतील वाटतं आमच्या-शिवाय दुसरे कुणी? अहो ते तर म्हणत होते'–(थोडं थांबून नंतर)

'पण ते म्हणतात अशा पुष्कळच भानगडी तुम्ही केल्या आहेत म्हणून!' वाकडयांनी क्षणापूर्वीच अर्धवट वाक्य पुरं केलं.

'भानगडीच जर केल्या असल्या तर त्या मी नव्हे; त्यांनीं! पुराव्यानं सिद्ध करून देईन मी, तशी वेळच आली तर! तें राहिलंच बाजूला; नि उलट म्हणे मी भानगडी केल्या ! संबंध काय माझा त्यांच्या भानगडीशी ?'

'मला काय ठाऊक?'

'तुम्हांला नव्हतं विचारलं मी. हलकट!'

'कोण मी कीं ते ?'

'तुम्ही दोघंही.'

'मी काय केलं बुवा?'

'आगलावेपणा! पाजी! हरामखोर! माझ्याबद्दल असं बोंबलत सुट-लात काय गांवांत? पण म्हणावं असं मागं शेण कां खातोस ?'

'हो. पुढं खा ना.'

'काय पुढं खा ना ?'

'आपण म्हणता तें.'

'काय म्हणतोय् मी?'

'आपल्याला माहीत साहेब'

'नॉनसेन्स !'

'आहेतच ते तसे'

'तो नव्हे तुम्ही.'

'बरं मी. मग तर झालं?'

'हलकट!'

'असणारच'

'असणारच काय असणारच?'

'मग नसतीलही तसे ते.'

'अहो, आहे तसा तो. सांगा त्याला तसं.'

'सांगतों.'

'काय म्हणाल ?'

'तुम्ही हलकट आहांत म्हणून'

'मी नव्हे तो'

'नाहीं साहेब. आपल्याला कसं म्हणेन तसं ?'

'म्हणाल. तुमचा कांहीं नियम नाहीं.'

'खरं आहे साहेब.'

'अहो, खरं काय आहे?'

'आपल्या हुकुमाच्या बाहेर कसं जायाचं?'

'म्हणून काय हलकट म्हणणार काय तुम्ही मला?'

'छे! छे! भलतंच!'

'अहो, मग आपण कशाला होकार, कशाला नकार देतो हें तरी कळतंय् कां तुम्हांला? अगदीच दगड आहात!'

'होयसाहेब.'

'स्टुपिड! गोअवे. जा म्हटलं ना तुम्हांला?'

‘ जातो साहेब.’

‘ मेला तुमचा साहेब! ‘ जातो साहेब येतों साहेब. करतों साहेब. मरतों साहेब! ’या पलीकडे कळतय काय तुम्हांला? चालतें व्हा माझ्या दृष्टी-समोरून. येता कशाला तडफडायला इथं? जाव. चले जाव! गेला नाहींत तर धक्के देऊन घालवून द्यावं लागेल तुम्हांला.’

‘ धक्के देता कशाला साहेब ? हा पहा चाललों मी.’ असं म्हणत असता वाकडे जाण्यासाठीं उठले.

‘ जा. काळं करा एकदाचं! ’ ते जिना उतरत असता रावसाहेब म्हणाले.

आणि त्यानंतर थोड्याच वेळांत मीही तिथून निघालों.

० ० ० ०

बिचारे दीन दुबळे जीव दुष्टाकडून मुकाटपणें छळ सोशीत असतात. ‘ आपल्यावरचे अन्याय कधीं काळीं दूर होतील’ याचाही त्यांना भरंवसा नसतो. तसंच ती अन्यायी व्यक्ती ही आपल्या अन्यायी वर्तनाचा जाब विचारणारा भेटणं शक्य नाहीं अशा समजुतीवर बेफिकीर असते. पण त्या दुबळयांच्या तळतळाटांतून निर्माण होणारी स्फोटकता कुठंतरी कणाकणानं साचत असते. आणि मग एकेदिवशीं अकल्पितपणें त्याचा हिरोशिमा होतो. आणखी मग दुष्ट त्या घटनेनं हतबद्ध होऊन जातात नि ते दीनदुबळे जीव आश्चर्यानं थक्क होऊन त्यांना ईश्वराबद्दल कृतज्ञता वाटू लागते. जरा-संदाच्या बंदिवासांत पडलेल्या अभागी स्त्रियांना कल्पना तरी असेल कां कीं कुणीतरी त्याचा वध करून आपली सुटका करील म्हणून ?तसंच आमच्या रावसाहेबांकडं दृष्टि उघडून पाहाणारा कोणी भेटेल अशी आम्हांला कल्पना तरी होती कां? पण तो प्रकार घडला एके दिवशीं प्रत्यक्षांत! जज्ज साहेबांनीं अचानकपणें येऊन त्यांच्या ऑफीसला भेट आणि त्यांच्या चालू वैभवाला धक्का दिला! तो सारा प्रकार पूर्वनियोजितच होता. पण आण्णासाहेब पाठीशी घालतात म्हणून साहेबांनीं त्याना त्याचा सुगावा लागून न देण्याची खबरदारी घेतली होती. तरी त्यांना त्याची कुणकुण लागली होती. पण त्याचें रावसाहेबांबद्दलचं मन आतांशी कलुषित झाल्या-मुळं आपल्या माणसाबद्दल जी दक्षता घ्यायाची ती त्यांनीं घेतली नाहीं नि ‘ मला काय त्याचं?’ अशा विचारानं त्या बाबतींत ते बेफिकीर राहिले.

दुपारीं साडेअकराबाराचा वेळ. साहेबांच्या सह्या वगैरे घेऊन येऊन रावसाहेब नुकतेच कुठं जों स्थानापन्न होतात तों आण्णासाहेबांसहीत साहेबच तिथं प्रत्यक्ष हजर !

त्यांना समोर असे अकल्पित रीतीनं आलेले पाहून रावसाहेबांनीं गडबडीनंच त्यांना उत्थापन देऊन अभिवादन केलं.

'काय चाललंय हो?' साहेबांचा पहिला प्रश्न.

'आतांच साहेबांच्या सह्या घेऊन आलो नि त्या प्रकरणांची विल्हेवाट लावली'

'हीं कपाटं कसली आहेत इथं इतकीं?'

'या कपाटांत कोर्टाची स्टेशनरी आहे. त्या पलीकडच्यामध्यें अमकं आहे. त्यांत तमकं आहे' वगैरे वगैरे रावसाहेब प्रत्येक कपाटाकडे हात दाखवून माहिती देत होते. इतक्यांत 'अन् या तुमच्या मागच्या कपाटांत काय आहे?' साहेबांनीं विचारलं.

'जुन्या फायली बियली आहेत' हजरजबाबीपणानं रावसाहेब उत्तरले.

'अहो मग त्या तिकडं रेकॉर्डांत ठेवायच्या नाहीं तर दुसरीकडं कुठंतरी ठेवायच्या ? इथं आपल्याला जरूर तेंच सामान ठेवावं. किल्या तुमच्याजवळ आहेत ना त्यांच्या ?'

'हो.'

'उघडा पाहू तीं. बघू या तरी एकदा.'

साहेबांच्या हुकमावरून त्यांनीं बाकीचीं कपाटं त्यांना उघडून दाखविलीं; आणि तीं पाहून झाल्यानंतर त्यांनीं त्यांना परत कुलपं लावून टाकायलाही सांगितलीं. आतां राहिलं एकच त्यांच्या पाठीमागचं कपाट. शेवटीं तें उघडायला सांगितलं त्यांनीं. पण तें उघडायला ते अनुत्सुक दिसले.

'तें उघडा ना एकदां' साहेब पुन्हा म्हणाले.

'विशेष नाहीं कांहीं त्यांत. जुनं सामान आहे थोडं.'

'अहो, तुमचे कागदपत्र आहेत ना म्हणालात मघाशीं तुम्ही?'

'नाहीं कागदपत्र त्या कपाटांत आहेत. यांत किरकोळ सामान आहे.'

' पण तेंच काय आहे तें बघू ना एकदा.' आणि रावसाहेब तें उघडायला जसं कां कू करूं लागले तसं ' कुठंय किल्ली त्याची?' त्यांनीं त्यांना विचारलं. रावसाहेब किल्ली शोधण्यासाठीं चाळवाचाळव करू लागले तसं ' सांपडते कीं नाहीं? नाहींतर याकूब फोड कुलूप तें. बघू इकडं घ्या बघू, तुमच्या त्या किल्ल्या' असं म्हणून साहेबांनीं त्यांच्याजवळ चाव्यांची मागणी केली. त्यामुळं नाईलाज होऊन कुलूप उघडणं भाग पडलं त्यांना त्या कपाटाचं.

त्यांनीं कुलूप काढतांच साहेबांनीं पुढं होऊन कपाट उघडलं आणि त्यांतलं विविध प्रकारचं सामान पाहून त्यांनीं त्यांना विचारलं ' कुठलं हो हें सामान इतकं?'

' खाजगी आहे तें माझं.' अडखळत ते म्हणाले.

' पण मग तें इथं कां? घर आहे ना तुम्हांला? अन् तें इथं ठेवलंत तर त्याबद्दल परवानगी घेतली होतीत तुमच्या साहेबांची?'

' नाहीं.'

' सरकारी जागेचा हा गैरवापर केलात तुम्ही. शिक्षा कां करूं नये तुम्हांला? बरं तुम्ही कुठून आणलं हें इतकं सामान? पावत्या बिवत्या आहेत कां याच्या खरेदीच्या ?'

' नाहींत.'

कशा असतील ? बरं किंमती तरी काय आहेत यांच्या? बाकी तुम्हांला त्या कुठल्या माहीत असणार म्हणा ! खरं कीं नय् ? ( पट्टेवाल्याला) जारे बाहेरून चार दोन माणसं बोलावून आण आपण किंमती तरी विचारू यांच्या. ( कपाटांतला कॅमेरा हातांत घेऊन) फोटोग्राफरला लुटलेला दिसतोय. कां हो, पण हा कॅमेरा कशाला तुम्हांला? कां इथून निघाल्यानंतर फोटोग्राफीचा धंदा करायचा विचार आहे? कां फुकटांत सांपडला-लाटा! याप्रमाणं तो लाटलात? मला तर तसंच दिसतंय्.'

इतक्यांत पट्टेवाला तीन चार मंडळींना घेऊन आला.

' मंडळी, या सामानांच्या किंमतींचा अजमास घ्या बरं. याकूब ठेव तें सामान त्यांच्यापुढं. मिस्टर सी. ओ. सी. ते सांगतील त्याप्रमाणं घ्या बरं किंमती टिपून.बघू तरी यांना एकंदर किती किंमतीच्या लोकांकडून प्रेझेंटस

मिळाल्यात तें. अन् या काय उदबत्त्या? कशाला हो या इतक्या? तसंच हीं अत्तरं! हीं सेंटस्! लव्हेंडर्स! सारी पर्फ्युमरीच आणलीच कीं कोर्टांत तुम्हीं? रंगेल आहांत बुवा! ' इतक्यांत एका प्रतिष्ठित पंचानं कॅमेऱ्याची किंमत सांगतां येत नाहीं म्हणतांच ' काय हो, काय त्याची किंमत आहे? (आणि रावसाहेब गप्प बसलेले पाहून ) बाकी हें सारं तुम्हांला लाटायला सांपडलंय! कशाला चौकशी कराल तुम्ही किंमतीची? खरं कीं नय्? बरं तेवढ्याची राहू द्या. बाकीच्यांची किती होतय रक्कम्?' साहेबांनीं आण्णासाहेबांना विचारलं.

' साडेचारशेच्या पुढं जातेय थोडी.' आण्णासाहेब खालच्या आवाजांत म्हणाले.

' मग कांहीं फारशी नाहीं (रावसाहेबांस) खरं कीं नय् हो? मंडळी आतां जायाला हरकत नाहीं तुम्हांला.' (आणि ते लोक गेल्यानंतर) ' हं. काय मिस्टर, हें सारं सामान तुमच्या मालकीचं आहे म्हणता तर?'

' होय साहेब.

' काय हो, तुम्हांला पगार किती आहे?'

' एकशे सत्तावन्न.'

' जी. पी. फंड किती भरता?'

' पंचवीस रुपये.'

' म्हणजे हे पंचवीस रुपये गेले. उरले एकश बत्तीस. खरं कीं नय?'

' होय.

' ठीक. आतां खर्चाचं बघू आपण. घरीं माणसं किती आहेत तुमच्या?'

' पांच.'

' अस्सं. भाडं किती देता तुम्ही?'

' तीस '

' दुधाचं बिल किती येतं?'

' साधारण सांगतों. पंचवीस.'

' हो. साधारणच सांगा ना. किराणा माल?'

' चाळीस.'

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ३००५३
विभाग
क्रमांक २२२३
नों. दि.

' धान्य ? '

' तीस '

' मुलांचीं फी पुस्तकं ?'

' दहा '

' कापड वगैरे?'

' वीस.'

' विसांत भागतं? तुमचे इतके भारी भारी कपडे! शिवाय त्यांचे डबल सेटस् असतां इतकं थोडं कसं येईल कपडयाचं बिल? निदान पांचशे रुपये तरी खर्च असलाच पाहिजे वर्षाचा. म्हणजे ते झाले साधारण पंचेचाळीस दरमहाचे. आतां नाटक सिनेमा. विडी सिगारेट. पानपट्टी वगैरे.'

' कांहीं नाहीं.'

' असं कसं होईल? एवढया वैभवाला तें पाहिजेच. मग दरमहा किती? दहा? दहा धरायला कांहीं हरकत दिसत नाहीं ? बरं आतां डॉक्टर? औषधाचं बिल?'

' दहा.'

' जळण लांकूड फांटा?'

' वीस '

' ठीक, आतां आपण बेरीज करूं आं साऱ्यांची. ( बेरीज करून)एकूण फक्त दोनशे वीस रुपये होतात. त्यांतून तुमचा १३२ पगार वजा घातला म्हणजे उरतात अठ्ठ्यांशी रुपये. आतां प्रश्न असा आहे कीं, हे अठ्ठ्यांशी रुपये दरमहा कुठून येतात? कर्ज आहे कां कांहीं तुम्हाला?'

' नाहीं '

' बँकेंत कांहीं रक्कम? शेअर सर्टिफिकेटस्?'

' कांहीं नाहीं.'

' अहो, असलंच पाहिजे कांहींतरी. अन तुमच्या नांवावर नसेल तर बायकोच्या नांवावर असेल.'

' नाहीं. कोणाच्याच नांवावर कांहींही नाहीं! '

' बरं नसूद्या. पण काय हो, हे प्रपंचाला कमी येणारे पैसे बाहेरचे बाहेर वसूल करीत असला पाहिजेत तुम्ही हें उघड आहे. तसचं हें सामान

कुणीकुणी दिलं? पक्षकारांच्या कामांत तुम्ही त्यांच्या उपयोगी पडलात म्हणून हें तुम्हांला मिळालं? कीं तुमच्या अलौकिक वृत्तीवर खूष होऊन कोणी बाहेरच्या माणसानं दिलं तुम्हांला ?'

' तसं सांगतां यायचं नाहीं साहेब.'

' बरोबर आहे. कसं सांगतां येईल? तितकं कां तें सोपं आहे? बरं तुम्हांला सांगतां येत नसलं तर मी सांगतों. ही तुम्ही लाच म्हणून घेतली आहे. कोणाकोणाची कामं खोटीं केलींत तुम्ही? '

' नाहीं साहेब, खोटीं कामं कशी करीन मी?'

' अरे! अरे! फारच साळसूद आहांत कीं हो तर मग? पण मग काय हो, त्या मिसेस् द्रविडांच्या अंगावर हात कसा काय टाकलात तुम्ही?'

तें ऐकताच रावसाहेबांचा चेहरा गोरामोरा झाला. पण उसनं अवसान आणून ते म्हणाले ' नाहीं साहेब. निव्वळ तोहमत घेतलीय त्यांनीं ती माझ्यावर !'

' तोहमत घेण्याचं कारण? तुमचं त्यांचं वाकडं आहे?'

' वाकडं नाहीं तसं, पण–

' मग पण काय? बोलावू कां तिला इथं? आतां कां हो गप्प? तिच्या अंगावर हात टाकायला शरम वाटली नाहीं तुम्हांला बेशरम! आजचे आज चालते व्हा. पुन्हां कोर्टांत पाऊल टाकाल तर खबरदार! तुमची नोकरी आजपासून संपली! जास्त शोभा व्हायला नको असेल तर ताबडतोब अर्ज द्या पेन्शनचा. नाहींतर इन्क्वायरी करावी लागेल मला तुमची. मात्र त्याला तोंड देण्याची आणि त्याचे परिणाम भोगण्याची तयारी पाहिजे तुमची. मिस्टर सी. ओ. सी. या साऱ्या सामानाचा लिलाव करा नि ते पैसे सरकारखातीं जमा करून टाका' इतकें बोलून साहेब गेले.

त्यानंतर अण्णासाहेब थोडा वेळ तिथं होते. पण तेवढ्या अवधींत कोणीच कोणाशीं एक शब्दही बोलले नाहीं.

आतां यांत पुढं सांगण्यासारखं काय उरलंय? आणि त्याची आवश्यकता तरी काय आहे आतां? तरी देखील अितकं सांगावयालाच हवं कीं, ज्याला त्याला ' खाईन खाईन ' करणाऱ्याचीं अशा तऱ्हेनं शेवटीं गठडी वळली !

त्यानंतर ते भेटेल त्याला दीनवाणे विचारीत कां हो एवढ्या क्षुल्लक कारणावरून मला पेन्शनमध्यें काढणं हा काय धर्म झाला? तेव्हां अनेकांच्या पुढं त्याचं सारं चरित्रं उभं ठाकून ते मनांत म्हणत असतील ' गेला होता कोठें तेव्हां राधासुता तुझा धर्म?'

: ८ :

गुंडोबाच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीनंतर मधून मधून केव्हांतरी आणि कुठंतरी स्वारी दिसायची; पण त्यांच्या त्या भरमसाट बोलण्याचा मला तिटकारा असल्यामुळं होताहोईतों मी त्याला टाळीत असे. पण त्या दिवशीं उलटा प्रकार झाला. माझं त्याच्याकडं लक्षं गेलं नाहीं; तर त्यानं मला बघितलं. मग तो काय सोडतोय थोडाच मला?

त्याचं असं झालं होतं–उन्हाळ्याचे दिवस होते आणि दोन प्रहरचा वेळ होता. पण अशाही वेळीं, आमच्या घरमालकानं वेळच्या वेळीं, भाडं मिळत नाहीं अशा सबबीखालीं जागा खालीं करण्याची आम्हांला नोटीस दिल्यामुळं मी नवीन जागेच्या शोधार्थ बाहेर पडलों होतों. माझे डोळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ' जागा कुठं बंद दिसते कां' इकडं लागले होते आणि मन आंतले आंत विचारीत होतं ' ध्येय की जीवन? परिणामीं चांगलं काय? व्यवहारी जीवन जगणं? कीं ध्येयनिष्ठेला चिकटून राहाणं ? आणि त्या अनुरोधानं आजपर्यंतच्या आयुष्यांत आलेल्या माझ्या सुखदुःखाचा आढावा घेऊन ते म्हणत होतं ' तूं ध्येयनिष्ठेचं खूळ मोठ्या आस्थेवाईकपणें उरापोटाशीं कवळून धरून शेवटीं काय साधलंस? कांहीं नाहीं! सुरवातीपासूनची तुझी आठ रुपयांची भाड्याची जागा तूं दोन तप संसार करूनही सुटली नाहीं! आणि तुझ्या टिचभर घरांतल्या मुलाबाळांच्या अडगळीपेक्षां तुझ्या अंतःकरणांत ' सत्यं वद ' ' धर्मंचर ' असल्या ब्रीद वाक्यांची अधिक अडगळ झाली असूनहि तूं डोक्यावर धरलेल्या छत्रीप्रमाणं

तुझं छत्र तुझ्या बालबच्यांना शिरावर असतांना त्यांची दारिद्र्याची झळ तें यत्किंचितही कमी करू शकत नाहीं!'

आणि अशा विचारमग्न स्थितींत मी रस्त्याच्या कडेकडेनं कसा तरी चाललों असतांच 'पंडित' ओ पंडत, अरे ओ पंडितजी' असं मागून कोणी तरी हाका मारीत असल्याचा भास झाला म्हणून मी मागं वळून बघितलं तो ही स्वारी दिसली. मी बघितलं तसं 'ठैरो ठैरा' असं म्हणत हात वर करून त्यानं मला थांबायला सांगितलं. मी थांबलों. तेवढ्यांत तो जवळही येऊन ठेपला होता.

'कहाँसे आया? किधर चला? बोलो बोलो तो सही' त्याच्या नेह- मीच्या वृत्तीप्रमाणं त्याची बडबड चालली होती.

त्याचं तें अगडबंब पण थलथलीत शरीर, पोशाखाचा गबाळेपणा आणि भरमसाट बोलणं हें अगदीं पहिल्यापासून आहे तसंच आहे; त्यांत यत्किंचितहि बदल झालेला नाहीं असं पाहून उत्क्रांतवाद्यांच्या तत्वांना यानं आपल्या वागणुकीनं साफ बोळा फांसला आहे असं चटकन माझ्या डोक्यांत येऊन गेलं.

'अरे गृहस्था, किती लांबून तुला हाका मारतोय. कानाचीं भिताडं झालीं कीं काय अगदी? कां ओळख बिळख पार विसरलास? अरे पण जरा खालीं पाहून चाल. अगदीं अस्मानांत दृष्टि देऊन चालू नकोस असा?'

'भल्या माणसा, कां बोलतोस उगीच तोंडाला येईल तसं? अगदीं तुझ्या सारखंच माणसं बघत चाललोय बघ. अन् तुला विसरल्याचं म्हण- तोयस तूं! पण तुला विसरणं शक्य आहे कां? अरे, एक वेळ गडकरी साहित्य विसरेन! पण तुला विसरणं कसं शक्य आहे बाबा?' चेष्टेच्या स्वरांत मी त्याला म्हणालों.

आणि ही गोष्ट अगदीं खरी होती. नोकरीनिमित्त तो नि मी एकत्र असतांना मी मधून मधून आपणहून केव्हांतरी त्याच्याशीं बोलत असे आणि त्याची नोकरी सुटल्यानंतरही त्याची आठवण ठेवली होती ते केवळ त्याला गडकऱ्यांच्या कवितेची आवड या एकाच गोष्टीमुळं. नाहींतर त्याची ओळख ठेवण्यासारखं त्याच्याजवळ होतं काय? त्यांच्या माझ्या

स्वभावांत यत्किंचितही साम्य नसल्यामुळं आम्हां परस्परांत सख्य असणं शक्यच नव्हतं. उलट वाटेल त्याच्याकडून आणि वाटेल त्यामार्गानं पैसा उकळण्याची त्याची मनोवृत्ति, क्षुल्लक गोष्टींत देखील दिसून येणारा त्याचा हावरेपणा आणि त्याची कमालीची नतद्रष्टता आणखी या साऱ्यांच्या जोडीला त्याचा जातिवंत इरसालपणा इत्यादि गोष्टीमुळं मी मनांतून त्याचा तिरस्कारच करीत असे. पण असं होतं तरी गडकऱ्यांच्या कवितांबद्दलचं त्याचं वेड पाहून मी केव्हां केव्हां विश्रांतीचे वेळीं करमणुकीसाठीं त्याचा उपयोगही करून घेत असे.

कोर्टांत प्रथम जेव्हां त्याच्याशीं माझा परिचय झाला त्यावेळीं त्याच्या-जवळ कुठल्याही प्रकारची रसिकता नसता त्याला गडकरी कसे माहीत झाले? याचं मला मोठं कोडं पडलं होतं; पण पुढं एकें प्रसंगीं अगदीं अकल्पितपणें तें सुटलं. कांहीं कारणानिमित्त तो नि मी हिंडत असतां, वाटेंत एक मरतुकडं कुत्रं याच्या हातातल्या काठीला पाहून गुरगुरलं आणि त्यामुळं हा घाबरला; आणखी नंतर 'गडकरी कुत्र्याला फार भीत असत ना रे?' म्हणून एकदम मला प्रश्न केला. तेव्हां मी मनांत म्हटलं 'समान-शीले व्यसनेषु सख्यं' या न्यायानं प्रथम गडकरी आणि त्यांची कविता आवडू लागलेली दिसतेय याला. अशा रीतीनं हें कोडं सुटलं असतं तरी 'याच्यासारख्या अगडबंब देहाच्या माणसानं कुत्र्याला का भ्यावं?' हा प्रश्न मात्र माझ्यापुढं नेहमीं उभा ठाकत असे. मग धन्याला देखील फसवण्याची मांजराची वृत्ति त्याला लाभली होती म्हणून तसं होतं कीं काय कोण जाणें? असो.

त्याला पाहातांच कांहीं कारणांनीं संस्मरणीय झालेले मागचे कित्येक प्रसंग माझ्या अंतःचक्षुसमोर उभे ठाकले. एकदां असाच तो नेहमीच्या पद्धतीप्रमाणं दळायला बसल्यासारखा पाय पसरून लिहायला बसला असतां मध्येंच त्याला लहर लागली आणि तो गडकऱ्यांचं महाराष्ट्र गीत बडबडू लागला. त्यावेळीं 'राकट देशा, कणखर देशा, दगडाच्या देशा' ही ओळ तो म्हणतांच मी एकदम त्याला प्रश्न केला 'गडकऱ्यांनीं तुला बघितलं होतं कां रे?'

'नाहीं बुवा, कां बरं ?' माझ्या बोलण्याचा भाव ध्यानांत न आल्यामुळं गोंधळून तो म्हणाला.

त्यावर मिश्किलपणें हंसंत मी म्हटलं "कांहीं नाहीं, मला वाटलं, तुझ्यावरूनच त्यांना ही ओळ सुचली कीं काय?'

आणि नंतर 'हो. हो. या दगडाला पाहूनच त्यांना या गोष्टी सुचल्या; काय म्हणणं आहे मग?' असं म्हणून त्यावेळीं तो खूपच रागावला होता माझ्यावर. तसाच त्याचा दुसरा रागावण्याचा प्रसंग म्हणजे मी त्याला असंच एकदां म्हणालो होतो 'काय रे, गडकऱ्यांनीं एके ठिकाणीं म्हटलंय् ' तोंडाळ बायको कडकडून, येता काय करावें?' तुला यांवर उपाय सांपडला कां कांहीं?' त्यावेळीं तो खूपच भडकला होता माझ्यावर.

कित्येक वेळीं मध्येच मी त्याला 'नेत्रांच्या शिंपामधुनी' अश्रूचे मौक्तिक सुमणी' अशा सारख्या कांहीं ओळीचा अर्थ विचारीत असे. त्यावर त्यानं म्हणावं 'अर्थ बिर्थ तुम्हांला ठाऊक.'

तें ऐकून मी लगेच म्हणत असे ' हो खरंच, तुम्हांला तेवढं पैसा मिळवायचं ठाऊक! करायचंय काय बाकीचं घेऊन!'

तें कांहींही असलं तरी एवढं बरीक खरं होतं कीं तो फायद्याच्या वेळीं अधिकाऱ्यांच्या म्हणा, समव्यवसायी मंडळींच्या म्हणा, पोटांत शिरून मधमाशीप्रमाणं या ना त्या रूपानं द्रव्यमधु गोळा करीत होता; तर माझ्या सडेतोड वृत्तीमुळं माझं बोलणं गांधीणमाशीच्या प्रमाणं लोकांना झोंबत असे; आणि म्हणून आजवर कोर्टांत कोणीच स्नेहीसंबंधी मला लाभला नव्हता. पण माझी लहर लागली म्हणजे मी कोणाशीहि बोलत असे. तसं त्याच्याशीहि बोलत असे. पण त्याची नोकरी सुटल्यापासून त्याची माझी मध्यंतरी गांठच पडली नव्हती, ती आज पडली.

'काय बेत आहे?' म्हणून त्यानं मला प्रश्न करतांच 'जागा बघतोय् मी' म्हणून मी त्याला उत्तर दिलं. त्यावर तो म्हणाला 'अरे गृहस्था, जागा किती बघतोयस्? मी बघतो तसं आपलं जागा बघणं चाललंय् तुझं?'

'हो, मला कुठं तुझ्यासारखं दोन रुपयांच्या जागेंत साऱ्या सोयी मानून घेता येतात?' मी खवचटपणें त्याला म्हणालों.

'मग आतां काय बंगला घ्यायाचा विचार आहे काय?' त्यांनंही कुत्सितपणें बोलून परतफेड केली. पण मी तें मनावर न घेतां म्हणालों, 'हो, आठ रुपये भाड्यापर्यंत दोन तीन खोल्या असलेला, कुटुंबवत्सल माणसाला योग्य असा बंगला हवाय्. देतोस कां घेऊन?'

'हो जरूर,'

पण दलाली मिळणार नाहीं माझ्या कामांत.'

'निदान चहा तरी देशील?'

'नाहीं; तोही नाहीं.'

'बरं माझा तरी घेशील'

'अवश्य. पण नको बुवा. 'तूं आवळा देऊन कोहळा काढावयाचास एकादे वेळीं.' असं मी जरी त्याला म्हणालों तरी चांगल्या जागेच्या आशेनं त्याच्याबरोबर चालू लागलों.

पहिल्यापासूनच त्याच्या कज्जे दलालीच्या व्यवसायाबरोबरच कोणाला दागीने घेऊन दे. कोणाला भांडीं आणून दे कोणाला गहाणावर कर्ज मिळवून दे' अशा सगळ्या भानगडींत तो असल्यामुळं आपल्या सोयीची जागा याच्या माहितीत असणार असं वाटून, 'ती कुठं आहे? कशी आहे?' वगैरेबद्दल चौकशीच्या भानगडींत न पडतां मी त्याच्या मागोमाग चाललों होतों.

थोड्याच वेळांत (मी थोडा मागं होतों म्हणून) एका घराशेजारीं तो क्षणभर थांबला आणि नंतर आम्ही दोघंहि त्या घरांत शिरलों. त्यानं कोणालाशी हाक मारून वरून किल्ली आणायला सांगितली. शेकडों ठिकाणी अशा प्रकारें असलेली त्याची सलगी मला माहीत होती. थोड्याच वेळांत किल्ली खालीं येतांच त्यानं स्वत: जागा उघडून मला दाखविली.

जागा सर्व सोयींनीं युक्त अशीच होती. त्यामुळं मला ती पसंत पडून भाड्याची चौकशी करण्यासाठीं मी घरमालकाला भेटण्याची इच्छा दर्शविली. त्यावर तो म्हणाला 'जागा पटली कां? तसं असेल तर पुढची भाषा.' आणि मी मानेनं होकार दर्शवितांच 'चल तर' असं म्हणून तो मला आपल्या बरोबर घेऊन गेला.

मी त्याच्याबरोबर माडीवर एका छोट्याशा दिवाणखान्यात गेलो. तो अस्ताव्यस्त झालेली बैठक साफ करीत असतांच तिथलं तें गबाळं स्वरूप

पाहून खरा प्रकार काय असावा हें चटकन माझ्या ध्यानांत आलं; तसा मी दिङ्मूढ होऊन चोहोंकडे बघू लागलों. माझ्या मनःस्थितीचा थांग लागणं त्याच्या बुद्धीच्या आवाक्याबाहेरचं होतं.

मला आपलं वैभव दाखवण्यासाठीं तांबड्या पडद्यांनीं आवृत्त केलेल्या रविवर्म्याच्या तसबिरा उघड्या करीत असतां तोंडानं तो बडबडत होता–

'शहाजहाना आधीं गेली ख्यालिखुशाली ती त्याची
खडा तेवढा ताजमहालचि भूषा जी या जगताची !
गडगडणें काळोख विजाहीं गेलीं वळवाच्या मागें
अन्नब्रम्हचि साक्ष तयाची द्याया हें राही मागें ॥

तें ऐकून त्याच्या नेहमींच्या मूर्खपणाच्या बडबडींत आज कितीतरी शहाणपणा भरला आहे असं मला वाटलं. 'कां रे हें केव्हां घेतलंस?' मी त्याला विचारलं.

'बरेंच दिवस झाले कीं. तुझंही नसतं कां झालं असंच? पण तुम्ही आयुष्यभर 'हें कसं करू? नि तें कसं करू? याचा जप करीत बसलात; भोगा त्याची फळं! अरे तुकारामानं सुद्धां म्हटलंय् 'नाहीं देहाचा भरंवसा' क्षण जाऊ द्यावा कैसा?' म्हणून जिला रूप आहे तिनं गंमत करून घेतली पाहिजे! नि बुद्धि आहे त्यानं पैसा मिळवला पाहिजे! तिथं 'पातिव्रत्य, पातिव्रत्य करीत बसलं तर सारा जन्म हालाकीत जातो! नि न्याय अन्याय बघितले कीं तुझ्यासारखी गत होते! टेकायला जागा मिळत नाहीं टिचभर सत्तेची !

'खरंय् बाबा!' उद्विग्नपणें मी म्हणालों.

तो एकंदर सारा प्रकार नि त्याचं तत्त्वज्ञान ऐकून मला एक हरदासी गोष्ट आठवली. एका राजरस्त्यावरून महाराजांची स्वारी जाणार होती म्हणून अंतरा अंतरावर पोलीस उभे होते. महाराज जाणार म्हणून रस्ता झाडून स्वच्छ केला होता. इतक्यांत त्यावरून एक बैलगाडी गेली आणि ती जात असता एका बैलाचं रस्त्यावर शेण पडलं. तें उचलून टाकणार कोण? नि त्याला अवधी तरी कुठं होता? म्हणून तिथंल्या पोलीसानं शेजारच्या दुकानांतून ओंजळभर गुलाल आणला नि त्याच्यावर टाकला. त्यानंतर जाता जाता एकानं त्याला चार फुलं वाहिली. दुसऱ्यानं शेजारच्या

झुडपाच्या चार डहाळचा आणून त्याच्याभोंवती छोटंसं मखर केलं. आणि अशा रीतीनं मूळच्या शेणाचा थोडचाच अवधींत देव बनला ! आतां तिथून जाणारे येणारे भाविकपणें नमस्कार करूं लागले. इतकंच नव्हे तर राजेसाहेबांनींहि तिथं येतांच अंबारींतून खालीं उतरून भक्तिभावानं त्या देवाला (!) वंदन केलं! त्याप्रमाणं गुंडोबानं कसाही पैसा मिळवून आज घर घेतलं असलं तरी त्यावर काळाचा गुलाल पडला म्हणजे उद्यांचं जग यालाच कर्तबगार ठरवील! भाग्यवान म्हणेल! कोणाला कळणार आहे त्या गुलालाखालीं कोणची कर्तबगारी आणि कुठलं भाग्य दडलं आहे तें?

: २ :

माणसाला, देवाला आणि दैत्याला दोघांनाही वंदन करावं लागत असलं तरी एकाच्या पोटीं आदर असल्यामुळं तें इच्छेचं असतं; तर दुसरं भीतीच्या पोटीं असल्यामुळं तें जुलमानं करावं लागतं त्याला. त्याप्रमाणं सरकारी नोकरींत कनिष्ठानं वरिष्ठाला ज्यावेळीं नमस्कार करण्याची वेळ येते त्यावेळीं उपरोक्त भावनांपैकीं कुठल्या तरी एका–बहुधा दुसऱ्याच भावनेच्या (भीतीच्या) पोटीं त्याच्याकडून केला जातो तो. त्यामुळं तो आदराचा नमस्कार नसून जुलमाचा रामरामच असतो. पण दप्तरदार दादासाहेब ज्यांना असा जुलमाचा रामराम करावा अशांपैकीं नव्हते; याचं प्रत्यंतर ते ज्या दिवशीं ऑफीसांत आले त्याच दिवशीं आलं.

त्यांच्या परिचयाच्या मंडळींनीं म्हटल्याप्रमाणं हे नवे दप्तरदार थोडें बावळट दिसत होते खरेच. आणि मध्यम लांबीचा बंद कॉलरचा तांबडसर रंगाचा त्यांचा खादीचा कोट, आंत खादीचाच मळकट शर्ट, धोतर नि उपरणंहि त्याच जातीचं आणि त्याच रंगाचं, तसंच पायांत कोंकणी वाहाणा आणि डोक्याला कसातरी गुंडाळलेला कोशा असा त्यांचा गबाळा वेष त्यांच्या विषयींच्या आमच्या त्या मताला पुष्टि देणारा असाच होता.

त्यांच्या गबाळेपणासारखाच त्यांचा दुसरा दोष माहितगार मंडळींनीं सांगितला होता. तो म्हणजे 'ते भित्रे आहेत.' अनुभवानं त्यांचा तोही दोष पटला मला पण मी म्हणतों या अवनीतलावर आपल्याला कोणीच आवरणारा नाहीं अशा समजुतीनं बेफाटपणें धावणाऱ्या सैराट जनावराप्रमाणं सूक्तासूक्त विचार न करणाऱ्या अविचारी माणसापेक्षां भीतीनं जगांत जपून पावलं टाकणाराच बरा! असो.

दादासाहेबांनीं ऑफीसांत येतांच उपरणं खुर्चीच्या पाठीवर टाकलं आणि 'मंडळी आजपासून मी तुमच्यांत आलों आहे बरं का? आतां एकमेकांना एकमेकांनी सांभाळून घ्यायाचं, काय समजलात?' असं सर्वांना अनुलक्षून बोलून नंतर 'तुमचं नांव काय? किती दिवस काम करता इथं?, वगैरे प्रकारची प्रत्येकाची थोडक्यांत माहिती घ्यायाला सुरवात केली.

बऱ्याच वेळानं आम्हां अटरा वीस उमेदवारांना विचारून झाल्यावर ते कारकुनांकडं वळले; आणि 'तुमचं काम काय?' 'तुम्ही कोणकोणचीं कामं करता?' असं आमच्या प्रमाणंच त्या तिघां चौघांनाही विचारलं; आणखी त्यांच्याकडून कामाची माहिती करून घेतांघेतांच मध्येच ते आपल्या जागेकडं वळले; भांड्यांत तांब्यांतलं पाणीं ओतून घेतलं आणि दारांत जाऊन चांगले हात धुतले. नंतर ते खिशांतल्या रुमालानं, त्यानंतर नेसत्या धोतरानं आणखी शेवटीं कोटाच्या दोन्ही खिशांना ते पुसले. तो सारा प्रकार त्यावेळीं विचित्रपणाचा वाटला मला! पण पुढं दररोज आणि तेही दिवसांतून अनेक वेळां तसं करीत असलेलं पाहून कोर्टाच्या कामांत आपले हात स्वच्छ असावेत' म्हणून तर हे असं करीत नसतील? असं मनांत आलं माझ्या. कांहीं असो, पण त्यांना ती एक खोड होती खरी, त्यांची दुसरी खोड म्हणजे इतर वेळीं त्यांचे दोन्हीहि हात दोन्ही खिशांत घातलेले असत; आणि मला वाटतं त्याचंही कारण बहुधा असंच असावं. लोकांकडून पैसे घेण्याचा मोह होऊ नये म्हणूनच त्यांनीं आपल्या हातांना खिशांत गुंतवून ठेवण्याची संवय लावलेली असावी. असो. आपले हात धुवून आल्यानंतर त्यांनीं मागील चौकशीचं काम पुढं चालवलं. कारकून मंडळींनीं कागद (पक्षकारांनीं कोर्टांत दाखल केलेले दस्तऐवज) देणं घेणं

एवढंच आपलं काम असल्याचें सांगितलं. 'मग मास्तर (खालील कोर्टी-तून आलेलीं प्रकरणं) कोण तपासतं?' त्यांनीं विचारलं.

'तें सारं उमेदवार करतात.' एक मुखानं साऱ्या कारकुन मंडळींनीं सांगितलं.

'कां हो, हें जें आपण त्यांच्याकडून फुकट काम करून घेतों, त्याला हायकोर्ट सर्क्युलरमध्यें कांहीं आधार आहे कां?'

'आधार? आधार कोण पाहचला गेलाय्? पण आज कित्येक वर्षांची वहिवाट आहे तशी. शास्त्रापेक्षा रूढी बलवत्तर असतेंच ना नाहीं तरी! शिवाय असं कीं त्याना फुलटाईम वर्क आहेच कुठं मुळीं? मग काय रिकामं बसायचं? त्या ऐवजीं सरकारी काम केलं तर कुठं बिघडलं त्यांचं?' एका शहाण्या कारकुनानं सांगितलं.

'पण सरकार देतं कां त्याबद्दल त्यांना कांहीं? अन् तें देत नसेल तर त्यांना फुकट राबवून घेण्याचा तरी आपल्याला काय अधिकार आहे? अन् सबंध दिवस त्यांना काम नाहीं हें जरी खरं असलं, तरी मोकळा माणूस म्हणून कोणालाही वेठीला धरता येईल कां आपल्याला? स्टेशनवर एक गाडी येऊन गेल्यानंतर दुसरी येईपर्यंत रेल्वे हमालांना काहीं काम नसतं. प्लॅटफॉर्मवर गटागटानं चकाटचा पिटीत बसलेले असतात ते. पण म्हणून रेल्वे अधिकारी कांहीं त्यांना काम सांगत नाहींत. अन् त्यांना तें सांगितलं तर करणारही नाहींत म्हणा ते! तिकडं जी त्यांची स्थिति तीच इकडं उमेदवारांची. काय समजलात? हा सुशिक्षित वर्ग म्हणून मुकाटचानं तुम्ही सांगाल तीं काम करतो बिचारा! पण म्हणून आपण त्यांना फुकट राबवून घेणं बरं कीं काय?'

असले हे विचार आजपर्यन्त कोणाही सरकारी नोकराच्या मुखांतून बाहेर पडले नव्हते. ते ऐकून मनांत विचार आला 'चार माणसाचं वाटोळं करणाऱ्या हुषार माणसापेक्षां आपल्या हाताखालच्यांना सहा-नुभूतीनं सांभाळून घेणारा असा निरुपद्रवी माणूस थोडा कमी शहाणा असला तरी चालेल.'

सरकारी यंत्रणा बदलून ते आमची परिस्थिति पालटू शकत नव्हते. तें त्यांच्या अधिकाराबाहेरच होतं. हें जरी खरं असलं, तरी पण पावसाच्या

अनुक्रम 30053
विभाग
क्रमांक
नों. दि.

वेळीं पडक्या घराच्या भिंतीच्या आडोशाला देखील उभं राहूं द्यायचं नाहीं, इतका दुष्टावा तरी इतरांच्या प्रमाणं त्यांच्या ठिकाणीं नाहीं, याचं प्रत्यंतर त्यांच्या बोलण्यावरून आम्हांला आलं. पण त्यांचं तें बोलणं कारकुनांना रुचलं नाहीं. रुचणं शक्यही नव्हतं तें. ' पण तसं केलं नाहीं तर कामं तुंबून राहतील तीं? ' सर्वांनींही एकदमच विचारलं.

' आपण केलीं पाहिजेत. सरकार पगार देतं ना आपल्याला? काय समजलात? मग आपणच केलीं पाहिजेत तीं ' असं बोलून त्यांनीं तो विषयच संपवला आणि तें आपल्या जागेवर जाऊन बसले.

कांहीं माणसांना उगीच पुढं पुढं करण्याची खोड असते. त्याप्रमाणं वाकडयांनीं नेहमीच्या आपल्या संवयीप्रमाणं त्यांच्या टेबलापाशीं जाऊन आपल्या नेसत्या धोतराच्या सोग्यानं त्यांचं टेबल पुसायला सुरवात केली. त्यांना तो प्रकार चमत्कारिक वाटून त्यांनीं त्यांना विचारलं ' अहो, हें काय चालवलं आहेत तुम्ही? हें असं करायचं नसतं बरं कां आपण? हें काम शिपायांचं. आतां कांहीं मोठीं माणसं अशीं छोटीं कामं करतात; पण तें प्रसिद्ध साठीं! तुम्हांला असं प्रसिद्ध पुरुष व्हायाचंय काय? नाहीं ना? मग असं करीत जाऊ नका.'

पण त्यांना त्यांनीं इतकं सांगूनहि दुसरे दिवशीं मंडईची झोळी घेऊन ते गेलेच होते त्यांच्या घरीं त्यांची भाजी आणायला! ते चहाच्या वेळेलाच गेल्यामुळें त्यांनीं त्यांना चहा दिला, आणि नंतर इतक्या सकाळीच येण्याचं कारण त्यांना विचारलं. आणखी आपण तुमची मंडई आणायला आलों असं त्यानीं म्हणतांच अहो, दुसऱ्याच्या पाठीवर भाजीचं ओझं घेऊन येण्याइतका भला थोरला पगार तरी मिळतोय् कां आम्हांला? मग ही नसती ऐटी करून चालेल कां?' असं तें म्हणाले.

ते ऐकून बिचाऱ्या वाकडयांना मुकाटयानं घरीं परतावं लागलं.

आणि त्यांनीं बोलल्याप्रमाणं नंतर केलं खरंच. त्यामुळं आम्हां मंडळींना नकलाच्या कामाव्यतिरिक्त इतर कांहींही कामं करावीं लागत नसत. त्यामुळं आपलीं कामं करून, पुष्कळच आराम मिळू लागला आम्हांला.

एके दिवशीं असाच मला थोडी पेंग येऊ लागली म्हणून मागील तक्याशीं मी टेकलों होतो. तेवढयांत मला थोडा डोळा लागला. त्यांच्या

दृष्टीस तें पडतांच ' अहो ' असं अवघडल्यासारख काय पडलात? नीट तरी निजा! ' असं त्यांनीं म्हटल्याबरोबर माझी झोपमोड होऊन मी उठून बसलों.

' रात्रीं मेळे पहायला गेले असाल? होय ना? ' असं विचारून नंतर त्यांनीं ' किती मेळे आहेत यंदा? तो सन्मित्रसमाज मेळा पुन्हा निघाला होता तो आहे कां हो? पदं कशीं काय आहेत यंदाची त्याचीं? ' वगैरे वगैरे चौकशा सुरु केल्या. मी एका प्रश्नाच्या उत्तरांतून मोकळा होतोय् तो दुसरा तयार! शेवटीं त्या मेळ्याच्या त्या वेळच्या पदाचं सांगतांना ' भलोबा लगाव लगाव लगे ढोल ' हें पद ऐकलं होतंत कां तुम्ही? असं त्यांनीं मला विचारलं; आणि मी ' नाहीं ' म्हणतांच ' याचा वरचा अर्थ वेगळा नि सरकारला न कळणारा गूढ अर्थ वेगळा, बरं कां?' असं म्हणून नंतर त्यांनीं चालू पदांवर टीकास्त्र सुरू केलं. त्याच्यापुढं माझी झोप पार कोठच्या कोठं पळून गेली !

मागं आम्हांला किरकोळ रजा मिळायला कोण पंचाईत व्हायाची? पण आतां ती केव्हाही मागा नि कितीही मागा त्यांचा अनुकूल अभिप्राय त्या अर्जावर लिहून गेल्यामुळं रजा लगेच मंजूर होऊन यायाची. अन् त्यांच्या अधिकारांतल्या चार दोन तासांच्या रजेचा तर प्रश्नच पडत नसे, कधीं ' जाऊन येऊ कां थोडं?' असं कोणी केव्हांही त्यांना विचारलं म्हणजे त्यांनीं घड्याळाकडं बघायचं नि दोन वाजले तर ' तीन वाजता जा ' म्हणायचं. तीन वाजले असले तर ' साडे तीनला निघा ' म्हणायचं. त्यांच्या इतर कांहीं खोडीप्रमाणं ही ही एक खोड होती त्यांना. त्यांचं तें तास अर्धा तास उशीरा सुटी देण्याचं तंत्र जसं मी ओळखलं तसं आप-ल्याला हव्या असणाऱ्या वेळेच्या आधींच एक तास, रजा पदरांत पाडून घेऊं लागलों मी.

अशी सवलत मी पहिल्यानंच ज्या वेळीं घेतली त्यावेळीं आमच्याकडं कार्य निघालं होतं. ' काम होतं थोड जाऊन येऊ कां?' मी विचारलं.

हीं माणसं काय करताहेत? कामच ना? मग त्यासाठीं घरीं कशाला जाता? इथंच करा कीं.' चर्या नेहमीचीच, आवाज साधाच पण बोलणं चेष्टेचं, अशा नित्यांच्या पद्धतीप्रमाणं ते मला म्हणाले.

'तसं नाहीं. थोडं खाजगी काम होतं घरी'–मी.

'आतां अशी खाजगी कामं नित्याचींच तुमचीं घरचीं! काय समजलात? पण आपल्याला नोकरी करायची ना? मग वरचेवर अशीं खाजगी कामं काढून कसं बरं चालेल?' ते म्हणाले.

'वरचेवर नाहीं आजच फक्त. अन् मी लगेंच येतो ना परत?'–मी.

'त्याबद्दल माझी खात्री आहे हो.'–ते.

'बघा एक तासात येतों कीं नाहीं तें'–मी

'आतां किती वाजलेत? दीड. आणखी एक तासानं जा.'

त्यांच्या म्हणण्याप्रमाणं एक तासानं पुन्हा त्यानंतर विचारलं, त्याबरोबर 'जा' म्हणून त्यांनीं मला परवानगी दिली; आणि त्याप्रमाणं कोट घालून मी दारापर्यंत कुठं गेलों असेन नसेन तोंच त्यांनीं मला हांक मारली. मला भीति पडली 'दिलेली परवानगी काढून घेतात कीं काय आतां?' आणि शंकाकुल मुद्रेनंच त्यांच्या टेबलाजवळ जाऊन मी उभा राहिलों.

'परत येणार कां? त्यांनीं विचारलं. आणि मी 'हो' म्हणतांच 'अहो तुमच्याकडं कार्य निघालंय ना? मग कसे परत येणार एक तासांत तुम्ही? काय? तेव्हां तुम्ही येऊ नका आज. काय समजलात? आज सुट्टी तुम्हांला; बरं ना?' असं म्हणून त्यांनीं जायाला परवानगी दिली मला.

त्यांचं बोलणं वागणं सगळ्यांशीं–पक्षकारांशी सुद्धा–हें असंच असायचं. त्याप्रमाणं एका पक्षकारानं नक्कल लवकर पाहिजे म्हणून अर्ज दिला; आणि ताबडतोबीच्या तजविजीसाठीं मागच्या रिवाजाप्रमाणं रुपयाची नोट ठेवली. तें पाहून ते जागचे उठले, नेहमीप्रमाणं पाण्याचं भांडं भरून घेतलं आणि हात धुण्यासाठीं म्हणून दरवाजांत गेले. तिथं एकाशीं बोलण्यांत अर्धा तास काढला त्यांनीं! तेवढ्या वेळांत त्या माणसाची चुळबूळ चालली होती जागचे जागीं. किती वेळानं तरी ते एकदांचे जागेवर जाऊन बसले. त्याबरोबर त्या गृहस्थानं त्यांना आपल्या कामाची आठवण देऊन नक्कल लवकर मिळावी म्हणून तो गयावया करू लागला. त्यावर त्यांनीं विचारलं 'बरं मग?'

त्याला वाटलं हे पैशाबद्दलच आडले असावेत ! म्हणून खालच्या आवाजांत तो म्हणाला 'रुपया ठेवलाय ना?'

'रुपया कशाला ठेवलाय्?' मोठ्यानं त्यांनीं त्याला प्रश्न केला.

'तजविजीसाठीं !' तो.

'अहो, कसली तजवीज करता ?' त्यांचा तोच आवाज कायम होता.

'साहेब मी संतोषानं देतो आहे हें !' तो म्हणाला.

'दक्षिणा कां देता तुम्ही मला? अहो मग हीं भिजवून तरी आणा समोरच्या हौदांतून! त्यांत द्या टाकून ती! म्हणजे तुकारामाच्या गाथे सारखी वर येईल केव्हांतरी ती! काय समजलात ?'

त्यांचीं हीं बोलणीं चाललीं असतांच कांहीं कामासाठीं मी तिथं गेलों होतों.

'काय म्हणतात हे? ऐकलं कां? ' मला त्यांनीं विचारलं.

मी म्हटलं 'नाहीं बुवा!'

'अहो, हे पैसे घ्या म्हणताहेत! घेऊं कां मग?'

'साहेब ठेवा ती. असू द्या.' हळू आवाजांत तो म्हणाला.

'कशाला असू द्या? तुमच्यासारखीं माणसं अशा ठिकाणीं असं कांहीं तरी आणून टाकतात; अन् मग तिथं सांचतों उकीरडा! नि मग तुम्हीच इथं घाण फार झाली म्हणून नाकाला पदर लावतां! काय म्हणावं याला?'

'पण साहेब पूर्वी घेत असतं इथं; म्हणून ठेवला मी तो.'

'तुम्ही काय उद्योग करता?' त्यांनीं त्या माणसाला विचारलं.

'शाळा मास्तर आहे मी.'

'कुठं?'

'बावधनका'

'अस्सं कोण ब्राम्हण कां?,

'नाहीं मी सोनार आहे.,

'मांसाहार करतात कां हो तुमच्यांत?'

'नाहीं.'

'मी पण खेड्यांतलाच आहे बरं कां तुमच्यासारखाच. आमच्या गांवांत मुसलमान मास्तर आला होता एकदां. गांवांत देवाला बकरं मार-

तात माहीत आहे कां तुम्हांला? कंदुरी कां कायसं म्हणतात बघा त्याला. ती झाली कीं लोक त्याचा मासला त्याच्या घरीं नेऊन देत असत. पुढं त्याची झाली बदली; नि तिथं आला माझ्यासारखा सोवळा ब्राम्हण. पुढं एके दिवशीं एकाकडं ती कंदुरी झाली नि त्याला जुना मास्तर जाऊन नवा आल्याचं कांहीं माहीत नव्हतं त्याला. तेव्हां तो आला तो देवाचा प्रसाद घेऊन नि काय त्याच्याकडं ! तसं झालं बघा हें तुमचं ! काय समजलात?'

तें ऐकून तो माणूस खजील झाला नि त्यानं तो रुपाया मुकाटचानं उचलून घेऊन खिशांत टाकला.

'पण मग आतां माझ्या कामाचं? होईल ना साहेब लवकर तें?'

'लवकर कसं होईल? कोर्ट कचेऱ्यांचीं कामं अशी लवकर होतात कां कधीं? तुम्ही तें नाटक पाहिलंय कां हो? त्यांत कोर्टानं आजीचा ताबा नातवाला दिला असं म्हटलंय्; काय समजलांत?'

'साहेब, मला आजचे आज ती नक्कल पाहिजे होती '

'होईल बरं कां. तोंवर घटकाभर बाहेर हिंडून या. नाहींतर त्या समोरच्या हॉटेलांत जाऊन पावमिसळ खाऊन या. काय हो, मिसळ खाता कां कधीं तुम्ही? काय काय असतं हो त्यांत ? आधले दिवशीचे सारे शिळे जिन्नस घातलेले असतात म्हणे त्यांत!'

तें ऐकून मी शेजारीच बसलेल्या जोशाला डिवंचून हळूच म्हटलं 'आतां मिसळ प्रकरण सुरू झालं. काय समजलांत?'

'अहो, नाहीं संपलं. काय समजलात?' माझं बोलणं कानावर पडल्यामुळं मागं वळून ते म्हणाले; नि नंतर त्यांनीं त्याला काम लवकर देण्याचं आश्वासन देऊन चहा पिण्यासाठीं पाठवून दिलं.

अशा रीतीनं सर्वच दृष्टींनीं त्यांची कारकीर्द सर्वांना सुखावह होत होती. तसंच लोकांचीं कामंही विनायासें पार पडत होतीं. एकंदरींत सर्व कांहीं ठीक चाललं होतं. पण बहुजनांना सुखावह होणारं चांदणं चोरांना तापदायक होतं. तसंच रामराज्य देखील कांहीं लोकांना दुस्सह झालंच असेल. त्याप्रमाणं दादासाहेबांचा सज्जनपणा ऑफीसांतल्या कांहीं लोकांच्या डोळ्यांवर आला. सज्जनपणा दंडनीय ठरत नाहीं असं थोडंच आहे? दुष्कृत्याचं फळ परलोकीं मिळत असलं तर सत्कृत्याचं प्रायश्चित्त या

लोकींच द्यायाला टपून बसलेले असतात आपले हितशत्रू. दादासाहेबांचं असंच झालं. त्यांच्यावर रुष्ट झालेल्या त्यांच्या हाताखालच्या कारकुनांनीं त्यांच्या विरुद्ध वरिष्ठांकडं कागाळी केली आणि ती जज्जसाहेबांपर्यंत जाऊन त्यांनीं त्यांना बोलावून घेतलं.

उन्हाळचाच्या सुटींत रेकॉर्ड लावणं मोस्तर तपासणं हीं कामं दप्तर–दारांच्या देखरेखीखालीं व्हायची आणि तीं उमेदवारांनीं करायची अशी आजवरची पृथा. पण उमेदवारांना मोबदला न देता फुकट वेठीला धरणं दादासाहेबांना बरं न वाटल्यामुळें त्यांनीं मोस्तर तपासण्याचीं कामं कार–कुनांकडून करून घेतली आणि दप्तरांचीं ओझीं उचलायचीं वगैरे कामं बाहेरचे हमाल आणून पुरी करायचं चाललं होतं. कारकून मंडळींना जादा कामं पडलीं म्हणून आतले आंत चिडले.पण त्यांना त्याबद्दल तक्रार करतां येणं शक्य नव्हतं. तें त्यांच्या विरुद्ध कागाळी करायला कारण शोधीत होते; पण तें मिळत नव्हतं; तें एकदांच मिळालं! एका हमालाकडून दत्पर एका खोलीतून दुसऱ्या खोलींत नेत असतां वाटेत पडलं आणि त्यांतील कागद अस्ताव्यस्त झाले. ही गोष्ट सी. ओ. सी. च्या कानावर जाऊत तें दादासाहेबांच्यावर खूपच चिडले आणि त्यांनीं कागद गहाळ झाले तर त्या कामीं बाहेरच्या लोकांना जबाबदारहि धरता थेणार नाही आपल्याला. उमेदवार म्हणजे सरकारी नोकर असल्यासारखेच असल्यामुळं ते ऑफी–सची कामं काळजी काटयानं करतात. तेव्हां त्यांच्याकडूनच हीं कामं करून घेणं योग्य असता आणि तशी वहिवाटही असता ती मोडून या दत्परदारांनीं हा अव्यापारेषु व्यापार केला आहे तरी या बाबतींत त्यांना समज मिळावी वगैरे वगैरे साहेबांना सांगितलं, आणि त्यावरून साहेबांनीं दादासाहेबांना बोलावून घेतलं.

‘ यंदा रेकॉर्ड लावायचं तुमच्या ऑफीसचं काम नीटपणें होत नाहीं असं कळतंय् मला. ’ साहेबांच्या चेंबरमध्यें दादासाहेब शिरताच साहेब म्हणाले.

‘ काम शक्य तितक नीटपणें व्हावं याची खबरदारी मी जातीनं घेत असता असं आपल्या कानांवर कसं आलं आश्चर्य आहे ? ’ –दादासाहेब.

, दप्तरं लावण्याची वगैरे कामं कोणाकडून करून घेतां आहां ? तीं काय हमालाचीं कामं आहेत काय? ' साहेबांनीं दरडावून विचारलं.

' नीट केली आणि करून घेतलीं तर हमालही करू शकतील तीं कामं. आणि मला वाटतं बुद्धिजीवी माणसानं अशी ओझीं उचलण्यापेक्षा त्यांनीं केलेली बरीं. '

' अन् त्या हमालांची मजुरी कोण देणार : तुम्ही? '

' होय. मी माझ्या पदरचे द्यायचे ठरवले आहेत. '

' पण उमेदवार ती कामं करीत असता बाहेरच्या माणसाकडून तीं का करून घेता तुम्ही ? '

' साहेब, गुन्हे करून तुरुंगांत आलेल्या गुन्हेगाराला सुद्धा पोटाला अवश्यक तेवढं अन्न घालून झेपेल तितकंच काम त्यांच्याकडून करून घेतलं जातं—'

' त्याचा इथं संबंध ? ' त्यांना पुढं बोलू न देता मध्येंच साहेबांनीं विचारलं.

' या लोकांना या तीन महिन्यांत चुरमुरे फुटाणे खाण्याइतके सुद्धा पैसे मिळत नाहीत. बहुतेकाचं तारुण्य उलटलेलं आहे, प्रापंचिक परिस्थितीनं टेंकीला आले आहेत बिचारे ! अशा स्थितींत जे माझ्या योग्यतेचे पण दुर्दैवानं ज्यांना अशा दु:स्थितीत पिचत पडावं लागलंय, त्यांच्याकडून जीं कामं निर्बुद्ध हमालांकडून करून घ्यायाचीं, तीं करून घेणं, अमानुषपणाचं वाटतं मला ! '

' ते जरी सारं खरं असलं तरी पण आजपर्यंत लोक करून घेतच होते ना ? तशीं तुम्हीही कां करून घेतली नाहींत ? म्हणतो मी. आणि तशीं तुम्ही तीं करून घेतलीं असतींत तर कोण विचारणार होतं तुम्हांला, तीं त्यांच्याकडून का करून घेतलीत म्हणून ? '

' दुसऱ्या कुणी विचारलं नसतं तरी माझ्या सदस्‌द्विवेक बुद्धीनं विचारलं असतं ! ' शांत पण करारीपणें दादासाहेब उद्‌गारले.

'त्यांचं तें वाक्य ऐकून साहेबानीं स्मित केलं.कांहीं काळ ते विचारमग्न झाले; आणि नंतर ते त्यांना म्हणाले ' बरोबर आहे तुम्ही म्हणता तें. तुकडे करण्याचं यंत्र असतं तें लाकडाचे तुकडे करतं, तसंच चुकून त्यांत

हात सांपडला तर त्याचाही तुकडा पाडतं तें ! अधिकाऱ्यानं असं यंत्र बनू नये. ही सरकारी यंत्रणा असली आणि तींत आपण यांत्रिक जीवन जगत असलों तरी आपल्या सद्भावना नाहींशा करू नयेत आपण ! मला एक तरीं यांत मनुष्य दिसला याबद्दल समाधान वाटतं मनाला. जा आतां तुम्ही इतकं बोलून साहेबानीं दादासाहेबांची रवानगी केली; आणि अशा रीतीनं क्लॉर्क ऑफ दी कोर्टनी त्यांना वठणीकर आणण्यासाठीं रचलेला. व्यूह ढासळला इतकंच, नव्हे तर हमालाचे पैसे काँटिजन्सीमधून खर्ची घालावेत असं त्यानीं सांगितलं

दादासाहेब खालीं आले आणि थोड्याच वेळांत पट्टेवाला 'साहेबांनीं साऱ्या उमेदवार मंडळींना बोलावलंय्' म्हणून सांगत आला.

ती वार्ता ऐकून कित्येकांचीं धाबीं दणाणलीं ! साऱ्यांना कळून चुकलं कीं उमेदवारांनीं दप्तरं तपासण्याचीं वगैरे कामं करण्याची नाकारली असंच दप्तरसाहेबांनीं साहेबांजवळ सांगितलं असलं पाहिजे; आणि म्हणून साऱ्यांची हजरी घ्यायाला त्यांनीं बोलावलं आहे. कांहीं म्हणाले 'आम्हांला कल्पना नव्हती हे गृहस्थ असे असतील याची!' तर कांहीं धीट मंडळी म्हणाली 'चला कीं हो. साहेब झाला तरी काय माणुसच आहे ना तो ? वाघ सिंह तर नव्हे म्हणून तो खाऊन टाकील आपल्याला?' पण ज्यांना वरिष्ठांपुढं शब्दही बोलायचा आजपर्यंत प्रसंग आला नव्हता त्यांची अगदीं पांचावर धारण बसली! प्रत्येकजण विचार करूं लागला 'आपल्यावरच प्रश्नांचा मारा केला तर काय उत्तरं द्यायाची?' कांहींजण अपेक्षित प्रश्न काय असतील याची कल्पना करून मनांतले मनांत त्यांचीं उत्तरं पाठ करू लागले, तर कांहींनीं साहेबांना सांगायचं मनाशीं ठरवलं कीं 'आपल्यां-तल्याच कांहीं मंडळींनी 'आम्ही हीं कामं करीत नाहीं' असं उर्मटपणें सांगितलं, साहेबांना; तर आपण पुढं होऊन सरळ सांगायचं 'आपण सांगाल तीं कामं करण्याची आमची तयारी आहे म्हणून!' आणि अशीं विचारांचीं ओझीं बरोबर घेऊनच आम्ही साहेबांच्या चेंबरमध्यें प्रवेश केला.

'काय मंडळी, यंदा ऑफीसचं रेकॉर्ड लावायला कारकुनांना तुम्ही मदत केली नाहीत म्हणे.' आम्ही सारेजण आंत जातांच साहेब आम्हांला उद्देशून म्हणाले.

तें ऐकून देखील सारेंच स्तब्ध होते. कोणीतरी उत्तर देईल म्हणून प्रत्येकजण दुसऱ्याकडं बघत होता.

'मदत झाली नाहीं आमच्याकडून हें खरं आहे पण साहेब'–एकानं बोलण्याचं धाडस केलं; पण नंतर तो मध्येंच घुटमळला.

'ऑफीस आम्हांला पगार देत नाहीं; मग ऑफीसचं काम तरी आम्ही कां करावं?' असं तर तुमचं म्हणणं नाहीं ना?'

'नाहीं साहेब तसं नव्हे पण'—

'तुम्ही उघडपणें बोलून दाखवीत नसला तरी तसंच आहे. हीं सारीं कामं कारकुनांकडून केलीं जातात अशाच समजुतीवर मी होतों. तो माझा गैरसमज तुमच्या दप्तरदारांनीं दूर केला ज्याला पोटाला घालता येत नाहीं त्याला काम सांगण्याचा अधिकार कोणालाच-सरकारला देखील पोहोंचत नाहीं. तेव्हां त्या आपत्तीतून मी तुमचीं सुटका करतों. इतकंच नव्हे तर या सुटींत तुम्हांला दुसरीकडं कुठं चार पैसे मिळत असतील तर तिकडं जाण्याला देखील मी तुम्हांला परवानगी देतों.'

ही संधी साधून एकजण धाडसानं म्हणाला 'पण साहेब, आपणच जर आमच्या पोटापाण्याची सोय केलीत तर फार चांगलं होईल ? आपण आम्हांला अन्नाला लावले म्हणून आम्ही सारे आपल्याला दुवा देऊ.'

तें एकून साहेब किंचित हंसले आणि नंतर ते म्हणाले 'अहो, मी म्हणजे काय पूर्वीच्या काळचा कोणी सुलतान आहे कीं काय, ज्याच्या इच्छेबरोबर चांगल्या किंवा वाईट गोष्टी धडाव्यात? या काळांत कुठलीही गोष्ट तडकाफडकी होत नसते. सावकाशीनं होते. त्याप्रमाणं तुमच्यासाठीं कांहीं करायचं म्हटलं तरी त्याला कांहींतरी कालावधि लागणारच!'

'साहेब, इतके दिवस आम्ही हालअपेष्टेंत काढले तसे आणखीही कांहीं दिवस काढू; पण आपण आम्हांला अन्नाला लावा अशी आपल्या चरणाजवळ प्रार्थना आहे!' आमच्यांतले एक अती नम्र गृहस्थ म्हणाले.

'या गोष्टीचा मी बरेच दिवस विचार करतों आहे. तुमच्या कामाची सरकारला नेहमीच गरज असते; त्यामुळं या वर्गाची आवश्यकता लागणारच त्याला. प्रश्न असा आहे कीं सरकारजवळ हें काम थोडं आहे, त्यामुळं त्यासाठीं माणसंही थोडींच लागणार त्याला. मग?'

'मग काय तें ध्यानांत आलं नाहीं आमच्या' एकजण म्हणाला.

' मग म्हणजे असं कीं बाकीच्यांचं काय करायचं ? ते सोडून जायला तयार आहेत काय ? दुसऱ्याच्या पोटापाण्याची सोय करण्यासाठीं आपली नोकरी सोडण्याची किती जणांची तयारी आहे ? ' ( यावर कोणीही कांहींही बोलले नाहीं ) झालं तर मग ? सरकार म्हणजे काय पांजरपोळ आहे कीं तिथं मोडकीं तोडकीं भाकड झालेंलीं सारींच जनावर पोसलीं जातील! तें तर असं आहे की तुमच्याकडून दुप्पट चौपट काम घेऊन एक पट कामाचा मोबदला तुमच्या पदरांत टाकील. अन् तसं केल्याशिवाय कुठ-लंही राज्ययंत्र चालतंच नसतं. मग बोला, तुमच्यापैकीं लायकांची सोय होण्यासाठीं, त्यांना पोळी मिळवून देण्यासाठीं, कितीजण आपल्या आज मिळणाऱ्या चतकोर नितकोर भाकरीवर पाणी सोडायला तयार आहेत ? काय ? कोणीच नाहीं ? मग कसले स्वार्थत्यागी तुम्ही ? '

' पण साहेब लायक नालायक ठरवायचं कसं ? आणि कुणी? ' एकानं शंका प्रदर्शित केली.

' तें ठरवायचं सोपं आहे. नालायक कोण ? तर जे वशील्यानं आले असतील ते. आणि ठरवायचं कुणी ? तर आपले आपण, कारण आपली मनोदेवता आपल्याला सांगतच असते कीं आपण शहाणे आहोत कीं मूर्ख आहोत ते ! '

' आम्ही सांगितलं तर ? ' एकजण म्हणाला.

' काय सांगणार तुम्ही ? अमके लायक नि तमके नालायक म्हणून ? वा ! तुमच्या स्वार्था करिता त्याच्या पोटावर पाय आणणार काय ? '

'मग चाललंय् तें असंच चालायचं म्हणायचं अखेरपर्यन्त !' अेकजण निराशेनं उद्गारला.

'बरं पाहू—पाहू काय करायचं तें' असं म्हणून त्यांनीं आम्हां सर्वांना वाटेस लावलं.

आणि त्यानंतर दादासाहेब लवकरच सेवानिवृत्त झाले.

: १० :

' बरंय् पाहू काय करायचं तें ' हें साहेबबहादुरांचं आश्वासन आम्ही मामुली स्वरुपाचं धरून चाललो होतों; पण आंत त्या बाबतीत चक्रे फिरत होतीं. पडद्याआड घटना घडत होत्या. पण त्या बाबतींत नक्कीं काय चाललं आहे याची कोणालाच कांहीं कल्पना नव्हती. पण हळू हळू उमेदवारांच्या वयाचे, त्यांच्या शिक्षणाचे, ते कोर्टांत केव्हा लागले त्याचे, वगैरे वेगवेगळयां प्रकारचे तक्ते ऑफीसमार्फत सरकारकडे जायाला लागले. त्यांतच एकें दिवशीं असिस्टंट जज्जांच्या देखरेखीखालीं परिक्षका-समोर विद्यार्थी पेपर लिहितात तसं आमच्याकडून नकला करून घेतल्या गेल्या. त्यावेळीं आपल्याला बक्षीस मिळेल–निदान शाबासकी तरी कुठं गेली नाहीं. अशा खुळया विचारांनीं कित्येकांनीं आपलं आधले दिवशीचं केलेलं काम देखील त्यात मिसळून सर्वांपेक्षां जास्त काम करतो हें दाखव–ण्याचा प्रयत्न केला. बिच्याऱ्यांना काय कल्पना कीं सर्व साधारण उमेद-वार दिवसाला किती काम करतो एवढंच फक्त त्यांना पहावयाचं होतं. पण तें माहित नसल्यामुळें प्रत्येकजण आपापल्या बुद्धीप्रमाणं वेगवेगळे सांगत होता. कोणी म्हणत होता ' दर वर्षींच ऑफीसमार्फत या माहितीचे तक्ते जातच असतात; तेव्हां यांत काय विशेष आहे ? ' कोणी म्हणत होता ' नॉन क्वॉलिफाईड माणसं सरकारला काढून टाकायचीं असतील; आणि म्हणून ही सारी माहिती मागवलेली दिसते ' तर कोणी म्हणाले ' वये विचारलीत आपली; आणि त्याची खात्री करून घेण्यासाठीं वयाचे खात्री-लायक दाखले मागितले आहेत सरकारनं; तेव्हां कोणीतरी वय चोरल्याचं

उघडकीला आलं असलं पाहिजे. आणि म्हणूनच सर्वांच्या वयाची खात्री करून घेण्याची गरज भासलेली दिसतेय सरकारला ' पण ते सारे तर्कच ठरले आणि खरं वेगळंच बाहेर आलं शेवटीं. एके दिवशीं अगदीं अचानक पणें एक हुकूम आला. आम्ही इतके दिवस जे पतित होतो तें आम्हांला पावन करून घेतल्याचं—सरकारी पगारी नोकर करून घेतल्याचं—फर्मान होतं तें !

त्यामुळं आम्हा साऱ्यांना अत्यानंद झाला हें काय सांगायला पाहिजे? पण एकाचं सुख तेंच दुसऱ्याचं दुःख होतं. कित्येक वेळीं तसंच इथं झालं. 'नरेंच केले हीन किती नर?' हें ओळखून मेहेरबान साहेबांनीं दयार्द्रबुद्धीनं उमेदवार वर्गाचं नष्टचर्य संपवलं खरं. पण ज्या हीन मनोवृत्तीमुळं आम्ही हीन लेखले जात होतो त्या हीन वृत्ति कुठं सुधारल्या? साहेबांना तरी त्या सुधारता येणं कसं शक्य होतं? त्यामुळं त्यांची बदली होतांच त्या जास्तच उफाळून आल्या!

अमेरिकेंत गुलामांचा कायदा केल्यानंतर अमेरिकनांच्यामध्यें त्याची काय प्रतिक्रया झाली असेल कल्पना नाहीं; पण उमेदवारांची सक्तीची वेठबिगार कमी झाली आणि त्यांना पगार सुरू झाला तशी पुष्कळांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली! कारण आतां त्यांना कोणत्याही निमित्तानं वेठीला धरतां येणार नव्हतं ना या लोकांना? त्यामुळं 'त्या उंटावरच्या शहाण्याला हे नसते उद्योग सांगितले होते कुणी?' असं मनांतले मनांत चरफडत म्हणत असतील ते ! सांगायचं असं कीं दासीला राणी करून घेतल्यामुळं राणीवशांत जसा गोंधळ उडावा, अशी अवस्था झाली त्यांची !

त्या दिवसापासून साराच मनू पालटला ! त्यापूर्वीं त्यांना काम मिळतं कीं नाहीं? तसंच त्यांनीं केलेल्या कामाचे पैसे वसूल होतात कीं नाहीं? याची कोणीच दखल घेत नसे. पण त्या दिवसापासून साऱ्यांचं लक्ष तिकडं लागून राहिलं ! डोळ्यांत तेल घालून बघू लागले सारे! पूर्वीं त्यांच्याबाबतींत उपेक्षा बुद्धि होती. आतां असूया निर्माण झाली त्यांच्या विषयीं त्यामुळं पेशव्यांच्या स्त्रियांकडून मस्तानीचा छळ झाला नसेल इतका छळ होऊ लागला त्यांचा! कोणी म्हणावं उमेदवार लॉर्ड्स झाले आहेत आतां! ' तर कोणी म्हणावं चुकार लेकाचे! आतां पगार भरपूर

मिळायला लागला ना हरामचा!' (जसा काहीं यांच्या बापाच्या तिजोरींतूनच मिळत होता!) 'मग काम कशाला करतील ते आतां?' अन् त्यांच्या विषयीच्या या असूया वृत्तीतूनच त्यांच्या किमान आणि कमाल कामाच्या कल्पनेचा उद्भव झाला. सरकारी हुकमांत 'उमेदवाराकडून दररोज किमान इतकं तरी काम व्हावं' अशी मर्यादा घालून दिली होती. पण कमाल (जास्तींत जास्त) काम किती करावं याचा त्यांत निर्देश केलेला नसल्यामुळं, अधिकारी वर्गानं त्याला मर्यादाच ठेवली नाहीं! एवढ्यावरच हें प्रकरण न थांबतां अनेक पर्याय निघायला लागले त्यांत! सुटीच्या दिवशीं काम करू नये असं कुठं म्हटलं आहे त्यांत?' असं म्हणून महिन्याचे जितके दिवस आम्ही ठरवू त्या शब्दसंख्येच्या हिशोबानं शेवटीं काम झालं पाहिजे!' असं फर्मान निघालं! आणि त्याहूनही आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या नकलेच्या कामाच्या पैशाचे हिशोब वगैरे ठेवण्याकडं ज्याचा सबंध दिवस जावयाचा त्यानंही ठरवून दिलेल्या शब्दसंख्येचं काम रोज करायला हवं!' असं ऑफोसनं फर्मावलं! म्हणजे एकाद्या अरेरावी नवऱ्यानं आपल्या बायकोला सांगावं 'तुला गृहकृत्यें करण्यासाठीं आणि मुलंबाळं सांभाळण्यासाठीं या घरांत आणलं आहे, तेव्हां तें तर तुला करायलाच हवं. बरं दुसरीकडून चार पैसे मिळवून आणल्याशिवाय आपला संसार ठाकठीक चालायचा कसा? तेव्हां तुला नोकरी ही केलीच पाहिजे! आणि माझी सेवा करणं हा तुझा पत्नीधर्मच आहे; तेव्हां तो टाळून कसं चालेल?' त्या मासल्याचं त्याचं फर्मान होतं तें! ज्यानं या साऱ्या गोष्टी विचारपूर्वक केल्या त्या विद्वान गृहस्थाला 'यावर पुढं इतकी विक्षिप्त डोकीं चालतील, अशी कल्पना तरी आली असेल काय? बाकी अधीक कष्ट करा हें सध्याचं घोषवाक्य आहे ना? आजचा मानवी विकास म्हणजे भाराभर काम नि खोरं भरून पैसा हा आहे! यंत्राची अश्वशक्ति पाहून माणूस माणसापासून त्या शक्तीची—त्या गतीची अपेक्षा करायला लागला. त्यामुळं झालं असं कीं कामाच्या बाबतींत त्याला यंत्राची गती तर आलीच नाहीं उलट या हव्यासानं माणुसकी मात्र गमावून बसला तो! असो. तर या विचारांना धरूनच अधिकाऱ्याचं आमच्याबाबतींतलं तें वर्तन असावं पण लांब मुदतीच्या निर्धावलेल्या कैद्याला सुद्धा पुढं पुढं कामाच्या

सवलती मिळून त्याच्या जीवनांत आराम मिळतो. पण बिचाऱ्या उमेदवाराला अव्वलपासून अखेरपर्यन्त त्याच हिशेबांत काम करणं भाग पडतं! त्यांनी उतार वयांत तरुणपणाचा जोम अंगीं आणायचा कसा? पण त्याचा विचार सहानभूतिशून्य अधिकारी करतात कशाला? त्यामुळं काम कमी (सरकारनं ठरवून दिलेल्या पेक्षा नव्हे तर यांच्या आपेक्षेपेक्षा) झालं कीं त्याला चुकार ठरवून तंबी दिली जाई त्याला. पण एखाद्याबद्दल असा अविश्वास व्यक्त केला तर त्याचा परिणाम त्याचा प्रामाणिकपणा कमी होण्यात होतो. त्याप्रमाणं 'कितीही जाव तोडून काम केलंतरी आपल्याला चुकार म्हणून शेरा मिळतो आहे तर चुकारपणा करून आराम मिळवावा' असं वाटणं मनुष्य स्वभावाला सोडून होईल कां? पण तसं कांहीं एक न होता आम्ही इमाने इतबारे कामं करीत होतो आणि तरीही आम्हांला वरिष्ठांची बोलणीं खावीं लागतच होतीं! आणि त्याचं कारण उघडच होतं. आम्ही अगतिक आहोत. प्रतिकाराचं सामर्थ्य आमच्यांत उरलं नाहीं हें त्यांनी पुरं ओळखलं होतं!

एकाद्याचं म्हातारपणीं लग्न झालं असता संसार सुखाच्या आनंदापेक्षा मृत्यु जवळ येत चालल्याचं दुःखच जाणवावं त्याला; तशी आमची स्थिति झाली होती! आम्हाला स्कीम मिळाली खरी; पण ती अशा वेळी कीं साऱ्यांची उतारवयं होऊन प्रत्येकजण जाण्याच्या मार्गाला लागलेला! त्यामुळं एकानं दुसऱ्याला विचारावं 'काहो, किती दिवस राहिले आहेत आतां तुमचे?' आणि त्यानं 'चार दोन वर्षं' असा कांहीं आंकडा सांगितला म्हणजे विचारणाऱ्यानं आंबट तोंड करून म्हणावं 'भाग्यवान आहात बुवा! आम्हीं पुढच्या वर्षी चाललो!'

आणि त्यानंतर एक एकेकजण जायाला सुरवात झाली. त्यांचे निरोप समारंभ व्हायला लागले. अशा एका समारंभाचा प्रकार मी बघितला. मोठ्या माणसांच्या उपस्थितिशिवाय समारंभाला ओके ओकेपणा येतो म्हणून अधिकाऱ्यांना निमंत्रणं दिलीं होतीं. आणि संस्थानिकांच्या काळांत मुलाच्या लग्नसमारंभांत पानसुपारीला अशा राजे महाराज्यांना बोलावलं असतां त्यांची बडदास्त ठेवण्यांत खुद्द नवऱ्या मुलाकडेच दुर्लक्ष होत असे तसा प्रकार दिसून आला तिथं! क्लार्क ऑफ दी कोर्ट नाझर दप्तरदार

वगैरे बडया बडया मंडळींनीं खुर्च्या आडविल्या होत्या आणि तो बिचारा खालीं बैठकीवर बसला होता ! त्याच्याबद्दल मंडळी बोलली पण त्यांत देखील त्याच्या कुठल्याही गुणाचा गौरव न करता फक्त त्याच्या सेवाधर्मांचेच गोडवे गायले गेले त्यांच्याकडून ! हारतुरे अधिकाऱ्यांच्या गळ्यांत पडले; त्याच्या वाट्याला फक्त गुच्छ आला ! खाद्यपदार्थांची खाशी व्यवस्था अधिकाऱ्यांची; तो आपला इतरेजनांत ! तो सारा प्रकार पाहून मनांत विचार आला कीं एकाद्याचा भयंकर अपमान करायचा असेल तर चार लोकांत त्याला अद्वातद्वा बोलण्यापेक्षां हा प्रतिष्ठित मार्ग चांगला ! त्याचा असा सत्कार करावा म्हणजे संपलं ! खरंच स्वतःची अशी शोभा करून घेण्यापेक्षा असला समारंभ न झाला तर काय वाईट ?

असो. अशा तऱ्हेनें प्रत्येकाचे निरोप समारंभ होऊ लागले आणि अशा वेळीं आमचीही सेवानिवृत्तीची वेळ आली. चार मंडळींनीं आमच्याही सत्कार समारंभाचा घाट घातला होता. पण सौम्य शब्दात मी त्याला विरोध दर्शवून तो रहित केला. तो समारंभ चांगल्या तऱ्हेनं घडून आला असता तर मला नको होता कां ? नाहीं. तसं मुळीच नाही. मी त्यागी नाही. भोग लालसा माझ्या कमी झाल्या नाहीत, मला सारं कांहीं आवडतं; पण तें भव्य स्वरूपात असेल तरचं. मला फोटोंत बसणं आवडतं; पण आपला फोटो निघतोय म्हणून मी कुठं तरी कोपऱ्यांत बसणार नाहीं! आपल्याला जिथं महत्त्व दिलं जाईल अशाच फोटोत मी बसेन. समारंभात उपस्थित राहण्याच्या बाबतीतही मी विरुद्ध नाहीं; पण जिथं आपल्याला आवर्जून विचारणार अशाच समारंभाला मी जाईन ! पण अशा तऱ्हेनं कुणीतरी कांहींतरी करून त्यानं आपण इतरांच्या चेष्टेचा विषय होणं मला बरं वाटत नाहीं. त्यापेक्षा मुळांतच अशा गोष्टीला फाटा देणं हें मी अधिक पसंत करतो. माणसाची परिस्थितीशीं तडजोड करण्याची तयारी असावी. मान्य आहे मला पण असल्या परिस्थितीशीं तडजोड करणं म्हणजे मृत्युशीं तडजोड करण्यासारखं आहे; त्यांत हाती कांहींच लागत नाहीं. सर्वंच गमावून बसायची वेळ येतें. म्हणून मी आमच्या निर्गमनाच्या वेळीं वरील प्रकारचा निरोप समारंभ करुन न घेता समारंभा वाचूनच त्या जगाचा निरोप घेतला.

## : ११ :

मागं जागतिक प्रदर्शन पाहून आलेले एक गृहस्थ सांगत होते कीं 'आपण त्याच्या ज्या भागांत प्रवेश करावा तो नीटपणें बघायचं म्हटलं तर दिवसचा दिवस निघून जात असे. पण तसा तो नीटपणें पाहून होत नसे. त्या मानानं 'तें जग' तर किती विविधतेनं आणि वैचित्र्यानं भरलेलं आहे! मग त्याच्या ज्या भागांत मी प्रवेश केला तो पाहाण्यांत माझी सारी हयात निघून गेली असल्यास नवल काय? पण इतका दीर्घकाल तिथं घालवूनही मला त्याचं सम्यक ज्ञान झालं असा मी विश्वास बाळगू शकत नाहीं तरी पण कुठं काय आहे? कुठं काय आहे? याची कल्पना मात्र आली आहे; आणि त्या अनुरोधानेंच केव्हां केव्हां कांहीं कांहीं विचार सुचतात.

ज्या कोणाला आयुष्यांत कोर्टकचेरीची पायरी चढावी लागली नसेल ते खरोखरच भाग्यवान म्हटले पाहिजेत! पण अशी माणसं किती निघतील? फारच थोडी! बाकींच्यापैकीं कोणाला वादी म्हणून, कोणाला प्रतिवादी म्हणून, कोणाला फिर्यादी म्हणून तर, कोणाला आरोपी म्हणून, कांहींना त्यांतले साक्षीदार म्हणून तर कित्येकांना त्यापैकींच कोणाचे हितसंबंधीं म्हणून, सारांश या ना त्या भूमिकेंत कोर्टांत खेपा माराव्याच लागल्या असतील. त्या सर्वांना उपरिनिर्दिष्ट दृश्यं परिचयाचीं वाटतील. आणि मग कदाचित त्यांच्यापैकींच कुणीतरी माझी ही कृति दुसऱ्याला दाखवून म्हणेल 'बघितलंत? कोर्टांतलं वातावरण हें असं आहे!'

हो, दुर्दैवानं आहे खरं हें असं! हा भाग दूषित झाला आहे खराच! आणि तो दुरुस्तही व्हायाला हवा, याबद्दलही दुमत असायचं कारण नाहीं. पण एकाद्या अवयवाला जखम झाली आणि तिथं सेप्टिक झालं म्हणजे तो सबंध अवयव कापून काढावा लागतो. मग इथं तर काय—समाजरूपी सारं

शरीरच दूषित झालं आहे! मग तिथं कापणार काय? नि ठेवणार काय? कोर्टकचेऱ्या हे सामाजिक नीतिमत्तेचा आरसा आहे म्हणतात. त्यांत एकदा निर्विकार दृष्टीन कोणीही बघावं आणि निस्संकोचपणें सांगावं माझं म्हणणं खरं आहे कीं खोटं तें? अहो, ज्या आपल्या पूर्वजांनीं एकेकाळीं 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चित दुःख माप्नुयात्' असं साऱ्या जगाचं भलं चिंतलं, त्यांचेच आपण वंशज आज काय करतो आहोत?

कोणी एकाद्याचं देणं बुडवायला प्रवृत्त होतो आहे! तर कोणाला आप्तेष्टांची संपत्ति घशांत घालण्यासाठीं युक्तीनं त्याचा काटा कसा काढावा याची विवंचना लागून राहिली आहे ! कोणी तो किंवा ती बायको व्यभिचारिणी आहे या संशयानं पछाडल्यानं किंवा नवऱ्याला गुपित कळलं म्हणून, तिच्या किंवा त्याच्या खुनाला उद्युक्त होत आहे! तर कोणी शेताच्या बांदासारख्या क्षुल्लक कारणावरून शेजाऱ्याचा मुडदा पाडतो आहे! एक ना दोन! किती प्रकार सांगायचे? पण त्यांपैकीं एकाच्या तरी मनांत असा विचार येतो कां कीं, 'ज्यानं विश्वासानं आपल्या संकट-काळीं मदत केली त्याचं देणं बुडवणं कृतघ्नपणा नव्हे कां?' तसंच या व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळांत कोणी कितीही वाईट झाला तरी त्याच्या प्राणावर घाला घालायचा आपल्याला काय हक्क आहे? पण हें किंवा अशाप्रकारचं सारं जरी खर असलं, तरी असा विचार करतो कोण? म्हणून असं कांहींतरी आपल्या हांतून घडतं; आणि मग प्रकर्ण अंगावर शेकलं म्हणजे तें निस्तरण्यासाठीं, किंवा तुमच्या बाबतींत असंच कुणीतरी वेड-वांकडं केलेलं असतं त्याचं उट्टं काढण्यासाठीं तुम्ही कोर्टाची पायरी चढता प्रत्यही वाढत चाललेली कोर्टबाजी हे त्याचेंच द्योतक नव्हे कां ?

आपलं खरं असो खोटं असो; भांडणाची अंगांत ताकत असो नसो. जो उठतो तो आपला कोर्टांत जातो ! पण आर्थिक दम कमी पडल्यामुळं कोणाला तें मध्येंच सोडून द्याव लागतं तर कोणाला अर्धवट स्थितींत धड सोडताही येत नाहीं नि पुढं चालू ठेवणं हो अशक्य होऊन बसतं अशी मोठी केविलवाणी स्थिति तरीं होऊन जाते त्याची ! आणि मग त्याला वाटायला लागतं 'आधीं कोर्टाची पायरीच चढलों नसतों तर बरं झालं असतं !'

'कां हो, काय झालं तुमच्या दाव्याचं ?' असं कुणी विचारलेलं आणि 'भांडायला पैसा हवा ना ?' असं दुसरं कुणी तरी सांगितलेलं सहज कानावर आलं म्हणजे वाटतं 'न्याय मिळायला पैसा खर्चावा लागणं, त्याच प्रमाणं परस्परांतलीं भांडणं मिटवण्यासाठीं न्यायालयांत जाण्या ऐवजीं न्याय मिळविण्यासाठीं भांडणं करावीं लागणं हा केवढा विरोधा भास आहे ! बरं त्यांत गंमत अशी कीं बहुधा प्रत्येक दाव्यांत दोघां-चंही निम्म शिम्म खरं नि निम्म शिम्म खोटं असतांना कुस्तींत एकाची दमछाट झाली कीं दुसरा संपूर्ण विजयी व्हावा. त्याप्रमाणं एकाचा पैसा कमी पडला भांडण्याच्या कामीं, कीं मुळांत असलेलं त्याचं निमं खरं प्रति-पक्षाच्या वाट्याला जातें नि त्याचें निमें खोटं याच्या वाट्याला येतें ! पैसेवाला लौकिकांत खरा ठरतो नि पैसे कमी पडलेल्याच्या पदरीं खोटे-पणा येतो! अशा रीतीनं बिचाऱ्याचा पैशापरीपैसा जाऊन अपयशही त्याच्या पदरीं आल्यामुळं व्यवहाराच्या दृष्टीनं संपूर्ण नागवला जातो तो ! पण हें सारं दिसत असतांही कोर्टाचीं कामं प्रत्यही वाढतातच आहेत!

पूर्वीच्या काळीं असं असायचं म्हणे कीं एकाद्याला राजेसाहेबांच्या भेटीचा लाभ झाला म्हणजे त्याचं भाग्य उदयाला यायाचं ! पण त्याच्या-आधीं चौक्यापहारे ओलांडतांनाच दमछाट होऊन जायाची त्याची! त्याप्रमाणं आजच्या न्यायाचं स्वरूप आहे. न्याय सोज्वळ खरा, पण तो पदरांत पाडून घेईपर्यंत तग धरणं सर्व सामान्य माणसाला जड जातं.

कल्पना करा—एका जनावरामागं दुसरं जनावर लागलं; म्हणून आत्मरक्षणासाठीं तें एका गुहेंत शिरलं. त्याच्या मागोमाग दुसरंही शिरलं. पण ती श्वापदांचीच गुहा असल्यामुळं एकाच्या तावडींतून सुटायला गेलं नि तिथं अनेकांच्या तावडींत सांपडलं तें! त्याच्यामागून जाणाऱ्यालाही तोच प्रसाद मिळाला ! चांगलीच लचकेतोड झाली त्यांची तिथं! अशा स्थितींत गुहेच्या शेवटापर्यंत ते कसेतरी जाऊन पोहोंचले. तिथं त्यापैकीं एकाला कांहींतरी मिळाल्याचं समाधान नि दुसऱ्याला असंच कांहींतरी गमावल्याचं दुःख झालं. तशा स्थितींत ते परततात. बाहेर येतांनाही त्यांची तीच अवस्था होते. आणि अशा स्थितींत कसेबसे ते बाहेर येतात. पण त्यांच्या या धावपळींत त्यांचीं हाडं शाबूत राहिलेलीं असलीं तरी मांस

गमावून बसतात ते! तशी गत होते कोर्टात जाऊन खटला जिंकलेल्या आणि हरलेल्यांचीही! अपरिमित पैसे गमावून बसतात ते! लक्ष्मी चंचल आहे हें त्यांच्याइतकं दुसऱ्या कोणाला क्वचितच पटत असेल. दोघांच्याही (वादी प्रतिवादी किंवा फिर्यादी आरोपी) खिशांतले पैसे किती जणांच्या तरी खिशांत जातात या ना त्या निमित्तानं! मग प्रतिस्पर्ध्याची जिरवण्यासाठीं, त्याचा सूड घेण्यासाठीं स्वतः नागवलं जाण्यापेक्षां शहाणपणाचा अन्य मार्ग नाहींच का कांहीं? अशी चोरापोराची धन करण्याऐवजीं ईश्वरी न्यायानं वागलं—न्याय्यदृष्टया ज्याचं देणं आहे त्यालाच तें दिलं—तर काय बिघडेल?

पण ईश्वरविषयक श्रद्धाच जिथं मावळली आहे, तिथं त्याच्या न्यायनीतीची पर्वा करतो कशाला आम्ही? कुंकवाला कोणी तरी धनी हवा म्हणून बाहेरख्याली स्त्रीनं म्हाताऱ्या नवऱ्यास जवळ करायचं ’ त्याप्रमाणं कोर्ट कचेऱ्यातून ईश्वराचा उपयोग केला जातो! ‘ईश्वरसाक्ष खरं सांगेन’ अशी आम्ही तिथं शपथ घेत असलों, तरी त्याच्या सर्व साक्षित्वावर आमचा विश्वास नसतो. अर्थात आपण खोटं बोललो तर तो आपल्याला शिक्षा करील अशी भीति बाळगायचंही कारण उरत नाहीं! अशास्थितींत त्याचें नीतिनियम पाळण्याची तरी आवश्यकता काय उरते? आणि त्यामुळंच वाटेल तें करण्याची यत्किंचित देखील क्षिति वाटत नाहीं आम्हांला! अमकं कृत्य गुन्हा ठरवलं आहे, तेव्हां कायद्याच्या कचाट्यांत न सांपडतां तें बेमालूम कसं पार पाडायचं, याची दक्षता घेतली म्हणजे झालं ! तसंच खोटं बोलणं, खोटं काम करणं, याची आम्हांला यत्किंचित देखील दिक्कत वाटत नाहीं. तें बोलणं, तें वागणं बेमालूम पचवलं कीं जिंकली!’ अशी मनोमन खात्री असते आमची! वर इतकंही करून आलंच प्रकर्ण अंगावर तर ‘पैशाच्या जोरावर चांगला वकील दिला कीं काम फत्ते!’ असा विश्वास असतो आम्हांला! पण गुन्हेगाराला अभय देणारा विश्वास अनुचितच नव्हे कां? परंतु पैशाकडं लक्ष असणाऱ्याचं इकडं तें जातंय् कशाला? खरं म्हणजे अमका माणूस गुन्हेगार आहे अशी मनोमन

खात्री झाल्यानंतर त्याला वकील मिळता कामा नये. पण इथं तर असं आहे कीं, जितका गुन्हा मोठा तितका पैसा जास्त! मग अशी पर्वणी कोण गमावणार, कुठल्या तरी बुरसलेल्या ईश्वरी अस्तित्वाच्या कल्पनेपायीं?

मला असं वाटतं कीं प्रत्येक व्यवसायामागं त्याची अशी व्यावसायीक नीति म्हणून कांहीं तरी निश्चित असावी. माणुस ती जोंवर अनुसरतो, तोंवरच त्याचा तो व्यवसाय प्रतिष्ठित म्हणून गणला जातो; आणि ती सुटली कीं त्याला धंद्याचं बाजारी स्वरूप येतं! आज तसंच कांहींसं झालं असावं या व्यवसायाच्या बाबतींत. सध्या धंदेवाल्या वकीलापुढं उतरत्या क्रमानं तीन उद्दिष्टं असावीत, असं दिसतं. प्रथम आपलं हित, नंतर पक्षकाराचं; आणि साधल्यास मग न्यायाला मदत. त्या ऐवजी याचा क्रम उलटा लावला त्यांनीं; नि याची पहिली पायरी गाळली–आपलं हित बाजुला सारलं–म्हणजे प्रथम न्यायाला मदत केली आणि नंतर पक्षकाराचं हित बघितलं, तर किती चांगलं होईल! त्यानीं जज्जाला दिवाणी दाव्यांत फिर्याद, कैफीयत, पुरावे नि आरावे असल्या चक्रव्युहांत वर्षेंच्या वर्षें गुंतवण्यापेक्षा जितकं तुझं घेणं देणं योग्य असेल तितकेच घेणं देणं न्यायाचं आहे; आणि तेवढंच काम मी करीन ' असं आपल्या पक्षकाराला सांगावं नि दोन्ही बाजुंच्या वकीलांनीं न्यायालयामार्फत त्यावर मान्यतेचा शिक्का मारून त्याला झटपट आपल्या कामांतून मोकळ करावं. त्याचप्रमाणं फौजदारी खटल्याच्या कामीं आपल्या पक्षकारानं गुन्हा केल्याची खात्री होऊनहि तो नाकारण्यांत अप्रत्यक्षपणें गुन्हेगाराला सहानुभूति आणि गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याऐवजी पश्चात्तापयुक्त अंतःकरणानं त्याला त्यानी गुन्हा कबूल करायला लावून दयेची याचना करायला लावली तर किती चांगलं होईल ! न्यायालयावरचं कामाचं ओझं कितीतरी हलकं होईल ! आणि मग भानगडीचं असं जे काम उरेल थोडं, त्यांत शांतपणें लक्ष घालायलाही जज्जाला अवसर मिळेल. खरोखरच असं झालं तर खरीखुरी मदत केल्यासारखीही होईल ती न्यायाच्या कामीं न्यायदेवतेला. सारांश दिवाणी दाव्यांत तडजोड आणि फौजदारी गुन्ह्याचे कामीं दयेची याचना एवढंच त्यांनीं करावं. पण असं व्हायाचं म्हणजे त्यांनीं प्लीडरची भूमिका

सोडून जज्जाची घ्यायाला हवी. पण मग त्यांनी बुद्धिचातुर्य कुठे दाखवायाचं आपले! पण मी आग कशी कौशल्यानं लावतो? ' हें दाखवण्यासाठीं दुसऱ्याच्या घराची राखरांगोळी करणं चांगलं कां? हो, पण इतका विचार करतो कोण ? त्यापायीं दोन्हीही बाजुचे वकील आपापली बाजू पूर्ण सत्याची आहे असं अट्टाहासानं प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतात ! पण तें पाहून त्रयस्थाच्या मनांत असा प्रश्न उदभवतो कीं कुठल्याही बाबतींत एकच सत्य असतें यांची हीं दोन सत्यें कशीं ? त्यांपैकीं कुठलं तरी एक खोटं असलंच पाहिजे ना ? (वांस्तविक वर म्हटल्याप्रमाणं दोघांचही निम्मं शिमं खरं नि निम्मं शिमं खोट असतें ) मग असें असता ते समजून उमजून आपल्या पक्षकाराची तरफदारी करतात कीं अजाणतेपणीं ? समजून ते तसं करीत असतील, तर खोटयाला मदत केल्याचा दोष त्यांच्या पदरी येतो. बरं अजाणतेपणीं तसं करीत असतील ( पण तसं वाटत नाहीं. रोग्यानं आपला रोग मोकळेपणें सांगितल्याशिवाय डॉक्टरला जसा त्यावर उपाय योजता येणार नाहीं; तसं पक्षकारानें खरीखुरी हकीगत सांगितल्याशिवाय वकीलालाही त्यावर कायदेशीर इलाज करता येणार नाहीं. तेव्हां त्याला खरी परिस्थिति ठावूक असलीच पाहिजे. पण ती नसताना त्याच्या निरपराधित्वाचा निर्वाळा दिला )तर मूर्खपणा ठरेल त्याचा तो !

बरं न्यायाधीश कितीही हुषार असला तरी अंतरज्ञानी थोडाच असतो तो ? तो आपल्या बुद्धिचातुर्यानं खरं शोधून काढतो हें वेगळं; पण त्याला चुकीची वाट दाखविणारे असे प्रतिष्ठित वाटाडे कां मिळावेत? खरं दडवून ठेऊन खोटयाची तरफदारी कां करावी त्यांनीं ? आणि न्यायदानाच्या बाबतींत तरी कसं आहे बघा. शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील; पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये ! हें त्यांतलं आद्यतत्व! सौजन्य, सहानुभूती, दया वगैरेच्या बाबतींत ठीक आहे तें. तत्व चांगलं खरं; पण अति व्याप्त वाटतं तें ! आणि म्हणून गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्याच्या दृष्टीनं अहितकरच आहे तें, अशी माझी समजूत आहे. मी समाजशास्त्रज्ञ नाहीं आणि प्रचलित कायद्याच्या बाबतींत तर पूर्णपणें अनभिज्ञ आहे मी. पण मैफलींत वेडवाकडं गायलं म्हणजे खऱ्या गवयाला

अनुक्रम ३००५३
विभाग
क्रमांक
नों. दि.

चेव येतो, त्याप्रमाणं या बाबतींत अधिकारी व्यक्तींनीं आपलं लक्ष घालावं या उद्देशानंच सर्वसामान्य माणूस या नात्यानं मी हें बोलत आहे. हो. तर मला सांगायचं म्हणजे असं कीं ज्याप्रमाणं त्यांत 'एकही निरपराधी गोवला जाऊ नये' असं म्हटलंय, त्याप्रमाणंच एकही अपराधी 'सुटू नये' असंही तिथं असायला हवं होतं. तें नसल्यामुळं माणसाला ज्या डोळ्यानं दिसत नाहीं त्या बाजूलाच खोडकर पोरांच्या खोड्या चालाव्यात, त्याप्रमाणं ऐसपैस अशा उपरोक्त न्याय तत्त्वाच्या आधारावर कित्येक बाबतींत आरोपीच्या बाजूचा वकील पुराव्याची छाननी करून आपल्या पक्षकाराला संशयाचा फायदा मिळवून देतो. अशावेळीं न्यायाधीशाचे हात कायद्यानं बांधलेले असल्यामुळं त्याच्या सदसदविवेकबुद्धीला पटत नसलें तरी पुराव्याच्या पलीकडं त्याला जातां येत नाहीं. आणि पुराव्याचे दुवे कच्चे पक्के ठेवणं हें तिसऱ्याच्याच हातांत असून तें काम आधींच होऊन गेलेलं असतं. अशा परिस्थितींत आरोपीनं गुन्हा केला असूनही, त्याला सोडून देणं भाग पडतं. पण न्यायनिवाड्याच्या कामीं संशयाचा फायदा मिळणं, किंवा दया दाखवली जाणं यांत आरोपीचं भावी आयुष्य बरबाद होऊ नयें, त्याचं हृदय परिवर्तन होऊन त्याला चांगली दिशा लागावी वगैरे प्रकारचे कितीही स्तुत्य हेतू असले तरी ते सफल होतात कां ? हा मुख्य प्रश्न आहे. मला तर वाटतं कित्येक वेळीं उलटाच परिणाम होतो त्याचा! चांगली दिशा लागायचं बाजुलाच राहून दुसरा गुन्हा करायला मोकळा होतो तो ! आणि त्याचं कारण? न्याय ज्या नीतीवर आधारित ती नीतीच आज मृत्युपंथाला लागली आहे ! नि ज्या माणुसकीचे आम्ही बडीवार गातों ती माणुसकीही मरू घातलेली आहे ! अशा स्थितींत आजारी माणसावर औषधाचा मारा सारखा चालला असूनही गुण येऊ नये, तसं आमच्या सुखासाठीं सारखे नवीन नवीन प्रयोग चालले असताही तें सुख आणि स्वास्थ्य घटतच चालले आहे! आणि त्या आजाऱ्याची आशा सुटली म्हणजे जसे सगळे उपचार थांबतात तसं एक दिवस हा सारा पट उधळून समाज सारी सत्ता आपल्या हातीं घेईल कीं काय अशी भीति वाटते! अशी जिथं स्थिति आहे तिथं हृदयपरिवर्तन कसलं करताय ? आणि म्हणूनच असल्या उदात्त हेतुनं गुन्हेगाराच्यां बाबतीत सौम्य धोरण स्वीकारणंही

व्यर्थ आहे ! असल्या सौम्यपणापायीं अन्यायाची कदर वाटेनाशी होऊन माणूस दिवसें दिवस पशू बनत जाण्यापेक्षा त्याला पाशवी शिक्षा देऊन राष्ट्राची माणुसकी जागृत होणार असेल, तर आज तें हवं आहे आम्हांला! त्यासाठी शिक्षा अशी हवी कीं, गुन्हेगाराला पश्चात्ताप आणि इतरांना दहशत बसावी अन्याची वर्तनाची.

भगिरथ प्रयत्नानं एके काळीं भूतलावर अवतरलेली न्यायनीतीची गंगा आज खूपच खाली आली आहे! त्यामुळं सध्याच्या गढूळलेल्या जलाशयांत अंतर्धान पावलेल्या तिच्या मूळच्या विशुद्ध प्रवाहाचं स्वरूप आज आपल्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तें पुन्हां दिसावं असं वाटत असेल तर तिचा तो प्रवाह मुळापासूनच बदलायला हवा आतां! आमूलाग्र बदल करायला हवा यांत!

या बाबतींत विचार करायला लागलं म्हणजे मोठ्या सुंदर सुंदर कल्पना येतात मनामध्यें. वाटतं साऱ्या जगाचं संघराज्य व्हावं अशी कल्पना निघालीच आहे. तसं झालं–आणि व्हावं अशी उत्कट इच्छा आहे; तर–त्या राज्यांत आजच्या रेडक्रॉस सोसायटीसारखी राज्यांतीत आणि निरपेक्षपणें कार्य करणारी न्यायदान संस्था असावी. गुन्हेगारांना ज्यांच्यापुढं खोटं बोलण्याचं धैर्य होणार नाहीं इतकं अध्यात्मिक सामर्थ्य अंगीं असणारे आणि त्यागी जीवन जगण्याची ज्यांची तयारी आहे असे न्यायाधीश आणि त्यांना अनुयायी शोभतील असे वकील असावेत तींत, ईश्वरी न्यायनीतीवर आधारित तिचे कायदे असावेत; त्या संस्थेचा खर्च आणि तिनं दिलेल्या न्याय निवाड्यांची अमलबजावणी या गोष्टी तिच्या शाखा जिथं जिथं असतील त्या त्या सरकारनं केल्या तरी त्या सरकारची हुकमत मात्र तिच्यावर न चालता ती सर्व तंत्र स्वतंत्र असावी. आज पॉपरब्रीफ एकाद्या वकीलाला मिळालं म्हणजे तो जसं ते काम करतो तसं कोणाही पक्षकाराचं काम मोकळ्या असलेल्या वकीलानं न्यायासना-पुढें आत्मीयतेनं आणि न्याय देवतेला अंतःकरणांत जागून करावं. तसंच न्यायाधीशांकडून गरीब श्रीमंत, छोटा मोठा वगैरे कसलाही भेदभाव मनांत न आणतां कोणालाही न्यायदान–न्यायाचं दान –मिळावं आजच्या प्रमाणं न्याय विकत घेण्याचीं वेळ येऊ नये त्याला.

पण नंतर असंही वाटतं कीं इतकं सारं जरी झालं तरी मानवी उत्क्रांतीच्या दृष्टीनं तें मोठंसं गौरवास्पद होईल असं नव्हे. कारण हें अशा प्रकारचं न्यायदान वरील प्रकारच्या सुवर्ण पात्रांतून मिळण्याची जरी सुदैवानं सोय झाली तरी तें दान आहे! आणि दान घेण्यासाठीं याचक होणं -दुसऱ्यापुढं हात पसरण्याची वेळ येणं-चांगल नाहीं. कारण दान घेणं हें आपल्यांत प्रतिष्ठितपणाचं लक्षण समजत नाहींत मग जगांत संस्कृति संपन्न म्हणून टेंभा मिरवणाऱ्या आम्हां भारतीयांवर ते दान मागण्याची बारीक सारीक कारणावरून देखील न्यायालयाची पायरी चढण्याची-वेळ कां यावी ? कारण उघड आहे. पूर्वजांनीं आमच्यासाठीं ठेवलेला सुविचार, सदाचाराचा ठेवा आज उरला आहे कुठं आमच्याजवळ ? त्या बाबतींत कंगाल होऊन बसलो आहोंत आम्ही ! तेव्हां आम्हाला पूर्वीचे वैभवाचे दिवस यायाला हवे असतील तर सारा समाजच आचार विचार संपन्न व्हायला हवा आणि

**Think truly and thy thoughts,**
**Shall the worlds famine feed;**
**Speak truly and each word of thine,**
**Shall be a faithful seed,**
**Live truly and thy life shall be,**
**A great and nobel creed**

या कव्युक्तीप्रमाणं प्रत्येक व्यक्तीच जर मोठी झाली तर समाज मोठा व्हायाला वेगळं कांहीं करण्याची आवश्यकताच नाहीं. असं जर सुदैवानं कधीं काळीं झालं तर नवं जगच अवतरलं वाटेल तें ! अर्थात तें जग या जगापेक्षां वेगळंच असेल !

म. ग्रं. सं. ठाणे,
अनुक्रम ३००५३
विभाग आचार
क्रमांक २२२३
नों. दि.
IRBK-0107623

# श्री. लोहोकरे यांचा साहित्यसंसार

## कादंबऱ्या

१ तिसरा प्रवाह
२ निर्माल्यांतला देव
३ प्रेमवेडी
४ सुरेख संगम
५ मीलन
६ ताजमहालच्या खालीं
७ ऐसें असावे संसारीं
८ खेळ नव्हे हा !
९ रंभा
१० तें जग वेगळंच आहे !

## कथासंग्रह

१ विसांवा
२ गप्पागोष्टी
३ पाणपोई
४ छाया पडछाया

## किशोर कथा

१ वनराज
२ ताई मला ओवाळ
३ राणी दुर्गावती

## इतर

१ चाळींतील जग (बाल नाटिका)
२ माहेरची भेट (प्रपंच पत्रावली)
३ पुष्पवटिका (कविता संग्रह)